# मेहता मराठी ग्रंथजगत

◇ फेब्रुवारी, २०१६ ◇
◇ किंमत १५ रुपये ◇

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले
दर्जेदार मासिक






## वसंत ऋतु






## आमची वाचनीय पुस्तकं...

# पुस्तक प्रकाशन सोहळा




स्वाती चांदोरकर लिखित ‘उत्खनन’ व ‘अनाहत’
या कादंबऱ्यांच्या प्रकाशनप्रसंगी-
(डावीकडून) **प्रदीप वेलणकर,**
**स्वाती चांदोरकर,**
**सतीश भावसार,**
प्रमुख पाहुणे **डॉ. शाश्वत शेरे,**
अध्यक्ष **पंडित हिंदराज दिवेकर,**
**विद्याधर ओक, चंद्रकांत मेहेंदळे.**

# मेहता मराठी ग्रंथजगत

। फेब्रुवारी २०१६ । वर्ष सोळावे । अंक दुसरा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | ८ |
| पुरस्कार | ६५ |
| पुस्तक परिचय | |
| कहाणी मॅकडोनाल्ड्स्‌ची | ७१ |
| अंतरंग कोका-कोलाचे | ७९ |
| स्मरण | ८९ |
| श्रद्धांजली | ९३ |
| बालनगरी | ९६ |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




# आदर्श संमेलनाचा वस्तुपाठ

पिंपरी-चिंचवड येथे दि. १५ ते १८ जानेवारीपर्यंत संपन्न झालेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण ठरले. इव्हेंट मॅनेजमेंटमुळे कुठल्याही कार्यक्रमाला जो देखणेपणा आणि शिस्तशीरपणा लाभतो, त्याचे हे एक उत्तम प्रात्यक्षिकच म्हणावे लागेल. हे संमेलन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या आमंत्रणानुसार भरविले गेले. त्याचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील (डॉ. डी. वाय. यांचे जामात) हे होते. आजवर हे नाव साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना फारसे परिचित नव्हते; परंतु संमेलनाच्या तयारीसंबंधी एकेक बातम्या येऊ लागल्या तेव्हा आयोजकांच्या संपन्नतेचे एकेक पैलू समोर येऊ लागले आणि हे संमेलन उत्तम प्रकारे होईल, हे लक्षात आले. संमेलनाचा सर्व खर्च डॉ. पी. डी. पाटील हे स्वतः करणार आहेत. ग्रंथप्रदर्शनाचे ४०० स्टॉल्स असतील; त्यांचे जे शुल्क गोळा होईल ते विविध सामाजिक संस्थांना देणगी म्हणून देण्यात येईल. संमेलनात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते अन्य भाषक साहित्यिक यावेत असा खास प्रयत्न केला जाईल. आठ-दहा परिसंवाद, पाच-सहा मुलाखती, ३ कविसंमेलने, निमंत्रितांची उत्तम दर्जाच्या हॉटेलमध्ये व्यवस्था, भव्य करमणुकीचे कार्यक्रम यांमुळे संमेलन कोटीच्या कोटी उड्डाणे घेईल, याचीही कल्पना रसिकांना आली. प्रत्यक्षात हे संमेलन कल्पनेपेक्षाही अधिक नेटकेपणाने आणि थाटामाटात पार पडले, असे निर्विवादपणे सर्वांनी म्हटले. व्यवस्थापन नेटके होते. आर्थिक बाजू भक्कम होती. डी. वाय. पाटील

यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सर्वत्र आपापले काम चोख करीत होते. कार्यक्रम वेळेवर सुरू होत होते. वक्ते वेळेवर येतील अशी जबाबदारी ज्यांच्यावर सोपवली होती त्यांनी ती चांगल्या प्रकारे पार पाडली. कवी गुलजार, सध्याच्या तरुण पिढीचा आवडता लेखक चेतन भगत, नामवंत शायर जावेद अख्तर, ज्ञानपीठ विजेत्या डॉ. प्रतिभा राय, डॉ. सत्यव्रत शास्त्री, डॉ. रहमान राही, सीताकांत महापात्रा, गायिका आशा भोसले वगैरे मान्यवरांच्या उपस्थितीमुळे या संमेलनात काव्य-शास्त्र-विनोदाची रेलचेल होती. ग्रंथप्रदर्शनात रसिकांची चांगली गर्दी होती आणि पुस्तकांची विक्रीही चार-पाच कोटींच्या घरात झाली. परिसंवादातही सुमारे ७०-८० साहित्यिकांनी हजेरी लावली. एकाच वेळी चार ठिकाणी कार्यक्रम झाल्यामुळे कुठल्या कार्यक्रमाला जायचे, असा प्रश्न साहित्यप्रेमींना पडत होता. सर्वच मंडपात श्रोत्यांची मांदियाळी इतकी भरगच्च होती की आपली जागा सोडून दुसरीकडे कुठे जावे म्हटले तर आपली जागा जाईल, अशी भीती श्रोत्यांना वाटे. त्यामुळे थोडा वेळ इकडे, थोडा वेळ तिकडे अशी भटकंती करू पाहणाऱ्या श्रोत्यांची मोठी कुचंबणा झाली होती. असा अनुभव इतर संमेलनात सहसा येत नाही. कुठल्याच कार्यक्रमाला श्रोत्यांची वाण पडली नाही. सर्वच कार्यक्रम रंगत गेले.

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या काही वक्तव्यांमुळे छोटी-मोठी वादळे उठत राहिली; पण त्याचा संमेलनाच्या एकूण कामकाजावर नकारात्मक परिणाम झाला नाही. उलट त्यामुळे संमेलनाच्या बातम्या प्रसारमाध्यमांनी चवदारपणे प्रसारित केल्या. एकूण संमेलन गाजत-वाजत राहिले.

महाराष्ट्राचे नेते मा. शरदराव पवार हे उद्घाटक म्हणून हजर होते. मुख्यमंत्री फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे, केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी हेही जाहीर केल्याप्रमाणे 'वेळेवर' संमेलनात सहभागी झाले. मुख्य मंडपात झालेला बालआनंद मेळावा सादरीकरणाच्या नव्या तंत्रज्ञानाचे नेत्रदीपक स्वरूप प्रकट करणारा

होता. १९९३ मध्ये सातारा येथे झालेल्या संमेलनात मुख्य मंडपातच बालमेळावा झाला होता. त्यानंतर २५ वर्षांनी बालमेळाव्याला मुख्य मंडपात स्थान मिळाले. ‘बेटर लेट दॅन नेव्हर’. नव्या पिढीला विविध प्रकारच्या कला आणि रंजन यांची गोडी निर्माण व्हावी या दृष्टीने, ही गोष्ट नक्कीच आवश्यक आहे.

एकूण संमेलनाविषयी सर्वांचे मत अनुकूल व्हावे असाच सगळा रागरंग होता. स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील यांनी कोणत्याही बाबतीत संमेलनाच्या आयोजनात त्रुटी राहू नयेत, अशी काळजी घेतली होती. त्यांनी कशाचीही उणीव पडू दिली नाही, हे मान्य करावेच लागेल. मराठी प्रकाशक आणि निरनिराळ्या ठिकाणचे संमेलनाचे संयोजक यांचे सहसा सूर जुळत नाहीत. स्टॉलवरून वाद होतात. ग्रंथदालनांची सोडत काढताना पारदर्शीपणा राहत नाही. त्यामुळे ग्रंथांची विक्री हवी तेवढी होत नाही वगैरे मुद्दे दर वेळी चर्चेला येतात. या संमेलनात तसे घडले नाही. पुढच्या संमेलनातूनही लेखक, विक्रेते, प्रकाशक यांच्यामधील आत्मीयतेचे आणि परस्पर सौहार्दाचे धोरण कायम ठेवावे. या संमेलनाचे अत्यंत सुविहित आयोजन करण्याचे श्रेय डॉ. पी. डी. पाटील व त्यांचे सहकारी यांना जाते. पंजाबमधील घुमान येथील संमेलनाचे आयोजन श्री. देसरडा यांनी केले होते. त्यासाठी त्यांनी स्वतःचे दोन कोटी रुपये खर्च केले. त्यापाठोपाठ डॉ. पी. डी. पाटील यांनी पिंपरी-चिंचवड संमेलनाची जबाबदारी स्वीकारली. महाराष्ट्रात साहित्य-कलाप्रेमी धनिकांची संख्या विपुल आहे. त्यामुळे सरकारी मदतीवर भिस्त न ठेवता, सांस्कृतिक उपक्रम राबवता येतील. पिंपरी-चिंचवडचा आणि डॉ. पी. डी. पाटील यांचा आदर्श समोर ठेवण्यासारखा आहे.



# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी www.wordpowerbookshop@gmail.com येथे संपर्क साधा.

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse




## ज्ञानपीठविजेत्या साहित्यिकांच्या मुलाखती

‘भारतात असलेली भाषांची विविधता हा कमीपणा नव्हे, तर ते आपले सामर्थ्य आहे. भाषा वेगळ्या असल्या, तरी संस्कृती एकच आहे. वेगवेगळे भाषक नागरिक एकत्र आले, तरच आपण महान होऊ. त्यासाठी भारतीय भाषांतील साहित्य अन्य भारतीय भाषांमध्ये अनुवादित होणे, अत्यंत गरजेचे आहे,’ अशी भूमिका ज्येष्ठ संस्कृत साहित्यिक डॉ. सत्यव्रत शास्त्री, काश्मिरी भाषेत कविता रचणारे डॉ. रेहमान राही आणि उडिया भाषेतील साहित्यिक डॉ. सीताकांत महापात्र व डॉ. प्रतिभा राय या चार ज्ञानपीठविजेत्या साहित्यिकांनी मांडली. हिंदी, संस्कृत, इंग्रजी, काश्मिरी आणि उडिया या भाषाभगिनींतील साहित्याची सुरेख झलक अनुभवता आली.

विषय कुठून मिळतात, असा प्रश्न विचारल्यावर डॉ. प्रतिभा राय यांनी अजिबात विलंब न लावता ‘जिंदगी से’ असे उत्तर दिले. ‘रोजच्या जीवनातून मला साहित्याचे विषय मिळतात. ते आतून येतात आणि लिहायला भाग पाडतात. ‘याज्ञसेनी’ ही कादंबरी मानववादी आहे, स्त्रीवादी नाही’, ‘विश्वशांती हा या कादंबरीचा विषय आहे. महिलांना समान मानवी हक्क मिळाले पाहिजेत. लेखकाची स्वतःची भाषा नसते. विषय, स्थान, काल आणि पात्र याच्या आधारे तो भाषा वापरतो. ज्यांना बोलायचे असते, पण जे बोलू शकत नाहीत, अशांचा आवाज म्हणजे साहित्य,’ असे विचार डॉ. राय यांनी व्यक्त केले.

‘मी अनेक संमेलनांना गेले; पण मराठी भाषेचा हा उत्सव मी पाहिलेला सर्वांत मोठा आहे. यू आर सेलिब्रेटिंग लँग्वेज, सेलिब्रेटिंग कल्चर अँड सेलिब्रेटिंग इंडिया. अनेक भाषा ही आपली ताकद आहे,’ अशा शब्दांत डॉ. राय यांनी संमेलनाचे कौतुक केले. ‘एखादी भाषा किती लोक बोलतात, हा भाषेचे महत्त्व मोजण्याचा मापदंड होऊ शकत नाही,’ असे मतही त्यांनी मांडले.

‘संस्कृत ही सर्व भारतीय भाषांना जोडणारी भाषा आहे. तिला संस्कृत हे नाव कधी मिळाले, हा अभ्यासाचा विषय आहे. पण सुमारे हजार वर्षे ती लोकभाषा होती. तिला कोणत्याही जातिधर्मांचे बंधन नव्हते. त्यामुळे या भाषेचा अभ्यास केला, तर प्रत्येकाला आपली भाषा समजून घ्यायला मदत होईल,’ असे डॉ. सत्यव्रत शास्त्री म्हणाले. ‘भारतीय भाषांतील साहित्यांचे आदानप्रदान झाले, तर आपण त्याला भारतीय वाङ्मय अशी संज्ञा देऊ शकतो. त्यासाठी प्रत्येक भाषेतील उत्कृष्ट साहित्यकृतींचे अन्य भाषांत अनुवाद व्हायला हवेत. म्हणून प्रत्येक विद्यापीठात स्वतंत्र अनुवाद विभाग (ट्रान्स्लेशन ब्यूरो) स्थापन करायला हवेत,’ अशी सूचना करून आंध्रभागवतम् या तेलगू महाकाव्यातील काही भाग डॉ. शास्त्रींनी सादर केला.

काश्मिरी भाषेतील कवी डॉ. रेहमान राही यांनी भाषेच्या एकरूपतेची गरज आपल्याला पडलेल्या स्वप्नाची कथा सांगून व्यक्त केली. ‘दिवसभराच्या प्रवासानंतर मी जेव्हा काल रात्री झोपलो, तेव्हा मला स्वप्न पडले. मी या व्यासपीठावरून मराठीत बोलत असून, उपस्थित रसिकांनी काश्मिरी भाषेत दाद दिली, असे त्यात दिसले. हे स्वप्न पूर्ण झाले, तर खूप आनंद होईल,’ असे डॉ. राही यांनी सांगताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांनी साहित्यरसिकांचा उल्लेख ‘जुबाँ के आशिक’ अशा काव्यमय शब्दात केला आणि भाषेचा हा उत्सव आवडल्याचे नमूद केले. काश्मिरी ही फार जुनी भाषा असून ऋग्वेदातील काही शब्द काश्मिरी भाषेत सापडत असल्याचेही त्यांनी सांगितले. काश्मिरातील अस्वस्थ वातावरणाचा साहित्यनिर्मितीवर काय परिणाम होतो, असे विचारल्यावर, ‘फूलों की खुशबू और बारूद की बदबू अशा दोन्हींचा अनुभव दररोज अनुभवायला मिळतो; मात्र हा जीवनाचा भाग असून, आजचा काश्मिरी युवक भाषेबद्दल जागरूक आहे,’ असे ते म्हणाले.

‘ डॉ. राही, तसेच डॉ. सीताकांत महापात्र या दोघांचे इंग्रजी भाषेवरही प्रभुत्व आहे; मात्र ते दोघेही आपल्या मातृभाषेतून साहित्यनिर्मिती करतात. अनुवाद हा उद्याचा रस्ता आहे. बहुभाषकता हा अभिमानाचा विषय आहे; पण समस्याही आहे. कारण साहित्य अनुवादित होत नाही, तोपर्यंत दुसऱ्या भाषेतील नागरिकांना ते कळत नाही. आज भारतीय वाचकांना फ्रेंच, ग्रीक साहित्य माहिती आहे; पण अन्य भारतीय भाषांतील साहित्य फारसे माहिती

नाही,’ अशी खंत डॉ. महापात्र यांनी व्यक्त केली. ‘जीवनात आपण सूर्योदयापासून भांडण्यापर्यंतच्या गोष्टी अनुभवत असतो. त्यातील वेगळेपण ओळखण्यास कविता मदत करते. ती विचारांना अवकाश देते. आयुष्य सोपे नाही, हे त्यातून कळते,’ असे डॉ. महापात्र यांनी सांगितले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सत्यव्रत शास्त्री (संस्कृत), रेहमान राही (काश्मिर), सीताकांत महापात्रा, प्रतिभा राय (उडिया) या ‘ज्ञानपीठ’ प्राप्त लेखकांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यानंतर मंगला खाडिलकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. यानिमित्ताने हे लेखक आपापल्या भाषेत उत्तरे देत होते... त्या-त्या भाषेत कविताही सादर करत होते. त्यामुळे संमेलनात साहित्याचे ‘अखिल भारतीय’ स्वरूप अनुभवायला मिळाले आणि या लेखकांची भारतीय भाषांबाबतची तळमळही.

## तरुणांनी ‘बोअर’ही झाले पाहिजे

“तरुणांनी सतत अभ्यास करावा किंवा मौजमजा करावी, असले कोणतेही सल्ले न देता, तरुणांनी थोडे ‘बोअर’ झाले पाहिजे,” असा अकल्पित सल्ला ‘यूथ आयकॉन’ लेखक चेतन भगत यांनी दिला. बोअर झालात, तरच नवनिर्मिती होऊ शकते, याचे भान आणून चेतन यांनी तरुणांमध्ये चेतना जागविली. ‘महाराष्ट्रात वाचनसंस्कृती मोठ्या प्रमाणात जोपासली जाते. माझ्या पुस्तकांना सर्वाधिक वाचक हे मराठीच आहेत. आता तर मी महाराष्ट्राचा रहिवासी झालो आहे,” असे सांगत चेतन भगत यांनी मराठीचे गोडवेही गायले.

आघाडीचे लेखक म्हणून नावलौकिक मिळविलेले चेतन भगत यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात युवकांशी संवाद साधला.

तरुणांच्या मनातील प्रश्न चेतन जोशी आणि सोमनाथ पाटील यांनी त्यांना विचारले.

आपण कोणीतरी श्रेष्ठ आहोत, याचा वागण्यात - बोलण्यात जराही अभिमान न बाळगता चेतन यांनी प्रत्येक प्रश्नाला दिलखुलास उत्तरे दिली. तरुणांची एवढी प्रचंड गर्दी पाहून भरावलेले भगत यांना ‘सेल्फी’ घ्यायचा मोह आवरला नाही. त्यांनी थेट व्यासपीठावरूनच सेल्फी घेत उपस्थितांची मने जिंकली.

सुरुवातीला त्यांनी मराठीतून प्रेक्षकांशी संवाद साधला. ‘प्रेमाला नसते

भाषेचे कुंपण, तेथे केवळ मनाचे गुंफण' असे सांगत त्यांनी भावना व्यक्त केल्या.

''काहीतरी नवीन करायचे असले तर पहिल्यांदा आयुष्यात कधीतरी बोअर झाले पाहिजे. बोअर झालात, की आपोआप काही तरी नवीन केले जाते; पण सध्याचे तरुण बोअर झाले, की फेसबुक, ट्विटर किंवा व्हिडिओ गेम खेळतात. तंत्रज्ञानाचे फायदे आहेत, तसे तोटेही आहेत. आमच्या वेळी करमणुकीची साधने नसायची. त्यामुळे बोअर झालो की पुस्तके वाचायचो. बागेत फिरायला जायचो. आता तसे घडत नाही,'' अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.

''मनात काहीतरी कल्पना निर्माण होण्यासाठी पुस्तके वाचली पाहिजेत. पुस्तक वाचताना मनात त्याबाबतची कल्पना निर्माण होते; पण फेसबुक, टीव्ही पाहताना तुमच्या मनात कल्पना निर्माण होत नाही, मग नवनिर्मिती होणार कशी?', असा सवाल त्यांनी केला.

लेखनाकडे कसे वळलात, या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी भूतकाळातील आठवणी जागवल्या. ते म्हणाले, ''मला लेखक वगैरे व्हायचे नव्हते. मी पंजाबमधील एका मध्यमवर्गीय कुटुंबातला. दहावीत जेमतेम ७६ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण, त्यामुळे प्रत्येक जण माझी 'औकात' काय, हे दाखवून द्यायचा. मी तर एसटीडी बूथ चालविण्याचे स्वप्न बाळगले होते. तीन ते चार एसटीडी बूथ झाले की सर्वकाही मिळाले, हे होते माझे स्वप्न!''

... मग लेखक कसे झालात, असा प्रश्न येताच, त्यांनी आयुष्यातील पुढील वाटचालीवर प्रकाशझोत टाकला. ते म्हणाले, ''मी आयआयटीमध्ये प्रवेश घेतला आणि इंजिनिअर झालो. एका बँकेत नोकरीला लागलो. बँकेतील बॉस फार कडक होते. मी कामात गुंतलो आहे, असे त्यांना भासविण्यासाठी काहीतरी काम करत राहायचो; पण प्रत्यक्षात मी काम करत नसायचो, तर काहीतरी लिहीत असायचो. तोपर्यंत मी लेखक होईन, याची पुसटशी कल्पनाही नव्हती. त्यातूनच माझे पहिले पुस्तक तयार झाले. ते छापण्यासाठी पहिल्यांदा प्रकाशक मिळत नव्हते. एक प्रकाशक भेटले आणि पहिले पुस्तक हातोहात खपले. तेव्हा प्रथम जाणीव झाली, की आपल्याला लिहिता येते आणि मग नोकरी सोडून लेखन करायचेच ठरवले.''

लेखनावरच जगायचे, हा निर्णय झाल्यावर कुटुंबातून कशी प्रतिक्रिया उमटली, या प्रश्नाला भगत यांनी खुसखुशीत शैलीत उत्तर दिले. ''मी नोकरी

सोडली आणि सासूकडून वेगळाच सूर आला. माझी पत्नी ही तमिळनाडूतील आहे. ती नोकरी करणार आणि मी फक्त लेखनावर जगणार म्हटल्यावर हा काहीतरी 'स्कॅम' आहे, असेच सासूला वाटले; पण आपला निर्णय चुकला नाही. प्रत्येकाने आपल्या मनाला काय वाटते त्याप्रमाणे काम केले पाहिजे,'' असे त्यांनी सांगितले.

सध्या नवीन काय लिहीत आहात, हा सवाल आल्यावर भगत यांनी लेखनात कोणकोणती पथ्ये पाळतो, हे आवर्जून निदर्शनास आणून दिले. ''माझ्या कथेतील नावे ही श्रीकृष्णाची असतात. मी कधीही कथेत ड्रग्ज वगैरे बाबी लिहीत नाही. माझ्या लेखनातील अर्धे वास्तव आणि अर्धे काल्पनिक असते. 'थ्री इडियट्स' मधील रांचो, चतुर आणि राजू ही पात्रे वास्तवातील आहेत. आता मी एक मुलगी कसा विचार करते, यावर आधारित कथानक लिहीत आहे. क्राइम विषयावर लिहावेसे वाटते; पण अद्याप लिहिलेले नाही. लहान मुलांसाठी काहीतरी लिहिणार आहे,'' असेही ते म्हणाले.

## अध्यक्षीय भाषण -

सांस्कृतिक मानदंडाची संकल्पना व्यापक हवी

पिंपरी येथील ८९व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपल्या लेखी अध्यक्षीय भाषणात दहशतवादापासून ते शेती, राजकारण, आंतरराष्ट्रीय समाजकारण, धर्मनिरपेक्षता अशा विविध मुद्द्यांवर सविस्तर विवेचन केले. त्याचा गोषवारा...

मराठी संस्कृतीचे मानदंड म्हणून काहींनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यासह वीर सावरकर, महात्मा फुले, फुले-शाहू-आंबेडकर यांना तर काहींनी हेडगेवार-गोळवलकरांना घोषित केले आहे. एवढ्या फळ्या-चिरफळ्या करून मराठी संस्कृती जगायची कशी? काही मूठभर लोकांनी श्रद्धेवर मात करीत मानदंड म्हणून महापुरुषांच्या, संतांच्या फळ्या पाडण्याचा प्रयत्न केला आहे. हे चुकीचे आहे. सांस्कृतिक मानदंडाची संकल्पना व्यापक व वस्तुनिष्ठ निकषांवर हवी.

राज्यात १० लाख हेक्टरवर ऊसपीक असताना, त्यापैकी केवळ २ लाख हेक्टरवरील उसालाच ठिबक सिंचनाने पाणी दिले जाते; उर्वरित ८ लाख हेक्टरावरील पाणी त्यामुळे वाया जाते. सरकार याबाबत गंभीर नसल्याने सूक्ष्म सिंचन योजनेची अंमलबजावणी होत नसल्याचे वास्तव

आहे. 'पाणी तेथे ऊस आणि ऊस तेथे कारखाना' या सूत्राऐवजी पाण्याचा पत्ता नसतानाही 'पुढारी तेथे साखर कारखाना' हे सूत्र कुणाच्या शंभर पिढ्यांच्या ऐतखाऊपणाच्या स्वार्थासाठी राबवले जातेय? कारखाना विकत घेताना व नंतर मोडीत काढताना होणाऱ्या आर्थिक भ्रष्टतेवर महाकाव्ये निर्माण होतील. शेतकऱ्यांचा विश्वासघात करणारे व्यापारी, दुकानदार, त्यांची शेती गहाण ठेवून व्याजात मारणारे सावकार कायद्याच्या राज्यात मोकाट का व कसे? ब्राह्मणशाही, भांडवलशाही, जागतिकीकरणातील नवी साम्राज्यशाही यांच्या रगाड्यात कृषी व्यवस्थेची वाट लागली आहे.

सरकार चालविणाऱ्या आजवरच्या सर्व मंत्र्यांनी आपले खरेखुरे आत्मचरित्र लिहावे. त्यामुळे जनतेचे प्रबोधन होऊन सत्य समोर येईल आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. राजकारण्यांचे आत्मचरित्र आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचा संबंध आहे, हे नाकारून चालणार नाही.

मराठी लेखकांनी आंतरराष्ट्रीय वास्तवाचे आकलन करून त्यानुसार आपल्याला बदलल्याशिवाय ज्ञानपीठ व नोबेलसारख्या पुरस्कारांची अपेक्षा ठेवता येणार नाही.

धर्म, समाज, संस्था, संघटनांनी महापुरुषांची विभागणी करून त्यांना जात-धर्म-पंथनिहाय केले आहे. त्यामुळे सांस्कृतिक दुफळी माजली आहे. जातीच्या चौकटीत महापुरुषांना बंदिस्त करून सत्याच्या नावे असत्याची दुकानदारी समाज का खपवून घेत आहे? महापुरुष हे कोणाएका जातीचे, धर्माचे असतात का? असतील तर ते महापुरुष कसे? वेगवेगळ्या कालखंडात महापुरुष जन्माला आले आणि त्यांनी मानवी समाजाच्या कल्याणासाठी कार्य केले. त्यामुळे त्यांना असे विभागणे चुकीचे आहे. विविध जात-धर्मांत जन्मलेल्या प्रतिभावंत कलावंतांनी जातीच्या, जन्मसंदर्भाची गुलामी मोडीत काढून सेक्युलर जाणिवा जपल्या पाहिजेत आणि त्या वाढविल्या पाहिजेत.

एम. एफ. हुसेन यांची शोकांतिका, तसलिमा नसरीनच्या सांस्कृतिक कोंडमाऱ्याची सत्यकथा, असीम त्रिवेदींच्या चित्रकलेची मुस्कटदाबी, लोककलावंत गदर यांचे भोगलेपण अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा बोजवारा उडाल्याची प्रचिती देतात. त्यामुळे सत्यावर आधारित इतिहासलेखन, अभिव्यक्तिस्वातंत्र्य वर्तमानात कठीण झाले आहे. दहशतवाद हा फक्त जागतिक व मुस्लिम संघटनांचाच नाही, तर तो सर्व जातिवाद्यांचा आहे.

शिवाय राजकीय दहशतवादसुद्धा आहेच.

दादरी प्रकरण, कलबुर्गी हत्या यांमुळे लेखकांनी पुरस्कारवापसी केली. हा त्यांच्या स्वातंत्र्याचा भाग आहे. पण लेखक-विचारवंतांचे सामर्थ्य लेखणीत आहे. त्यामुळे त्यांनी समाजाचे, सरकारचे प्रबोधन करून संवाद साधून त्यानंतर संघर्षाची भूमिका घ्यायला हवी होती, मात्र तसे न झाल्याने, लेखकांमध्ये फूट पडली आणि काँग्रेसप्रणीत, भाजपाप्रणीत लेखक अशी लेखणीची बदनामी झाली.

परिवर्तनासाठी आयुष्य वेचणाऱ्या महात्मा गांधी यांना परिवर्तनवादी प्रवाहात, विद्रोही चळवळीत मानाचे तर सोडाच, नामाचेही स्थान मिळाले नाही. भारताचा नकाशा ओलांडून जगाच्या इतिहासात वंदनीय ठरलेले गांधी मार्क्स-फुले-आंबेडकरांच्या परिवर्तनाच्या प्रवाहात अस्पृश्य का ठरवले गेले, याचा विचार करणे गरजेचे आहे.

हिंदी मुशायऱ्यात मुस्लिम स्त्रियांचा वाढलेला सहभाग आणि त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरताना, मराठी कविता व साहित्य विश्वात मात्र मुस्लिम स्त्रियांचे वाङ्मयीन कर्तृत्व फारसे नसावे, ही चिंताजनक बाब आहे. नव्या प्रतिभावंतांच्या कथावाङ्मयासाठी नव्या ऊर्मींचे व नव्या जाणिवेचे समीक्षकही हवेत. त्याशिवाय लेखकांचे वाङ्मयीन मूल्य अधोरेखित होणार नाही. समीक्षकांच्या तुटवड्याने अनेक मराठी कथाकार यथार्थ मूल्य-मापनापासून दूर राहिले, ही सद्य:स्थिती आहे.

## शरद पवार यांची चौफेर टोलेबाजी

‘‘आपल्याकडे मराठीचा आग्रह धरण्याऱ्यांची मुले इंग्रजीचा अवलंब करतात, त्यामुळे मराठी कुंठित होते की काय, अशी भीती वाटते. शासनाने व शिक्षण विभागाने पुढाकार घेऊन प्राथमिक शिक्षणापासूनच मराठी विषय सक्तीचा करण्याची आवश्यकता आहे,’’ असे स्पष्ट मत माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केली.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी पहिल्याच सत्रात पवार यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ही मुलाखत झाली. ज्येष्ठ राजकीय अभ्यासक व माजी आमदार उल्हास पवार, नांदेडच्या रामानंद तीर्थ विद्यापीठाचे माजी कुलगुरू जनार्दन वाघमारे व कवी फ.मुं. शिंदे यांनी एकामागून एक विचारलेल्या प्रश्नांना शरद यांनी तितक्याच समर्पकतेने व संयमाने उत्तरे दिली. या

नवं कोरं

TBC च्या सभासदांना निम्म्या किंमतीत

# द गन्स ऑफ नॅव्हारन




मूळ लेखक
ॲलिस्टर मॅक्लीन

अनुवाद
अशोक पाध्ये

किंमत - ३५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

दुसऱ्या महायुद्धात 'खेरोस' या छोट्या बेटावर १२०० ब्रिटिश सैनिक अडकून पडले होते. हे बेट तुर्कस्तानच्या जवळ होते. त्यांना सोडवायला जाणाऱ्या बोटींना नॅव्हारन बेटावरील महाकाय तोफांचा अडथळा होता. त्या तोफा त्यांच्या समोरच्या समुद्रातील कोणतेही जहाज सहज बुडवू शकत होत्या. नॅव्हारनवर एक भक्कम किल्ला होता. तिथे जर्मन व इटालियन सैन्य होते. अशा या तोफा नष्ट करायला मूठभर माणसांची तुकडी बेटाच्या मागच्या कड्यावर चढून वर पोचली.

खेरोस बेटावरील सैनिकांना सोडविण्यास येणारे ब्रिटिश आरमार, तोफांचे त्यावर धरले जाणारे नेम आणि त्या नष्ट करण्यासाठी पुढे सरकलेली ती मूठभर घातपात्यांची तुकडी यांच्यात शर्यत लागली. शेवटी कोण जिंकले?

मुलाखतीतून पवार यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या इतिहासापासून ते सध्याच्या राजकीय वास्तवापर्यंतचा प्रवास सर्वांपुढे मांडला.

मराठीबद्दल बोलताना त्यांनी जागतिकीकरणाच्या रेट्यात प्रादेशिक भाषांवर विपरीत परिणाम होत असल्याचे मान्य केले. स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर हा निर्णय तेथील मराठी माणसावर सोपवावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

आपल्या कुटुंबापासून ते दिल्लीच्या राजकारणापर्यंत सर्वच अंगाने जीवनपट उलगडून दाखविताना राजकीय व सामाजिक मर्मांवर बोट ठेवले आणि त्यावरील उपायही सुचविले. 'सार्वजनिक जीवनात वावरत असताना जनतेशी सुसंवाद साधण्याची कला आपण यशवंतरावांकडून शिकलो', असे सांगतानाच सत्तेत असल्यावर जनतेच्या हितासाठी कठोर निर्णय कसे घ्यायचे असतात, याचा पाठ त्यांनी नवागतांना दिला. त्याचबरोबर स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा हा अमराठी लोकांचा असल्याचे नमूद करत तेथील मराठी माणसाच्या बाजूने आपण आहोत, अशी भूमिका मांडली.

आपल्या विद्यालयीन जीवनाविषयी बोलताना पवार म्हणाले, ''तेव्हा सर्व विषयांत ३५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला सायकल बक्षीस मिळणार होती. मी फारसा हुशार नव्हतो; पण नापास होणार नाही, याची काळजी घेत होतो. त्यावर्षी मला सायकल बक्षीस मिळाली होती.''

''विदर्भात मराठी भाषकांएवढीच हिंदी भाषकांची संख्या आहे. तेथे काही अपवाद वगळता मराठी व्यक्तीच निवडून येते. त्यामुळे जनतेचा कौल साधारण मराठी माणसाकडेच आहे. तरीही माझा तेथील जनतेला सल्ला असेल की, राजकारण्यांना बळी न पडता स्वत: निर्णय घ्यावा,'' असे पवार म्हणाले.

महाराष्ट्र आणि पंतप्रधानपद

लालबहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर पंतप्रधानपदाची संधी यशवंतराव चव्हाण यांनी कशी दवडली आणि त्या ठिकाणी तुम्ही असतात तर काय केले असते, या प्रश्नावर बोलताना पवार म्हणाले, ''पाकिस्तानला युद्धात हरविल्यानंतर ताश्कंद येथे करार झाला, त्यासाठी रशियाने मध्यस्थी केली होती. ज्या दिवशी करार झाला, त्याच रात्री पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे झोपेत निधन झाले. चव्हाणसाहेब त्यांचा मृतदेह घेऊन दुसऱ्या दिवशी दिल्लीला पोचले. त्या वेळी संसदीय समितीची बैठक झाली. बैठकीत पुढील

पंतप्रधान कोण, याविषयी चर्चा झाली. साहेबांकडे विचारणा झाली, तेव्हा त्यांनी आपला निर्णय हा इंदिरा गांधी यांच्यावर अवलंबून असल्याचे सांगितले. इंदिरा गांधी यांनी थेट आपल्याला चव्हाणसाहेबांचा पाठिंबा आहे आणि आपण पंतप्रधान होण्यास तयार आहोत, असे सांगितल्याने यशवंतरावांची आणि पर्यायाने महाराष्ट्राची पंतप्रधानपदाची संधी हुकली.'' मूळ प्रश्नात 'या जागेवर तुम्ही असतात, तर काय केले असते' याचे उत्तर पवार यांनी मोठ्या खुबीने टाळल्याने जनतेला खरे उत्तर मिळाले.

## बालसाहित्याचा दर्जा मुलांनीच ठरवावा

सध्याचे बालसाहित्य सकस की निकस हे ठरविण्याची जबाबदारी मोठ्यांनी घेण्यापेक्षा ती लहानग्यांवरच सोपवायला हवी. जे सकस आहे ते टिकेल आणि जे निकस आहे ते कालौघात नष्ट होईल. या पार्श्वभूतीवर सध्या उपलब्ध असणारे बालसाहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी कुणा एका घटकाची नसून, त्यासाठी बालक, पालक, शिक्षक, लेखक आणि प्रकाशक या घटकांनी एकत्र येण्याची गरज असल्याची भूमिका संमेलनाच्या व्यासपीठावर 'आजचे बालसाहित्य व रंगभूमी सकस आहे का?' या विषयावर उपस्थित बालसाहित्यकारांनी आपली मते व्यक्त केली. ज्येष्ठ साहित्यिक विश्वास वसेकर यांच्या खुसखुशीत निवेदनाने कार्यक्रमात रंगत आणली. 'बोबड्या बोलातील आणि उपदेशपर या दोन लेखन प्रकारांमध्ये आजचे बालसाहित्य अडकून पडले आहे. कॉम्प्यूटर आणि आधुनिकीकरणामुळे आजची बालकांची पिढी चिकित्सक झाली आहे. त्यांना जे पटेल, रुचेल असे साहित्य देण्यात काही अपवाद वगळता बालसाहित्यकारांची आजची पिढी अपयशी ठरली आहे' असे कठोर शब्दांत सुरेश सावंत यांनी सुनावले.

'मुलांना काही नवे पर्याय मिळाले, तर त्यांच्या वाचनबुद्धीला प्रेरणा मिळेल. त्यामुळे लेखकाने नवे पर्याय शोधावेत. पालकांना आवडणाऱ्या पुस्तकांची जबरदस्ती मुलांवर करू नये. मुलांना हवी ती पुस्तके जरूर आणून द्या; पण त्यातील माहिती विचारून त्यांना जाच करू नका. पुस्तके वाचताना मुलांच्या समोर उभे राहायचे की बाजूला, हे पालकांनी ठरवावं. पालकांनी आपले लहानपण मुलांवर कधीही लादू नये. त्यांना त्यांची वाचनस्पेस द्या,' या शब्दांत राजीव तांबे यांनी बालसाहित्यावर प्रकाश टाकला. 'सध्याच्या

बालनाट्यांचे बाजारीकरण झाल्यामुळे ती मुलांच्या मानसिकतेशी आणि वास्तवाशी मेळ खाणारी नाहीत, असेही तांबे म्हणाले. ‘लहानग्यांवर प्रभाव टाकण्याची किमया बालरंगभूमी करू शकते. नाटक ही फावल्या वेळेत करण्याची कृती नसून, तिच्याकडे पुरेसे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे,’ असे मत बालरंगभूमीवर ३५ वर्षांहून अधिक काळ कार्यरत असणाऱ्या ‘नाट्यशाला’ संस्थेच्या डॉ. कांचन सोनटक्के यांनी व्यक्त केले.

बालसाहित्याचा कॅनव्हास वाढला असून, साहित्यिकच तिथपर्यंत पोहोचण्यात कमी पडत असल्याची खंत बालसाहित्यकार रमेश तांबे यांनी व्यक्त केली. त्यांनी सादर केलेल्या ‘किती मजेमजेचे घडले, जेव्हा इवलासा मी झालो; नाकात सुईच्या मी, बिनधास्त झोपी गेलो,’ या कवितेने उपस्थित लहानग्यांसह मोठ्यांनाही हसण्यास भाग पाडले. स्वाती राजे यांनीही बालविश्वाच्या अभिव्यक्तीचा वेध घेतला.

गेल्या दहा ते १५ वर्षांत सर्वच क्षेत्रांत, विशेषत: विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रगती झाली आहे. आजचे पालक विंडोज ९५च्या जमान्यात आहेत, तर मुले विंडोज १० च्या विश्वात रमली आहेत. त्यामुळे पालकांनीच मुलांची अभिरुची लक्षात घेऊन स्वत:मध्ये बदल घडविण्याची आवश्यकता आहे, असे एकूण मत दिसले.

## दलित साहित्यात बदलाचे प्रतिबिंब

‘जात, वर्ण,वर्ग या आधारे कोणत्याही क्षेत्रात संधी नाकारली जात असेल तर त्याला विरोध व्हायला हवा. कालचे दलित साहित्य नकारात्मक होते. आता त्यात बदलत्या सामाजिक राजकीय अस्तित्वाचे प्रतिबिंब पडलेले दिसते,’ असे प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार, साहित्यिक प्रा. दत्ता भगत यांनी ‘बदलते सामाजिक-राजकीय अस्तित्व आणि दलित व ग्रामीण साहित्य’ या परिसंवादाच्या समारोपप्रसंगी केले.

दलित आणि ग्रामीण साहित्याने वेदना, विद्रोह त्याचप्रमाणे वर्तमानाशी चालणारा संघर्ष टिपला. काळ बदलला तसे या साहित्याचे विषय बदलू लागल्याचे मत वक्त्यांनी व्यक्त केले. परिसंवादात समीक्षक डॉ.रा.रं.बोराडे, प्रकाश खरात, अतुल लोंढे, माजी मंत्री व वारणा उद्योग समूहाचे अध्यक्ष विनय कोरे,सांगलीचे जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी सहभाग नोंदवला.

प्रा. भगत म्हणाले, 'जन्माने दलित असलेल्याने, जन्माने ग्रामीण असलेल्याने लिहिलेले म्हणजे दलित किंवा ग्रामीण साहित्य, असे नाही. कर्मठ घरात जन्मलेल्यांनीही डॉ. आंबेडकरांची चरित्रे लिहिल्याचे ध्यानात घ्यायला हवे. या देशातील मानववंशशास्त्रज्ञांनी, वैज्ञानिकांनी येथील सर्व जण एकाच वंशाचे असल्याचे सिद्ध केले आहे. आपण ते वैज्ञानिक वास्तव केव्हा स्वीकारणार, हा खरा प्रश्न आहे.' दलित साहित्याचा विचार केला असता १९६०-७० च्या दशकात विद्रोहाची मोठी भूमिका मांडल्याचे त्यात दिसते. हे साहित्य आक्रस्ताळे असल्याचा आरोप त्या काळात झाला', ही पार्श्वभूमी अतुल लोंढे यांनी मांडली.

खरात म्हणाले, ''दलित साहित्यातील प्रणेते बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ यांच्याशी चांगला स्नेह असल्याने त्यातील विविध प्रवाहांची चांगली माहिती झाली. बागूल यांनी मांडलेली नकार, विद्रोह आणि मानवता ही दलित साहित्याची त्रिसूत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवरच आधारित आहे.

कोरे म्हणाले, 'सहकार चळवळीने महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला; मात्र, त्यातील दोषांवरच चर्चा झाली. या चळवळीवर सकारात्मक लिहिले गेले नाही.'

बोराडे म्हणाले, 'विसाव्या शतकातील सहाव्या दशकात ना. धों. महानोर यांनी, 'या नभाने या भुईला दान द्यावे, जोंधळ्याला चांदणे लगडून यावे' सारखी रचना सादर केली. आता शेतकरी संकटात आहे. कोलमडलेला आहे. त्याला हात देऊन कसे उभे करतो, याकडे लक्ष द्यावे लागणार आहे.'

## तरुणाईला अभिव्यक्तीची ओढ

काळ बदलला, माध्यमे बदलली तरी तरुणाईची व्यक्त होण्याची प्रेरणा कायम आहे आणि कायमच राहील; मोठ्यांनी तिच्या भवितव्याची चिंता करण्याचे कारण नाही, असा सूर ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात 'आजची तरुणाई : काय वाचते? काय लिहिते?' या परिसंवादात व्यक्त करण्यात आला.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे उपमंडपात रंगलेल्या या परिसंवादाचे अध्यक्षस्थान श्रीपाद अपराजित यांनी भूषविले. प्रसिद्ध लेखक राजन खान, प्रा. राजेंद्र मुंडे, जुई कुलकर्णी आणि कैलास इंगळे या व्यक्तींनी भाग घेतला.

प्रा. मुंडे म्हणाले, 'आजची तरुण पिढी टेक्नोसॅव्ही आहे. या पिढीला तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अत्याधुनिक संवाद साधने उपलब्ध आहेत. माध्यमे बदलली, तरी ही  पिढी वाचत आहे. त्या त्या काळातील माध्यमावर तरुण स्वार होत असतात. आजच्या आयटीमधील तरुणांना फँटसीची ओढआहे. अनुवादित साहित्याकडेही त्यांचा कल दिसून येतो. अनेक तरुण धाडसाने आपले म्हणणे मांडताना दिसतात. त्यांची भाषा हायब्रीड आहे. त्यांच्या पुस्तकांची नावेही वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण असतात. त्यावरून त्यांच्या लिखाणातील जोरकसपणा दिसून येतो. आजची पिढी सकस लिहिते आणि तेच तिचे सामर्थ्य आहे.'

जुई कुलकर्णी म्हणाल्या, 'तरुणाई फेसबुक, व्हॉट्स ॲप किंवा किंडलवर वाचते. त्यांच्या वाचनात क्वांटिटी असली, तरी क्वालिटी असतेच असे नाही. फक्त इथे लिहिणारे सर्व स्तरांतले असतात. ते पेशाने लिहिणारे असतीलच असे नाही. या माध्यमात दादही थेट व लगेच मिळते. अट्टल वाचणारे मात्र मुद्रित पुस्तके वाचणे सोडत नाहीत. आजच्या तरुणाईला अनुवाद वाचायला आवडतात. त्यातून मराठी माध्यमातून शिकलेल्या पिढीला इंग्रजीतील पुस्तकांचे मराठी अनुवाद म्हणजे जगाची उघडलेली खिडकी वाटते. इंग्रजीतील तत्त्वज्ञान वाचायला आवडते. चेतन भगतसारखा लेखक चटपटीत लिहितो, सोपे इंग्रजी लिहितो, म्हणून तो तरुणाईला आवडतो. सोशल मीडियामुळे समाजातले बरेच भेद नष्ट झाले. ते सपाटीकरण लेखनाच्या बाबतीत स्वागतार्ह आहे.'

कैलास इंगळे यांनी आजच्या तरुणाईच्या माध्यमांची अनोखी ए टु झेड अशी 'एबीसीडी'च सादर केली. राज्य साहित्य-संस्कृती मंडळाने नव्याने लिहिणाऱ्या तरुणाईचे पहिले पुस्तक काढावे, अशी मागणी त्यांनी केली.

श्रीपाद अपराजित यांनी तरुणाईच्या अभिव्यक्तीविषयी सकारात्मक सूर लावला. विदर्भातील अनेक लहान गावांतून आलेल्या मुलांच्या सकस लेखनाचे दाखले त्यांनी या वेळी दिले. आजच्या तरुणाईचे समाजभान हरपलेले नाही, असे प्रतिपादन करताना ते म्हणाले, 'मोबाइल हे आजच्या पिढीचे अस्त्र आहे. त्यांना त्यांचे आक्रंदन सोशल मीडियावर मांडता येते, ही चांगली गोष्ट आहे. गांधी-आंबेडकर यांचे आजच्या तरुण पिढीला आकर्षण आहे. बाजीराव मस्तानी सिनेमानंतर 'राऊ' कादंबरीचा खप वाढला. तरुणाईचे मार्ग वेगळे आहेत; पण त्यांची जाणण्याची उत्सुकता कायमच

आहे. आजची पिढी संभ्रमावस्थेत आहे, असे वाटत असले तरी नव्या संकल्पना रुजवण्यातही हीच पिढी आघाडीवर आहे.’

## नितीन गडकरी : ‘साहित्यविचाराने दिशा द्यावी’

‘देशात प्रत्येकाला लिहिण्याचे आणि बोलण्याचे स्वातंत्र्य आहे; परंतु त्याहीपुढे जाऊन साहित्य विचाराने देशाला दिशा देण्याचे कार्य करावे,’ अशी अपेक्षा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि जहाजबांधणीमंत्री नितीन गडकरी यांनी साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी व्यक्त केली. लेखकांच्या सहिष्णू-असहिष्णुतेच्या मुद्द्यावर ते काय मते मांडतात, याबाबत उत्सुकता होती. त्याचा प्रत्यक्ष उल्लेख गडकरी यांनी टाळला, तरी या मुद्द्यांपेक्षा देशाचा विकास आणि दिशा यासाठी साहित्यिकांनी योगदान देण्याची गरज व्यक्त केली.

‘साहित्याच्या माध्यमातून राष्ट्रीय जडणघडण महत्त्वाची आहे,’ असे नमूद करून ते म्हणाले, ‘भावी पिढीवर संस्कार करण्याचे महान कार्य साहित्य करीत असते. त्यातून संस्कार आणि वैयक्तिक जडणघडण होते. समाजात चांगले-वाईट, सुख-दुःख, अंधार-प्रकाश आहे. यापुढेही राहील. त्या अनुषंगाने प्रत्येकाला लिहिण्याचे, बोलण्याचे स्वातंत्र्य आहे; परंतु जात, पंथ, भाषा, धर्म, व्यक्ती, यापेक्षा मोठा विचारच देशाला पुढे नेऊ शकतो. ते सामर्थ्य साहित्यिक, विचारवंत यांच्यामध्ये आहे.’

ते म्हणाले, ‘साहित्यात त्या-त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती प्रतिबिंब उमटत असते. मधल्या काळात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्या वेळी तेथील लेखकांनी शेतकऱ्यांच्या वेदनेवर परखडपणे लिहिले. नेमक्या शब्दांत लिहिले. व्यथा मांडल्या. त्यावरून पुढे चित्रपट निघाला. जनजागृती झाली. अशा प्रकारचे वेदना देणारे साहित्य व्यक्तीच्या मनाला संवेदना देते. या शब्दांतून भविष्याचा इतिहास घडण्याची ताकद मिळते.’

एका लेखकाचा संदर्भ देत गडकरी म्हणाले, ‘डोळ्यामागे विचार दडलेले असतात. सत्ता शक्तिशाली असेल, तर ती डोळे नष्ट करू शकते; परंतु डोळ्यांमागे दडलेले-मनामध्ये आणि डोक्यामध्ये असलेले विचार नष्ट करण्याची ताकद जगातील कोणत्याही सत्तेत नाही. म्हणूनच आपला जो इतिहास आहे, त्याहीबद्दल लिहून ठेवले गेले आहे, की इतिहास हा रक्ताच्या

थारोळ्यात, घामाच्या आणि परिश्रमांच्या थेंबाने लिहिला गेला; पण परिश्रमांचे आणि रक्ताच्या थेंबांचे रूपांतर जेव्हा शब्दांत झाले, तेव्हा तो जाज्वल्य इतिहास भविष्यातील पिढीला प्रेरणाच देत राहिला. त्यामुळे साहित्यिकांचे कार्य समाजनिर्मितीचे आणि सामाजिक, आर्थिक परिवर्तनासाठी प्रेरणा देण्याचे आहे.'

'देशाला दिशा देण्याची ताकद महाराष्ट्रांमध्ये आहे. येथील साहित्यिकांच्या विचारधारांमध्ये आहे. संत आणि महापुरुषांच्या विचारांचा वारसा हा साहित्याच्या माध्यमातून संस्कारित रूपांतरित करून व्यक्तित्व निर्माण करण्याची प्रक्रिया निर्माण होईल, त्यातूनच आदर्श समाजाची निर्मिती होईल. साहित्याचे विचार मूल्यांशी जुळणारे आहेत. त्यातून प्रगल्भता आलेली आहे. समाजातील गुणात्मक परिवर्तनामध्ये शिक्षण आणि साहित्यिकांची भूमिका महत्त्वाची आहे. या देशात विचारभिन्नतेचा प्रश्न नाही; विचारशून्यतेचा आहे. त्यामुळे प्रवाहाची चिंता न करता आपले प्रामाणिक विचार मांडावेत,' असे आवाहन गडकरी यांनी केले.

'असहिष्णुतेचे वातावरण निर्माण करणाऱ्या शक्तींचा निषेध करून अशा विघातक शक्तींचा बीमोड केंद्र आणि राज्य सरकारने करावा,' असा ठराव संमेलनाच्या समारोप सत्रात मांडला. त्या वेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित नव्हते. त्यामुळे संमेलनस्थळी कुजबूज होती; परंतु 'सकाळी नियोजित कामानिमित्त बांगलादेशाच्या सीमेवर होतो. धुक्यामुळे विमानाला विलंब झाला. त्यामुळे संमेलनाच्या समारोपप्रसंगी वेळेत उपस्थित राहू शकलो नाही,' असा खुलासा गडकरी यांनी आपल्या भाषणात केला.

'साहित्यात अनेक प्रकार आहेत. आपण सगळे साहित्यिक आहात. आपल्या सगळ्यांचा तो अधिकार आहे. त्यातील कोणता प्रकार कशा प्रकारे मांडायचा, लिहायचा आणि समाजाकरिता उपयुक्त आहे किंवा नाही, हे ठरविण्याचे सर्व अधिकार तुमचे आहेत. राजकीय माणसांनी शक्यतो राजकारण सोडून बाकीच्या गोष्टींत ढवळाढवळ करू नये,' असा दृष्टिकोन गडकरी यांनी व्यक्त केला.

## सीमाभाग केंद्रशासित प्रदेश करावा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकेरी उल्लेख केल्याने वादात सापडलेले संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी संमेलनाच्या समारोप सोहळ्यातही

भारतीय सरकारला सीमाभागाच्या प्रश्नावरून कानपिचक्या दिल्या. 'केंद्रातील आणि राज्यातील सरकारने मनात आणले, तर सीमाभागाचा प्रलंबित प्रश्न सुप्रीम कोर्टाच्या बाहेरही सुटू शकतो,वादग्रस्त सीमाभाग केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर केला जावा,' अशी मागणी त्यांनी केली.

अध्यक्षांच्या समारोपाच्या भाषणाने संमेलनाची सांगता होते. डॉ. सबनीस यांनी ही परंपरा खंडित करून प्रमुख पाहुणे जावेद अख्तर यांच्या भाषणापूर्वीच आपले विचार व्यक्त केले. संमेलनाच्या समारोप सत्रातील खुल्या अधिवेशनात सीमाप्रश्नाविषयी ठराव नेहमीच केला जातो; परंतु तरीही या भागात राहणाऱ्या नागरिकांना जिवंतपणी आणि मेल्यानंतरही नरकयातना भोगाव्या लागतात, याचे वास्तव सुरुवातीलाच व्यक्त करून, 'हा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा,' असा आग्रह डॉ. सबनीस यांनी सांस्कृतिकमंत्री विनोद तावडे यांच्याकडे धरला.

'राज्यात भाजपचे सरकार आहे, केंद्रात भाजपचे सरकार आहे; मग संवाद का करत नाही?' अशी विचारणा करत, 'वादग्रस्त सीमाभाग हा केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर केला जावा,' असे त्यांनी सुचवले. 'राज्यातील सर्व खासदारांनी त्यासाठी पाठपुरावा करावा,' असे सांगत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना, केंद्र सरकारला हे कोडे घालावे, असे सूचित केले. समारोप करताना, छापील भाषणात व्यक्त केलेल्या मुद्द्यांचा धावता परामर्श घेत, 'महापुरुषांच्या नावे केली जाणारी दुकानदारी थांबवा,' याचा पुनरुच्चार केला; महाराष्ट्राचा प्रादेशिक इतिहास लिहिण्यासाठी जिल्हा स्तरावरील स्थानिक इतिहासकारांनी, तज्ज्ञांनी पुढे यावे,' असे आवाहनही त्यांनी केले.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या लाजिरवाणी बाब

या संमेलनात शेतकऱ्यांची मुलं सहभागी आहेत. न्या. रानडे यांचे 'अभिजनवादी वर्ग आणि प्रवाह आणि महात्मा फुले यांचा बहुजनवादी विचार, दोन्ही प्रवाह एकत्र आले आहेत. त्यामुळे हे शेतकऱ्यांचे संमेलन आहे, अशी भूमिका साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी 'संमेलन सर्वसमावेशक आहे काय' या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केली.

संमेलनाध्यक्ष सबनीस यांची मुलाखत चक्रधर दळवी, संतोष शेणई, प्रसन्न जोशी यांनी घेतली. त्या वेळी सबनीस म्हणाले, ''संमेलनाध्यक्षपदाच्या

भाषणात शेतकऱ्याबद्दल बोलायचे राहून गेले. या संमेलनात लेखक, कवी म्हणून सहभागी झालेल्यांमध्ये अनेक शेतकरी आहेत. सरकार कोणाचेही असो, शेतकऱ्यांच्या यशोगाथा त्यांनी पुढे आणल्या पाहिजेत. त्यांना उपेक्षित ठेवू नये. सर्वांचा पोशिंदा असलेला शेतकरी रोज आत्महत्या करतो, ही लाजिरवाणी बाबा आहे. सुमारे सहा लाख हेक्टर जमीन ठिबक सिंचन पाण्याखाली, तर आठ लाख हेक्टर जमिनीला पाणी मिळत नाही. किमान एक एकर जमिनीला बारमाही पाणी देण्याची व्यवस्था करा. सामान्य शेतकऱ्यांना पाणी मिळू द्या. राज्यघटनेतील कलम ३२३ ब नुसार कृषी ट्रिब्युनल सुरू करा. शेतमालाला भाव द्या. शेतकऱ्यांसाठी संसदेत कायदा बनवा, तर आत्महत्या थांबतील.'' ''साहित्य ही संकल्पना अभिजनांपुरती मर्यादित न राहता, बहुजनांपर्यंत पोहोचावी. दलित, शेतकरी, आदिवासी यांचाही सहभाग असावा,'' अशी भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

''मराठवाड्यात जातिवाद असताना आपण त्या भागातील असूनही परिवर्तनवादी विचार कसे जोपासले?'', या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले, ''बालपणापासून घरातच आध्यात्मिक विचार रुजले गेले. मुस्लिम, दलित समाजाचे लोक अवतीभोवती होते. बहुजन समाजात वाढलो. त्यातूनच मानवतावादी विचार रुजले. महापुरुष साध्य की साधन हे ठरवणे महत्त्वाचे आहे. सर्व मानवजातीची उत्तरे एकाच महापुरुषाकडे असती, तर वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळे महापुरुष तयार झाले नसते. त्यामुळे भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील विद्वान यांच्यात व माझ्यात सीमारेषा आहे. मानवी कल्याण हेच साधन मानणारे सर्व महापुरुष मला आदरणीय आहेत. महापुरुषांच्या कर्तृत्वाला श्रद्धा आणि अंधश्रद्धेने झाकोळले आहे. मूळचा महापुरुष दिसेनासा झाला आहे. स्वार्थासाठी महापुरुषांची वाटणी केली जाते. त्यामुळे महापुरुषांचा ध्येयवाद काळवंडला जातो.''

''त्यांचे अनुयायीच त्यांचा ध्येयवाद काळवंडतात. नेते दुकानदारी करतात. एका महापुरुषाची एक चळवळ, एक गट; तर दुसऱ्या महापुरुषाचा दुसरा गट, मठ तयार होतो. स्वार्थासाठी महापुरुष वापरले जात असल्याने, महाराष्ट्राचे वाटोळे झाले आहे.''

'संमेलनापूर्वी आणि संमेलनानंतर सबनीस कोण असा प्रश्न उपस्थित झाला होता, त्यावर काय सांगाल?' असे विचारले असता ते म्हणाले, ''संमेलनाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी

सबनीस कोण, हे स्पष्ट केले आहे. राजकारण्यांबद्दल माझ्या मनात रोष होता. त्यात शरद पवारही होते. परंतु त्यांच्याबद्दलची माझी भूमिका बदलली आहे. संमेलनाध्यक्षपदाच्या निवडीवरून होणारे वाद कसे मिटवता येतील, यावर पवार यांनी तोडगाही सुचवला आहे.''

मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नांतून साहित्य क्षेत्रातील योगदान, समीक्षा, एकांकिका, वगनाट्य, शहिरी तसेच आदिवासी समाजासाठी केलेले काम, कामगार चळवळींशी आलेला संबंध यांतून त्यांचा जीवनपट उलगडत गेला.

संमेलनाध्यक्षांनी मांडलेले प्रमुख मुद्दे

महापुरुषांच्या कर्तृत्वाला श्रद्धा आणि अंधश्रद्धेने झाकोळले आहे. मूळचा महापुरुष दिसेनासा झाला आहे. स्वार्थासाठी महापुरुषांची वाटणी केली जाते.

सर्व मानवजातीची उत्तरे एकाच महापुरुषाकडे असती, तर वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळे महापुरुष तयार झाले नसते.

सदाशिव पेठेत राहत असलो, तरी मी सदाशिवपेठी होणार नाही, हे प्रकर्षाने लक्षात ठेवतो.

## ठरावांतून सरकारला सवाल

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत म्हणून साहित्य महामंडळाने घुमान येथे झालेल्या संमेलनात राज्य सरकार आणि केंद्र सरकारचे कौतुक केले होते; मात्र, गेल्या वर्षभरात हा दर्जा मिळावा म्हणून सरकारने काहीही हालचाली केल्या नाहीत. त्यामुळे महामंडळाने 'असे का' असा प्रश्न सरकारला ठरावाच्या माध्यमातून विचारला आहे.

## जावेद अख्तर : भाषा हीच 'दीवार' बनली आहे

''समाजाची आकांक्षा समजण्याचे भाषा हे माध्यम असताना तीच 'दीवार' झाली आहे,'' अशा शब्दांत ख्यातनाम गीतकार जावेद अख्तर यांनी दाहक वास्तवावर बोट ठेवले. ''भाषा हीच दुसऱ्या भाषेची अडसर ठरत असून, मराठी साहित्य दुसऱ्या भाषेत अनुवादित झालेले नाही. त्यामुळे मराठीची मोठी साहित्य परंपरा देशापर्यंत पोहोचली नाही. मी लेखक, कवी अशी घमेंड साहित्यिकांमध्ये निर्माण झाली.'' ''साहित्य, कला, संस्कार,

नवं कोरं    **TBC च्या सभासदांना निम्म्या किंमतीत**

# अ टाइम टु किल

मूळ लेखक
जॉन ग्रिशॅम

अनुवाद
बाळ भागवत

किंमत - ६००/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




क्लॅन्टन, मिसिसिपी; दोन दारूड्या आणि अत्यंत वाईट प्रवृत्तीच्या माणसांमुळे दहा वर्षांच्या एका छोट्या मुलीचे आयुष्य पार उद्ध्वस्त होते. गोरे लोक बहुसंख्येने असणाऱ्या शहरातल्या लोकांना या भयानक घटनेमुळे मोठाच धक्का बसतो.

मग त्या मुलीचा कृष्णवर्णीय पिता ॲसॉल्ट रायफल मिळवतो आणि त्या पाशवी गुन्हेगारांना ठार मारतो.

पण हे मिसिसिपी राज्य असते; घृणास्पद अत्याचार करणारे गोरे लोक कितीही नादान असले तरी एका काळ्या माणसाने त्यांचा खून करणे तिथे मान्य होत नाही.

पुढचे दहा दिवस कु क्लस क्लान, जळते क्रूस, खून, धाकदपटशा, स्नायपर रायफल्स या गोष्टी क्लॅन्टनच्या रस्त्यांवर जबरदस्त दहशत निर्माण करतात.

स्वत:च्या अशिलाचा जीव वाचवण्याच्या प्रयत्नात असलेला बचाव पक्षाचा तरुण ॲटर्नी ब्रिगॅन्स याला स्वत:चा आणि कुटुंबाचा जीव वाचवायचीही धडपड करावी लागते.

परंपरा हे आपण विसरलो आहोत,'' अशी टीकाही त्यांनी केली.

'मराठी साहित्य, संमेलनासारखे महासंमेलन पाहिले नाही,' असे सांगून अख्तर म्हणाले, ''गेल्या साठ वर्षांत काही केले नाही, असे आपण म्हणतो. आपल्याला विरोध करायची जास्त सवय आहे. पण देश स्वतंत्र झाला तेव्हा आपल्याकडे गिरण्यातून सूतदेखील निर्माण होत नव्हते. आता देश कुठल्या कुठे पोहोचला आहे. मात्र, या स्पर्धेत आपण साहित्य, कला, संस्कार, परंपरा हे विसरलो आहोत. हा दोष आमच्या पिढीचा आहे. आमच्या पूर्वीच्या पिढीने स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. आम्हीच साहित्याची परंपरा विसरलो, पुढच्या पिढीकडे आम्ही ती दिली नाही; पण आताची पिढी साहित्य, कलेकडे वळत आहे.''

भाषेच्या संदर्भात ते म्हणाले, ''भाषा हीच भाषेचा अडसर ठरत आहे. मला उर्दू, हिंदी यापलीकडचे विश्व माहीत नव्हते. मुंबईत आल्यामुळे मला विजय तेंडुलकर आणि पु.ल. देशपांडे यांचे साहित्य समजले. मराठी साहित्याबाबत मी अनभिज्ञ होतो, याची मला लाज वाटते. देशात असंख्य लोकांना हे साहित्य माहीत नाही. मराठी साहित्य भाषांतरित न झाल्याने इतर भाषिकांपर्यंत पोहोचू शकलेले नाही. मराठीतील साहित्य दुसऱ्या भाषेत जावे व दुसऱ्या भाषेतील साहित्य मराठीत यावे, यासाठी प्रयत्न करावेत.'' 'भाषा ही भिंत झालेली असताना अनुवाद ही खिडकी आहे,' असे त्यांनी सुचवले.

## असहिष्णुतेचे वातावरण सुन्न करणारे

देशातील वाढत्या असहिष्णुतेवर साहित्य संमेलन या साहित्यिकांच्या व्यासपीठाने शिक्कामोर्तब केले. 'देशातील वाढते हल्ले, असहिष्णुता, लेखक, कलावंत व कार्यकर्त्यांच्या हत्या, तसेच डॉ. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे आणि कलबुर्गी यांच्या खुन्यांचा शोध न लागणे, हे सारे भयावह व सुन्न करणारे आहे,' असा ठराव करून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने या प्रकारांचा तीव्र निषेध नोंदवला. संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांना मिळालेल्या धमकीचा मात्र ठरावात उल्लेख नाही.

समारोप सत्रात विविध ठराव करण्यात आले. देशातील वाढत्या असहिष्णुतेच्या विरोधात निषेध नोंदवण्यासाठी अनेक साहित्यिकांनी पुरस्कार परत केले होते. असहिष्णुतेच्या मुद्द्यावरून देशात वातावरण तापले असताना साहित्याच्या व्यासपीठावरून या प्रकारांची दखल घेतली जाणार

का, याबाबत उलट-सुलट चर्चा होती. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने असहिष्णुता विरोधबाबत ठराव करून सरकारकडे निषेध नोंदवला आहे.

'केंद्र आणि राज्य सरकारने विघातक शक्तींचा बीमोड करून आश्वासक व निर्भय वातावरण निर्माण करावे,' अशी मागणी संमेलनातून करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या अभिजात दर्जाबाबत केंद्र सरकारने त्वरित निर्णय घ्यावा, मराठी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढवून शाळांना नियमित अनुदान द्यावे, कवी नामदेव ढसाळ यांच्या पूर या गावी लोकोपयोगी वास्तू सरकारने उभी करावी; तसेच वर्षभरात निधन झालेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहणारा व संमेलनाच्या आयोजनाबाबत स्वागताध्यक्ष डॉ. पी.डी. पाटील यांचे अभिनंदन करणारा ठराव संमेलनात मांडण्यात आला.

'शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही देशातील व राज्यापुढील मोठी समस्या आहे. पुढील काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत, यासाठी आवश्यक ती उपाययोजना त्वरित करावी,' अशी विनंती ठरावाद्वारे करण्यात आली आहे.

'सीमावासीय मराठी भाषकांवर ५० वर्षे अत्याचार होत आहेत. न्यायालयात शासनाने बाजू मांडून सरकारने सीमावासीयांना न्याय मिळवून द्यावा आणि बेळगाव, निपाणी, भालकी, बिदर, संतपूर व औराद हा कर्नाटकव्याप्त भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करावेत,' असा ठरावही मांडण्यात आला.

## मराठीचे पुत्र आम्ही, तिचे पांग फेडू

पिंपरीतील ज्ञानोबा-तुकोबा नगरीत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि डॉ. डी.वाय पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. पी.डी.पाटील यांचे मनोगत

माझ्या आणि संमेलनाचं संयोजन करणाऱ्या डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या वाटचालीतला हा एक महत्त्वाचा असा ऐतिहासिक क्षण आहे. गेल्या वर्षीचे संमेलन संत नामदेवांच्या वास्तव्यानं पुनीत झालेल्या घुमान येथे भरले होते आणि हे संमेलनही अशीच गौरवशाली परंपरा

लाभलेल्या पिंपरी-चिंचवड नगरीत भरत आहे. ज्ञानेश्वर-तुकारामांच्या वास्तव्याचा दरवळ आणि त्यांच्या आळंदी-देहूचे सान्निध्य लाभलेली, ही पुण्यभूमी. महासाधू मोरया गोसावींच्या आध्यात्मिक कार्याची ही कर्मभूमी. छत्रपती शिवरायांच्या अलौकिकत्वानं भारलेली मावळ्यांच्या परिसरातील शिवभूमी, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या मानवमुक्तीचं महान कार्य करणाऱ्या महामानवांच्या वास्तव्याच्या आणि विचारांच्या प्रवाहात न्हालेली ही समताभूमी, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यांच्यासारख्या नेत्यांच्या राष्ट्रकार्याचा, क्रांतिवीर चाफेकरांसारख्या देशभक्तांच्या बलिदानाचा वारसा लाभलेली ही वीरभूमी, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे अशांसारख्या दीपस्तंभांची ही दिशाभूमी, आधुनिक तीर्थक्षेत्र असलेल्या औद्योगिकतेचें मोठं केंद्र असलेली उद्यमभूमी आणि अध्यात्म आणि जेथे विज्ञान-तंत्रज्ञान हातात हात घालून चालतात, अशी ही संगमभूमी. अशा भूमीत भरणाऱ्या या साहित्य संमेलनाला एक विशेष ऐतिहासिक औचित्य लाभलं आहे. मानवमुक्तीचं महान कार्य करणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीचं हे वर्ष आहे. पिंपरी-चिंचवडपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या तळेगावमध्ये डॉ.बाबासाहेबांच्या वास्तव्याच्या आणि कार्याच्या प्रारंभाच्या स्मृती आजही ताज्या आहेत. मानवमुक्तीसाठी कार्य करण्याची चिरकाल प्रेरणा त्यांचं जीवनकार्य देत राहील. जीवनाच्या सर्व क्षेत्रांना आणि पैलूंना साहित्य कवेत घेतं.

ज्ञानपीठ पुरस्काराच्या मानकऱ्यांमधील हयात अशा प्रतिभावंत ध्वनिचित्ररूपातील मुलाखती असोत, साहित्यिकांच्या कार्यकर्तृत्वाची झलक दर्शवणारी ‘साहित्यिक दर्पण’ ही रोजनिशी असो, पाच साहित्यिक-सांस्कृतिक संस्थांना ‘गौरवनिधी’ देणं असो किंवा ग्रामीण भागातील एक हजार शाळांना दिलेली भरघोस ग्रंथदेणगी असो, ही सारी आमच्या या उद्दिष्टाच्या मार्गावरची कृतिशील पावलं आहेत. केवळ चार दिवसांच्या सोहळ्यापुरता आमचा विचार मर्यादित नाही; आमची भूमिका अधिक सखोल आणि गंभीर आहे, हे यातून स्पष्ट होऊ शकेल. प्रत्यक्ष कृतीतूनच त्यांचा उच्चार व्हावा, अशी आमची इच्छा आहे.

आज एकीकडे सगळं जग हे गाव होण्याची किमया विज्ञान-तंत्रज्ञानानं केली आहे. जागतिकीकरणानं सगळं विश्व, भारतातील समाजजीवन ढवळून

निघत आहे. साहित्याचे परिमाण आणि त्यामुळे स्वरूपही त्यामुळे बदलत जाणे अपरिहार्य आहे. दुसरीकडे जगातील अशांतता, अस्वस्थता आणि त्यामुळे येणारी अस्थिरता आणि हिंसकताही वाढत आहे. अशा वेळी तर साहित्यानं मानवतेचे दीप प्रकाशमान ठेवण्याची पूर्वी कधी नव्हती एवढी गरज आहे. माणसाला माणूस बनवतं ते शिक्षण, असं भारताचे माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणत असत. मानवताधर्माचा उद्गार साहित्यातून सातत्यानं घुमत आला आहे. संवेदनशीलता हा या धर्मातून येणाऱ्या सामाजिक जाणिवेचा गाभा आहे. साहित्याचा सोहळा साजरा करताना आम्ही ही जाणीव विसरू शकत नाही. आपल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी संमेलनात जमा होणाऱ्या निधीत आमची भर घालून एक कोटी रुपये आम्ही नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशनला देत आहोत. आमच्या दृष्टीनं हा झगमगाटाचा विषय नाही, आंतरिक तळमळीचा आविष्कार आहे.

## साहित्यनगरीत विद्यार्थ्यांची लगबग

साहित्य संमेलन म्हणजे साहित्याचा कुंभमेळा. विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी साहित्यनगरी गजबजून गेली होती. शिक्षक उत्साहाने विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रुजवत होते.

शिक्षण आणि साहित्याचा जवळचा संबंध असतो. वाचनाचा संस्कार शाळेत रुजतो, असे म्हणतात आणि वाचनाची चळवळ येथूनच खऱ्या अर्थाने बहरते. कथाकथन, कविसंमेलन, बालआनंद मेळावा अशा विविध कार्यक्रमांची मजा विद्यार्थ्यांनी लुटली.

इयत्ता पाचवी ते बारावीतील विद्यार्थी संमेलनात सहभागी झाले होते. ज्ञानप्रबोधिनी गुरुकुल, निगडी या शाळेच्या शिक्षिका राजश्री मराठे २५ विद्यार्थ्यांना घेऊन आल्या होत्या. साहित्य संमेलनाचा अनुभव विद्यार्थ्यांना प्रथमच मिळाला. उद्घाटन, समारोप सोहळा; तसेच कथावाचन, कविसंमेलन असे कार्यक्रम विद्यार्थ्यांना अनुभवता आले.

## पुरस्कारवापसी का?

‘पुरस्कार परत करणे, हे कोणा एका राजकीय पक्षाच्या विरोधात नाही, तर सरकारला जाग आणण्यासाठीच पुरस्कार परत करण्याची भूमिका

घेतली,’ असा सूर व्यक्त झाला. ‘लेखकाला सुरक्षितता मिळण्याची गरज आहे’ असेही लेखकांनी नमूद केले.

‘मराठी वाङ्‌मय क्षेत्रातील पुरस्कारांचे सामाजिक व सांस्कृतिक स्थान’ या परिसंवादात पुरस्कारवापसीवर चर्चा झाली. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात संजय भास्कर जोशी, मंगेश नारायणराव काळे, डॉ. मनोज तायडे, किशोर बेडकीहाळ, ‘लोकराज्य’ मासिकाचे संपादक सुरेश वांदिले यांनी भाग घेतला. महेंद्र मुंजाळ यांनी सूत्रसंचालन केले.

‘पुरस्कारांमुळे लेखकांना प्रोत्साहन, प्रेरणा मिळते; मात्र, पुरस्कार आणि सन्मान यांत फरक करायला हवा. लेखकांनी किती पुरस्कार स्वीकारावेत, याचे बंधन घालून घ्यावे. त्याचप्रमाणे संयोजकांनीही पुरस्कारांसाठीचे निकष काटेकोरपणे पाळावेत,’ असे जोशी यांनी सांगितले.

डॉ. तायडे म्हणाले, ‘पुरस्कार देण्यासाठीची चांगली उदाहरणे घालून देण्यासाठी अनेक संस्था आहेत. साहित्यिकही व्यक्तिगत पाळीवर अनेक सामाजिक कार्यासाठी मुक्त हस्ते मदत करीत असतात. अनेक पुरस्कारांनी आजही त्यांचा दर्जा निकषांमुळे टिकवला आहे.’

पुरस्कारांवरून साहित्य जोखले जात असल्याचे काळे यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘सामान्य लेखकाला एखादा पुरस्कार मिळाला, की त्याचे साहित्य चर्चेत येते. पुरस्कारांमुळे करिअर घडते. मात्र, पुरस्कारांसह एकूणच साहित्यिक व्यवहार संशयास्पद आहे.’

बेडकीहाळ म्हणाले, ‘लेखक वाढले तसे पुरस्कारही वाढले आहेत. लेखकाने पुरस्कारांच्या अतिरेकातून बाहेर पडले पाहिजे. साहित्याचे विकेंद्रीकरण झाले तसे पुरस्कारांचेही झाले आहे. पुरस्कार चालत यावेत असे साहित्यिकांचे कर्तृत्व हवे.’

वांदिले यांनी सरकारची बाजू मांडली. ‘‘महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना झाली. अशी स्थापना करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. त्यांच्यापासून आतापर्यंत सर्व मुख्यमंत्र्यांनी साहित्य आणि संस्कृतीला पाठिंबा दिला आहे. सरकारी पुरस्कार देण्याआधी तज्ज्ञांची मते मागविली जातात. समित्याही असतात. त्यात मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते व सरकारी अधिकारी सहभागी असतात. पुरस्कार देणाऱ्यांची आधी स्वीकृती घेतली

जाते. सरकारच्या पुरस्कारावर विरोधी प्रतिक्रिया उमटतही असतील. मात्र, त्यानंतर निर्माण होणारे आनंदाचे, समाधानाचे वातावरण साहित्यिक क्षेत्रात अनेकांनी अनुभवले.''

भावे यांनी विविध पुरस्कार समित्यांतील सदस्यपदाचा अनुभव सांगितला. 'पुरस्कारांतही आता डावे, उजवे असते. मात्र, वाचकांना अस्सल साहित्य कोणते ते माहिती असते. वाचकांनी पुस्तक उचलून धरणे यासारखा उत्तम पुरस्कार दुसरा नाही,' अशी भूमिका त्यांनी मांडली.

'वाचकांचे पाठबळ मिळणे हाच सर्वोच्च पुरस्कार आहे. पुरस्कार लाभल्याने लेखकांना लिहिण्याची ऊर्मी मिळते,' असे मतही नोंदविण्यात आले.

## बालमेळाव्यात गवसले आठवणींचे मोरपीस

अखिल भारतील मराठी साहित्य संमेलनातील बालमेळावा मुख्य मंडपात रंगला. लहानग्यांच्या आठवणीतील मोरपीस बनून राहिला. संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी, कवी संदीप खरे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'मामाच्या गावाला जाऊ या' या बालगीतांच्या आणि नृत्याच्या कार्यक्रमाने लहानग्यांसमवेत मोठ्यांच्याही बालपणाला उजाळा दिला.

'झुक् झुक् झुक् झुक् आगीनगाडी', 'किलबिल किलबिल पक्षी बोलती' या अवीट गोडीच्या बालगीतांनी या रंगतदार कार्यक्रमाची सुरुवात झाली. कृष्णसखा पेंद्याच्या बोबड्या बोलातील गीताने प्रेक्षकांची हसून हसून पुरेवाट झाली. त्यानंतर 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम', 'नाच रे मोरा', या गीतांनी लहानग्यांची वाहवा मिळवली. 'सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल काय' हे धमाल बालगीत सादर करून दिवंगत गीतकार आणि कवी मंगेश पाडगावकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सलील आणि संदीप या जोडगोळीने 'अग्गोबाई ढग्गोबाई,' 'मुंगीबाय' ही गीते सादर केली. शुभंकर कुलकर्णी आणि अन्य बालगायकांनी सादर केलेली एकाहून एक सरस गाणी हे या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. शुभंकर अत्रे, सुहानी धडफळे आणि कार्टून पात्रांच्या आवाजात अभिनेत्री मेघना एरंडे हिच्या खुसखुशीत सूत्रसंचालनाने बालगोपाळांना खिळवून ठेवले. वारणानगरच्या वाद्यवृंदाने सादर केलेल्या कार्यक्रमाने साहित्यरसिक मंत्रमुग्ध झाले.

## कथाकथनाला दाद

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अण्णा भाऊ साठे उपमंडपात सोमवारी कथाकथन रंगले. ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्या अध्यक्षतेखाली हे कथाकथन होणार होते; पण ते उपस्थित राहू शकले नाहीत. ज्योती मोहन पुजारी, विलास सिंदगीकर, एकनाथ आव्हाड, अप्पासाहेब खोत व विनिता ऐनापुरे यांनी यामध्ये भाग घेतला. ज्योती पुजारी यांनी 'बागुलबुवा' ही कथा सादर केली. सिंदगीकर यांच्या कथेला रसिकांची दाद मिळाली. आव्हाड, खोत यांच्याही कथा रसिकांना भावल्या. या कार्यक्रमाला शालेय विद्यार्थ्यांची विशेष गर्दी होती. सिंदगीकर यांच्या कथा व कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट असल्याने त्यांच्या कथाकथनाने विद्यार्थी भारावले. अंधश्रद्धा या विषयावर खुमासदार शैलीतील सादर केलेल्या कथाकथनाने सभागृहात हास्याची कारंजी उडाली.

कॉर्पोरेट लूक

यंदाच्या संमेलनाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य होते, त्याचा कॉर्पोरेट लूक. भव्य रंगमंच, एलईडी स्क्रीन, ध्वनियंत्रणेपासून बाउन्सरची सुरक्षा व्यवस्था, स्वच्छतेसाठी खास कामगार अशी यंत्रणा या ठिकाणी कार्यरत होती. इतर संमेलनामध्ये दिसणाऱ्या बऱ्याच उणिवा या संमेलनात कोठेच दिसल्या नाहीत. कोठेही कचरा नव्हता.

आजवरच्या बहुतेक संमेलनात संमेलनस्थळी धुळीचा अतोनात त्रास होतो, असा अनुभव आहे. या संमेलनात धुळीचा त्रास अजिबात जाणवत नव्हता. मातीवर मुरूम टाकून तो रोलरने समतल करण्यात आला होता. त्यावरही कार्पेट टाकण्यात आले होते.

## ज्ञानाधारित समाजाची उभारणी करणे काळाची गरज - डॉ. काकोडकर

'आपला समाज सुशिक्षित झाला तरी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे,' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केले. मराठी विज्ञान परिषदेच्या सुवर्णमहोत्सवी अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनात 'विज्ञान प्रसार आणि आम्ही' या विषयावरील परिसंवादात व्यक्त केले. या वेळी विज्ञान प्रसाराच्या कार्यातील गेल्या ५० वर्षांतील अनुभव व आठवणी त्यांनी सांगितल्या. सामान्य

लोकांना मराठी भाषेतून विज्ञान अधिक चांगल्या रीतीने समजते हे जाणवल्यावर आपण मराठीतून बोलण्याचा सराव केला, नंतर लोकभाषेतूनच त्यांच्याशी संवाद साधू लागल्याचेही त्यांनी सांगितले. अ. पां. देशपांडे विज्ञान विभागाचे माजी प्रमुख जयंत एरंडे आणि ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. आनंद कर्वे सहभागी झाले होते. सध्या समाजात मोठ्या प्रमाणात स्थित्यंतरे होत आहेत. या बदलांच्या अनुषंगाने विकासाची धोरणे राबवायला हवी. या बदलांच्या अनुषंगाने तयारी करणे आव्हानात्मक असून , यापुढे ग्रामीण भागाला ज्ञानकेंद्रांची जोड देण्याचा प्रयत्न करायला हवा, असे प्रतिपादन डॉ. अनिल काकोडकर यांनी केले.

शहर आणि गाव यांच्या संयोगातून तयार झालेल्या 'सिलेज' या संकल्पनेअंतर्गत तंत्रज्ञानाच्या साह्याने ग्रामीण विकास साधणे अभिप्रेत आहे. या वेळी बोलताना डॉ. काकोडकर म्हणाले की, ग्रामीण विकासात तंत्रज्ञानाच्या साह्याने चांगले कार्य करता येईल. तंत्रज्ञानाचा वापर योग्य दिशेने न झाल्यास तळागाळातील लोकांचे शोषण टळू शकते. ज्ञानाची जोड दिल्यास त्यांची क्षमता दसपटींनी वाढू शकेल नाही, शहरे आणि ग्रामीण भागातील शिक्षणात असणारी विषमता आपल्याला परवडणारी ग्रामीण भागातही ज्ञानाधारित अर्थार्जनाची व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

## समाजाचे निम्मे प्रश्न हे लैंगिकतेशी संबंधित

समाजातील निम्मे प्रश्न हे लैंगिकतेशी संबंधित असून, त्याविषयी कुणी बोलत नाही. या प्रश्नांमुळे महिलांची घुसमट होते. भाकरीच्या प्रश्नाला महापुरुष, तत्त्वज्ञान आणि चळवळ मिळाली; मात्र लैंगिकतेसंदर्भात अशा स्वरूपाचे काम होऊ शकले नाही, असे मत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. हा विषय उलगडताना; व्हॉट्स ॲप आणि फेसबुकमुळे झकमारी वाढली आहे,' असा शब्दप्रयोग त्यांनी केला; मात्र दुसऱ्याच क्षणी 'हे शब्द मागे घेऊन मी माफी मागतो; नाहीतर उद्या माझी गाढवावरून धिंड निघेल,' अशी टिप्पणीही त्यांनी केली.

साहित्यसंमेलनात संतोष शेणई, चक्रधर दळवी आणि प्रसन्न जोशी यांनी सबनीस यांची प्रकट मुलाखत घेतली.

महापुरुष हे साध्य की साधन यामध्ये समाजाचा गोंधळ झाला. स्वार्थासाठी महापुरुष वापरले गेले. त्यांचा ध्येयवाद काळवंडण्याचा पराक्रम

अनुयायी आणि त्यांच्या नावाचे दुकान मांडणाऱ्या नेत्यांनी केला. त्यामुळेच मी कम्युनिस्ट विचार सोडून आंबेडकरी विचारधारेकडे आकर्षित झालो. लाल बावट्यापेक्षाही माणसाचा झेंडा उंच व्हावा असा माझा प्रयत्न असतो, अशी भूमिका सबनीस यांनी मांडली.

विद्रोही चळवळीच्या कार्यकर्त्यांशी माझे मतभेद आहेत; पण निष्ठेबद्दल माझ्या मनात शंका नाही. सतत विद्रोह शक्य आहे का, असा प्रश्न उपस्थित करत सबनीस यांनी रानडेंचा अभिजनवाद आणि फुले, शाहू, आंबेडकरांचा बहुजनवाद या संमेलनाच्या व्यासपीठावर एकत्र आले आहेत, असे सांगितले. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी घटनेनुसार कृषी लवाद निर्माण करावा, लेखकाने लेखणीशी आणि मानवतेशी इमान राखावे, असेही सबनीस म्हणाले. 'सबनीस राजकारणात गेले तर' या प्रश्नांसंदर्भात ते म्हणाले, ''साहित्यकारणात धिंड निघाली, राजकारणात गेलो तर काय होईल हे सांगता येणे अवघड आहे; पण माझ्यासारखा सत्यवादी, पागल आणि अव्यवहारी माणूस राजकारणात राहू शकेल का?''

## सहिष्णुता, असहिष्णुता व्यक्तीनिहाय : वासलेकर

''सहिष्णुता आणि असहिष्णुता यावरून सध्या देशात वाद होत आहे; परंतु या दोन्ही वृत्ती माणसात असतात. फक्त कशाला किती महत्त्व द्यायचे, हे त्या व्यक्तीवर अवलंबून असते. नखं वाढवायची थांबत नाहीत; तोपर्यंत ती श्वापदं असतात; पण ही नखं वेळीच काढली पाहिजेत, कारण ती वाढली तर त्यांचा उपद्रव अधिक होतो,'' अशा शब्दांत 'स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुप'चे अध्यक्ष, लेखक व आंतरराष्ट्रीय घडामोडींचे तज्ज्ञ संदीप वासलेकर यांनी 'सहिष्णुता आणि असहिष्णुता' या विषयावर टिप्पणी केली.

८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात वासलेकर आणि भारताचे अमेरिकेतील वाणिज्यदूत ज्ञानेश्वर मुळे यांच्याशी संवाद साधत मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांनी या दोन्ही मान्यवरांचा जीवन प्रवास उलगडला. वासलेकर म्हणाले, ''चांगुलपणाची चळवळ चालू ठेवणे ही देशाची गरज आहे. लोक टीका करतील, पाय खेचतील, तरीही धोका पत्करायला हवा.''

मराठी भाषेबद्दल बोलताना मुळे म्हणाले, ''मराठी मुलांनी इंग्रजीबद्दलचा न्यूनगंड मनातून फेकून दिला पाहिजे. माझे संपूर्ण शिक्षण

मराठीत झाले आहे; तरीदेखील जगातील १५ राष्ट्रांच्या वतीने पाण्यावरून महायुद्ध होणार का यावर अभ्यास करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली आहे. यावरूनच तुमचे संपूर्ण शिक्षण मराठीत होऊनही जगाचे प्रश्न सोडविण्याची ताकद तुमच्यात असते, हे सिद्ध होते. पण, तरीही इतर परदेशी भाषा आत्मसात करायला हव्यात. मराठीला अभिजात दर्जा मिळायला हवा. देशात दर वर्षी २५० भाषा नष्ट होतात. त्यामुळे आता भाषा टिकविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.''

## ... तर पृथ्वीवरून मानवजात नष्ट होईल!

'माणसासमोर सध्या अनेक धोके उभे असून, पृथ्वी सोडून अन्यत्र राहायला जाण्याची व्यवस्था न केल्यास, पृथ्वीवरील मानवजात स्वत:ला नष्ट केल्याखेरीज राहणार नाही,' असा इशारा विख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांनी दिला. 'पुढील शंभर वर्षांत तरी मानव अवकाशात स्वयंपूर्ण मानवी वसाहत स्थापन करू शकणार नाही. त्यामुळे हा काळ त्याच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचा असेल,'' असे भाकीत हॉकिंग यांनी केले. त्यासाठी आपल्याला मानवजातीसमोरची आव्हाने ओळखावी लागतील आणि त्यानुसार आपले जीवित कायम ठेवावे लागेल, असे हॉकिंग म्हणाले,

मानवासमोर सध्या आण्विक युद्ध, ग्लोबल वॉर्मिंग आणि जनुकीय विरचित विषाणू यांचे आव्हान असेल. ही आव्हाने वाढत आहेत आणि त्यांच्यावर मात करण्यासाठी सध्या तरी माणसाच्या हातात फार काही नाही, असे मत हॉकिंग यांनी व्यक्त केले आहे.

नजीकच्या भविष्यकाळात पृथ्वी नष्ट होण्याचा धोका नसला, तरी पुढील एक हजार ते दहा हजार वर्षांत ती नक्कीच नष्ट होऊ शकते, अशी भीती हॉकिंग यांनी व्यक्त केल्याचे वृत्त 'बीबीसी'ने दिले आहे. या काळात मानवजातीने अवकाशात किंवा अन्य ग्रहांवर राहण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्यामुळे पृथ्वीला काहीही झाले तरी मानवजात कायम राहील, असे हॉकिंग म्हणाले.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीचे शास्त्रज्ञ असूनही हॉकिंग यांनी याच गोष्टींमुळे मनुष्यजमातीला मोठा धोका निर्माण झाल्याचे नमूद केले. विशेषत: विषाणू, कुत्रिम बुद्धिमत्ता आणि ग्लोबल वॉर्मिंग या गोष्टी चिंतेच्या वाटत असल्याचे हॉकिंग यांनी सांगितले.

९वी आवृत्ती

# युगंधर




लेखक
शिवाजी सावंत

किंमत - ४८०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

हजारो वर्षांपासून श्रीकृष्ण भारतीय मन व्यापून दशांगुळे उरला आहे. भारतीय समाज व संस्कृती यांवर त्याचा अमीट असा ठसा उमटलेला आहे. 'श्रीमद्‌भागवत', 'महाभारत', 'हरिवंश' व काही पुराणांत श्रीकृष्णचरित्राचे अधिकृत संदर्भ सापडतात. परंतु गेल्या हजारो वर्षांत त्यावर सापेक्ष विचारांची आणि अतर्क्य चमत्कारांची पुटंच पुटं चढलेली आहेत. त्यामुळे त्याचं 'श्री'युक्त सुंदर, तांबूस-नीलवर्णी, सावळं रूपडं घनदाट झालं आहे, वास्तवापासून शेकडो योजनं दूर दूर गेलं आहे. श्रीकृष्ण हा 'भारतीय' म्हणून असलेल्या जीवनप्रणालीचा पहिला उद्‌गार आहे! त्याच्या चक्रवर्ती जीवनचरित्रात भारताला नित्यनूतन व उन्मेषशाली बनविण्याचा ऐवज ठासून भरला आहे. श्रीकृष्णाच्या जीवनसरोवरातील दाटलेलं शेवाळ तर्कशुद्ध सावधपणे अलगद दूर सारल्यास त्याचं 'युगंधरी' दर्शन शक्य आहे, हे 'मृत्युंजय'कारांनी जाणलं. आणि त्यांच्या प्रदीर्घ चिंतनातून, सावध संदर्भशोधनातून, डोळस पर्यटनातून व जाणत्यांशी केलेल्या संभाषणातून साकारली ही साहित्यकृती – 'युगंधर'!!

अर्थात, आपण आशावादी असून, आपण या धोक्यांवर नियंत्रण मिळवू शकतो, असा विश्वास असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पुढील काळात नव्या शास्त्रज्ञांनी या धोक्यांची जाणीव लोकांना करून दिली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## सुमेध रिसबूड यांच्या 'बावनकशी' कथासंग्रहाला पुरस्कार

''एखादी कथा अथवा कविता जन्माला येते, तेव्हा ती अवस्था वेदनादायक असते. कवितेप्रमाणे कथेलाही विविध अर्थांची वलये असतात. लघुकथा, दीर्घकथा आणि परिणामकारक कथा लिहिणे अवघड असून, चांगले ललित लेखन करणेदेखील आत्मक्लेशाचे असते,'' असे मत लेखिका वृंदा दिवाण यांनी पुणे मराठी ग्रंथालयाच्या  राजेंद्र बनहट्टी कथा पुरस्कार वितरण समारंभात व्यक्त केले. कथालेखक सुमेध वडावाला (रिसबूड) यांच्या, 'बावन्नकशी' या कथासंग्रहाला हा पुरस्कार देण्यात आला. मुकुंद अनगळ, अनुजा कुलकर्णी उपस्थित होते.

दिवाण म्हणाल्या, ''प्रत्येक कथेचा अनुभव निराळा असतो. ललित लेखनात एखादा अनभव लिहिणेही अवघड असते. कारण कथा सुचते तेव्हाच तिचा आकार व भाषा ठरलेली असते. मनात ऊर्मी निर्माण झाली की लेखन जन्माला येते; परंतु कलात्मक भान ठेवणे, हेच लेखकाचे कर्म आहे. चांगली कविता लिहिणे जसे अवघड असते, तसे अगदी ललित लेखन करणेही अवघड आहे.''

वडावाला म्हणाले, ''काल्पनिक लेखनात वास्तवाचा संबंध असतो असे नाही. कल्पकतेने कथेला वळण देण्यास मर्यादा येतात. आत्मकथा हा जीवनाचा आरसा आहे. त्यामुळे ललित लेखकांनी आत्मकथा लेखनाकडे वळावे.'' शरद घाणेकर यांनी प्रास्ताविक केले. सुहास नातू यांनी सूत्रसंचालन केले.

## ब्रिटनमध्ये स्थलांतरितांना इंग्रजीची सक्ती

दीर्घ काळ वास्तव्यासाठी ब्रिटनमध्ये राहणाऱ्या स्थलांतरितांना इंग्रजी भाषेची चाचणी देणे सक्तीचे करण्यात आले आहे. नव्या अटीमुळे त्या देशात राहणाऱ्या अनेक स्त्रियांना हद्दपार व्हावे लागण्याची शक्यता आहे. पंतप्रधान डेव्हिड कॅमेरॉन यांनी हे स्पष्ट केले. या निर्णयाचा सर्वाधिक मोठा फटका

ब्रिटनमधील इंग्रजी न येणाऱ्या हजारो मुस्लिम महिलांना बसणार आहे.

ब्रिटनमध्ये वास्तव्यासाठी आलेल्या स्थलांतरितांच्या पत्नीला डिपेन्डंट व्हिसावर त्या देशात येता येते; मात्र येथून पुढे पत्नी किमान अडीच वर्ष ब्रिटनमध्ये वास्तव्यास असेल, तर तिला इंग्रजी भाषेची चाचणी अनिवार्य असेल आणि संबंधित पत्नी या चाचणीत नापास झाली तर पुढील काळात तिला ब्रिटनमध्ये वास्तव्याचा अधिकार राहणार नाही. तिची रवानगी तिच्या मूळ देशात करण्यात येईल, अशी माहिती कॅमेरॉन यांनी दिली. 'ब्रिटनमध्ये आल्यानंतर अपत्यप्राप्ती झालेल्या पालकांपैकी एकाचे वास्तव्य ब्रिटनमध्ये निश्चित झाले असेल, तर संबंधित अपत्याला आणि एका पालकाला ब्रिटनचे नागरिकत्व मिळेल; परंतु दुसरा पालक, 'जोडीदार अधिवासी कार्यक्रमांतर्गत ब्रिटनमध्ये आला असेल, तर त्याला इंग्रजी भाषेची चाचणी अनिवार्य आहे; अन्यथा त्याला मायदेशी परतावे लागेल. 'जोडीदार अधिवास कार्यक्रमातंर्गत' असलेले नियम अधिक कडक करण्यात येत असून, अडीच वर्षांच्या काळात इंग्रजी भाषेतील सुधारणा पुन्हा तपासण्यात येणार आहे. इंग्रजी भाषेत सुधारणा झाली नाही, तर ब्रिटनमधील वास्तव्य यापुढे निश्चित राहणार नाही. हा नियम कडक असला तरी या देशामध्ये राहायला येणाऱ्यांवरही तेवढी जबाबदारी राहील.'' जोडीदार अधिवास व्हिसा'च्या नियमावलीमध्येदेखील आता इंग्रजी भाषेची चाचणी लागू करण्यात आली आहे. ब्रिटनमध्ये जन्माला आलेल्या मुलांनाही इतर देशांत राहता येणार नाही. त्यामुळे काही प्रकरणांत मायदेशी रवाना होणाऱ्या एका पालकासोबत मुलांना या देशात नेता येणार नाही.

ब्रिटनच्या सरकारने दावा केला आहे की १ लाख ९० हजार मुस्लिम महिलांना नीटसे इंग्रजी येत नाही. त्यातील ३८ हजार महिलांना इंग्रजी अजिबात येत नाही. कॅमेरॉन म्हणाले, 'इंग्रजी भाषा शिकली नाही, तर अनेक संधी कमी होतात. आमच्या देशामध्ये येणाऱ्या लोकांना इंग्रजी येणे आवश्यक आहे,' ही योजना ऑक्टोबरपासून लागू करण्यात येणार आहे. यामुळे ब्रिटनमधील स्थलांतरितांचे जीवन विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ब्रिटनमधील मुस्लिम स्त्रियांना इंग्रजी बोलता यावे, यासाठी इंग्रजी भाषेचे वर्ग चालविण्याची ब्रिटन सरकारची तयारी असून, त्यासाठी दोन कोटी पौंडांचा निधी उभारण्यात येणार आहे. यामुळे कट्टरवाद रोखण्यास

मदत होईल, इंग्रजीचे तुटपुंजे ज्ञान आणि कट्टरवाद यांचा अर्थाअर्थी संबंध नसला, तरी संबंधित समाज अधिक लवचिक होऊ शकेल, असे ते म्हणाले. ब्रिटनमध्ये वास्तव्यास असणाऱ्या २२ टक्के मुस्लिम महिलांना तोडकेमोडके इंग्रजी बोलता येते अथवा इंग्रजी बोलताच येत नाही, असे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट होते.

## आयआयटीच्या प्रवेश परीक्षांमध्ये त्रुटी

आयआयटीसारख्या शिक्षण संस्थांसाठी घेतल्या जाणाऱ्या निवड परीक्षांमध्ये त्रुटी असून, त्याचा अभ्यासक्रम व परीक्षापद्धतही बदलण्याची गरज असल्याचे मत आयआयटी मुंबईचे प्रा. मिलिंद सोहनी यांनी व्यक्त केले. दैनंदिन विषयांकडे दुर्लक्ष करत वैश्विक अभ्यासक्रमांवर भर दिल्याने, राज्यातील शिक्षण प्रणालीवर फार मोठा परिणाम झाला असून यामुळे घोकंपट्टी व खासगी क्लासेसचे पेव फुटल्याची खंतही सोहनी यांनी बोलून दाखवली. डॉ. मनमोहन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील विज्ञान तंत्रज्ञान संस्थांचे योगदान आणि आव्हाने या विषयावर झालेल्या परिसंवादात भाभा अणू संशोधन केंद्राचे डॉ. व्ही. एन. जगताप, एएफआयआरचे संचालक डॉ. सी. डी. माई, आयसीएमआरच्या निवृत्त उपमहासंचालक डॉ. वसंता मुथ्थुस्वामी, आयसीटीचे डॉ. अनिरुद्ध पंडित, पुण्यातील एन. सी. एल. चे डॉ. विवेक रानडे हेही सहभागी झाले होते.

देशभरातील विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्त्वाच्या संस्थांच्या कार्याविषयी चर्चा करण्यात आली. 'सध्या तंत्रज्ञान संस्थांचे केंद्रीकरण झाल्याने, प्रादेशिक समस्यांना यात स्थान उरलेले नसून, त्यांच्या शासन आणि उद्योगांशी सांगड घालणे कठीण झाले आहे. आज निधी देणारे व तो वापरणारे यांच्यात विज्ञानाची एक नोकरशाहीच तयार झाली आहे. अशा शब्दांत संस्थांच्या कारभाराविषयी रोखठोक भूमिका घेत सोहनी यांनी कुतूहल आणि उपयुक्त विज्ञान संशोधनातील समन्वयाची आवश्यकताही व्यक्त केली. या परिसंवादाबरोबर विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे सहसंचालक माधव ढेकणे यांचे 'भारताची अवकाश संशोधनातील गरुडझेप' या विषयावर व्याख्यान झाले. डॉ. माधुरी शानबाग यांनी आपल्या विज्ञानविषयक लेखनातील अनुभवांवर उपस्थितांशी संवाद साधला. तसेच डहाणूकर महाविद्यालयाच्या 'एक्स-प्रिमेंट' या प्रथम पारितोषिकप्राप्त एकांकिकेचे सादरीकरणही करण्यात आले.

## संमेलनाचे पोस्टेज स्टँप

पिंपरीत झालेल्या ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे टपाल तिकीट प्रकाशित झाले असून, प्रसिद्ध अभिनेता स्वप्नील जोशी याने त्याचे अनावरण केले. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात झालेल्या या सोहळ्यात संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील आणि संमेलनाचे समन्वयक सचिन इटकर उपस्थित होते. यापूर्वी घुमान येथे झालेल्या ८८ व्या साहित्य संमेलनाचेही टपाल तिकीट निघाले होते. संमेलनात जमा होणारा भरीव निधी विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या विकासासाठी देण्यात येणार असल्याबद्दल स्वप्नीलने डॉ. पाटील यांचे अभिनंदन केले.

या देखण्या तिकिटावर संमेलनाचे बोधचिन्ह वापरण्यात आले आहे. त्यात दोन घोडेस्वारांनी हातात धरलेल्या फाउंटन पेनच्या निफावरील उद्योगनगरीची दोन प्रतीकात्मक चक्रे उठून दिसतात.

## सावित्रीबाई फुले पुरस्कार

‘सरकारने अपंगांना दिव्यांग हा नाव शब्द दिला आहे आणि तो आपण सर्वांनी स्वीकारला पाहिजे. तसेच, अपंग म्हणून शारीरिक मर्यादा असल्या तरी स्वत:ला दिव्यांग करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सावित्रीबाई फुले आणि आनंदीबाई जोशी यांची आठवण ठेवली पाहिजे,’ असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेविका रेणूताई गावस्कर यांनी केले.

सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीच्या निमित्ताने ‘पु.ना.गाडगीळ आणि सन्स’ तर्फे जान्हवी जोशी, नूपुरा किर्लोस्कर, प्रेरणा सहाणे आणि नेहा कुलकर्णी या सावित्रीच्या लेकींचा विशेष सत्कार रेणूताई गावस्कर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पु. ना. गाडगीळ आणि सन्सचे सतीश कुबेर, अमित मोडक, किरण जावळकर, अमित जाधव आणि पीयूष शहा उपस्थित होते. ‘सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीच्या लेकींचा सन्मान आम्ही करीत आहोत,’ असे जावळकर यांनी सांगितले.

‘‘अपंग आहोत म्हणून मागे न राहता स्वत:च्या क्षमता वाढविल्या पाहिजेत. तसेच, सरकारनेही सुचविलेल्या दिव्यांगाला आपलेसे करून स्वत: कर्तृत्वाने दिव्यांग केले पाहिजे. ‘तळमळीने शिका’ म्हणणाऱ्या सावित्रीबाईंचा आणि परदेशात जाऊन शिक्षण घेतलेल्या पहिल्या भारतीय महिला डॉक्टर

आनंदीबाई जोशी यांच्या कर्तृत्वाची आठवण आपण ठेवली पाहिजे,'' असे गावस्कर यांनी नमूद केले.

जान्हवी जोशी, नूपुरा किर्लोस्कर यांच्या 'ब्ली' या उपकरणास गांधीयन यंग टेक्नॅलॉजी इनोव्हेशन पुरस्कार मिळाला आहे. संगीतकार आणि नृत्य कलाकारांसाठी ब्ली हे विकसित केले आहे. यामुळे कर्णबधिरांना विशेष ठेक्यांच्या आधारे संगीताचा ताल कळतो. भरतनाट्यम् नृत्यांगना प्रेरणा सहाणेने मर्यादा असूनही नृत्य क्षेत्रात तसेच कर्णबधिर असलेल्या नेहा कुलकर्णीनेही ॲनिमेशन क्षेत्रात नाम कमाविले आहे. दोघींनाही त्यांच्या कामगिरीसाठी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सावित्रीच्या लेकींचा सत्कार सोहळ्याला अमित मोडक, किरण जावळकर, रेणूताई गावस्कर, सतीश कुबेर, नेहा कुलकर्णी, प्रेरणा सहाणे, जान्हवी जोशी, नूपुरा किर्लोस्कर उपस्थित होते.

## 'फेसबुक'पेक्षा 'बुकफेस' महत्त्वाचे

'स्क्रीनवरून सरकणाऱ्या मजकुरापेक्षा कागदावरून सरकणारा मजकूर काळजाला भिडतो. त्यामुळे 'फेसबुक'पेक्षा 'बुकफेस' महत्त्वाचे आहे,' असे मत कवी, साहित्यिक प्रवीण दवणे यांनी १७ व्या सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवाच्या उद्‌घाटन समारंभात व्यक्त केले. दि. १ ते ४ जोनवारी २०१६ दरम्यान हा महोत्सव झाला.

पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.डी.पाटील, जिल्हा परिषदेचे अर्थ व शिक्षण समितीचे सभापती अमित कदम, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनीता गुरव आदी प्रमुख उपस्थित होते. 'निसटून जाऊ लागलेली वाचन संस्कृती धरून ठेवण्याचे काम साताऱ्याचा ग्रंथमहोत्सव करतोय, ही आनंददायी बाब आहे,' असे सांगून श्री. दवणे म्हणाले, ''साहित्यिक, कवी, नामवंत वक्त्यांना ऐकणे ही विद्यार्थ्यांसाठी भविष्यकाळाची पुंजी आहे. आमच्या काळी आकाशवाणी ही देववाणी होती. त्या माध्यमातूनच आम्हाला कवींचा, साहित्यिकांचा, त्यांच्या साहित्याचा परिचय झाला. त्यातून नकळत आमच्यावर साहित्याचे संस्कार झाले.'' मोबाईल, इंटरनेटचा अमर्याद वापर धोकादायक आहे. पाहावे तेव्हा लोक मोबाईलमध्ये तोंड खुपसून बसलेले असतात. त्यामुळे विज्ञानसुद्धा शाप ठरेल की काय अशी भीती वाटते, अशी चिंताही श्री. दवणे यांनी व्यक्त केली.

डॉ. पी.डी.पाटील म्हणाले, ''साताऱ्यातील ग्रंथमहोत्सवाबाबत अनेक वर्षांपासून ऐकून होतो. या वर्षी त्याला उपस्थित राहून जवळून पाहण्याचा योग आला. ग्रंथ आपले आयुष्य घडवतात. आई-वडिलांनंतर पुस्तके हेच संस्कार करतात. आयुष्यात आपण काय व्हायचे, हे पुस्तकांमुळे कळते.''

ग्रामीण भागातील नवोदित कलावंतांना हे व्यासपीठ सातत्याने संधी उपलब्ध करून देत असते, हे सातारा ग्रंथमहोत्सवाचे यश आहे.

सातारा जिल्हा परिषद ग्रंथमहोत्सवाच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभी राहील, अशी ग्वाही अमित कदम यांनी दिली. जिल्हा ग्रंथमहोत्सव समितीचे कार्यवाह प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी 'हा ग्रंथमहोत्सव विद्यार्थ्यांसाठी नवे ऊर्जापीठ ठरावे, अशी अपेक्षा मनोगतात व्यक्त केली. प्रास्ताविक शिरीष चिटणीस यांनी केले. सुनीता कदम यांनी सूत्रसंचालन केले. चार दिवसांत १०० स्टॉलमधून एक कोटींची पुस्तके विकली गेली.

## 'फेसबुक' पेज दसहजारी

मोबाइल ॲप, रेडिओ जिंगल, फेसबुक, ट्विटर, मोबाइल, ई-बुक अशा समाजमाध्यमांचा प्रभावी वापर ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात करण्यात आल्याने तरुण वर्ग संमेलनाकडे विशेष आकर्षिला गेला.

'मराठीचे भवितव्य तरुणांच्या हाती असून, त्यांच्याशी त्यांच्याच भाषेत संवाद साधला जात आहे. संमेलनाचा लोगो, त्यासाठी तयार केलेले ॲनिमेशन, संकेतस्थळ, 'साहित्य मित्र' हे मोबाइल ॲप, रेडिओ जिंगल या सर्वांना मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे,' असे स्वागताध्यक्ष डॉ.पी.डी.पाटील यांनी सांगितले. साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह तयार करण्याच्या स्पर्धेत १३० जणांनी भाग घेतला.

या संमेलनासाठी तयार करण्यात आलेली रेडिओ जिंगल्स विविध रेडिओ चॅनेल्स, तसेच यू ट्यूबवरूनही ऐकवण्यात येत आहे. हृषीकेश रानडे आणि मुक्ता जोशी यांनी गायलेले हे एक मिनिटाचे जिंगल केदार परांजपे यांनी संगीतबद्ध केले. याशिवाय संमेलनाच्या ँ.पूॅस्सर्िह.्ज्ल.्ल.ग्ह या संकेतस्थळावर उपलब्ध होते.

संतोष देशपांडे यांनी 'साहित्य मित्र' हे मोबाइल ॲप तयार केले असून, ते डाउनलोड करणाऱ्यांमध्ये पिंपरी-चिंचवडमधील कामगार सर्वांत जास्त

आघाडीवर आहेत. ‘शब्दांगण’ हे शब्दकोडी आणि ‘शब्दभेट’ यातून अवघड मराठी शब्दांचे सोपे अर्थ सांगणे, या दोन्ही सदरांना तरुण वर्गाकडून मोठा प्रतिसाद मिळतो आहे. याशिवाय ‘ज्ञात-अज्ञात’ या विभागात साहित्य, संस्कृती आणि सामान्यज्ञानावर आधारित प्रश्नांना उत्तरे देण्यातही तरुण वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्याने हे ॲप विशेष लोकप्रिय ठरत आहे.

## दिल्लीत ग्रंथोत्सव

जागतिक ग्रंथ प्रदर्शन ९ जानेवारी ते १९ जानेवारी या काळात भारताच्या राजधानीत प्रगती मैदानावर भरले होते. केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांच्या हस्ते या ४३ व्या ग्रंथजत्रेचे उद्घाटन झाले. ‘पाहुणा देश’ म्हणून प्रदर्शनात यंदा चीनला बहुमान मिळाला आहे.

आशिया खंडातील सर्वांत मोठ्या असलेल्या या ग्रंथ प्रदर्शनात ३० देश सहभागी झाले होते. पुस्तक प्रदर्शनासह चर्चासत्रे, नाटक, शास्त्रीय व लोकनृत्ये, कार्यशाळा, लेखकांशी गप्पा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही केले होते. चीनच्या सहभागाबद्दल बोलताना इराणी म्हणाल्या, ‘चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी गेल्या वर्षी भारताचा दौरा केला होता. त्या वेळी पंतप्रधान मोदी व त्यांच्यात करार झाला होता. ग्रंथ प्रदर्शनात चीनच्या सहभागाबाबत चर्चा झाली होती.

भारतातील विविध भाषांमध्ये लेखन करणाऱ्या युवा लेखकांना प्रोत्साहन आणि त्यांचे लेखन प्रकाशित करण्यासाठी प्रदर्शनात या वर्षी ‘नवलेखन’ उपक्रम सुरू केला आहे. याबाबत स्मृती इराणी म्हणाल्या, ‘‘यंदा सहा प्रादेशिक पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. पुढील वर्षी २२ भाषांमधील पुस्तके प्रकाशित करण्यात येतील.’’

## इंटरनेट ग्राहकांची संख्या ५० कोटी?

१२४ कोटी लोकसंख्येच्या आपल्या देशात १०० कोटी मोबाईलधारक आहेत. लँडलाइनसह ही संख्या १०३ कोटींवर जाते. सध्या देशात इंटरनेटचे ४० कोटी ग्राहक आहेत. २०१६ अखेर त्यांची संख्या ५० कोटींवर जाईल, असा विश्वास माहिती प्रसारण आणि दूरसंचारमंत्री रविशंकर प्रसाद यांनी व्यक्त केला.

ई-कॉमर्स सेवेचे उद्घाटन करताना म्हणाले, ‘‘तीन-चार वर्षांत २० ते

नवं कोरं


# संवाद परमेश्वराशी

### भाग २

मूळ लेखक
नील डोनाल्ड वॉल्श

अनुवाद
डॉ. वृषाली पटवर्धन

किंमत - २९५/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




माणसाच्या आध्यात्मिक वाटचालीबद्दल सर्वकाही म्हणजे हा 'संवाद परमेश्वराशी' – 'कॉन्व्हर्सेशन विथ गॉड'. ही वाटचाल तुमची, माझी, सगळ्या मानवजातीची आहे.

'कॉन्व्हर्सेशन विथ गॉड' या मालिकेतल्या या दुसऱ्या पुस्तकातल्या शेवटच्या भागात संपूर्ण मानवजातीच्या एकत्रित वाटचालीवर विशेष भर दिलेला आहे. इथं आपल्यापुढे एक आव्हान आहे. आपल्या पृथ्वीवर ज्या पद्धतीनं आपण जगत आहोत, ते फारसं योग्य नाही; ते तसं कुचकामी आहे, असं या पुस्तकात म्हटलं आहे. काही ठिकाणी आणि काहींच्या बाबतीत तर अतिशय निराशाजनक स्थिती आहे.

अजूनही एक मार्ग आहे; पण तो शोधून सापडणार नाही. आपणच तो निर्माण करू शकतो. जुन्या कालबाह्य धारणांना कवटाळून बसलो, तर हा नवा मार्ग निर्माण करता येणार नाही. त्यासाठी नव्या धारणा, देवाबद्दलच्या नव्या कल्पना आणि जगाला प्रकाशाकडे नेणाऱ्या नव्या वाटा यांकडे खुल्या दिलानं बघायला हवं. या नव्या गोष्टींचा मोकळ्या मनानं विचार करायला हवा.

३० लाख इंटरनेटचे ग्राहक वाढले होते; मात्र ११ महिन्यांत ३० लाख ते ४० लाख ग्राहक एवढ्या मोठ्या प्रमाणात त्यात वाढझाली. इंटरनेटमुळे ई-कॉमर्सला बळकटी मिळाली आहे. जगात क्रेडिट कार्डचा मोठ्या प्रमाणात वापर होत असताना भारताने मात्र कॅश ऑन डिलिव्हरीसारखे नवे मॉडेल समोर ठेवले. एकट्या पोस्टाने हजार कोटींची पार्सल्स ग्राहकांपर्यंत पोचवली. मोठ्या शहरांच्या तुलनेत छोट्या शहरांमधील ग्राहकांकडून ई-कॉमर्सचा मोठा वापर होत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. त्यामुळे पोस्टाचे योगदान महत्त्वाचे आहे.''

''पोस्टाच्या महसुलात २०१३-१४ मध्ये दोन टक्के घट झाली होती. त्यात २०१४-१५ मध्ये ३७ टक्क्यांनी वाढ झाली. स्पीड पोस्टच्या महसुलातही १६ टक्के वाढ झाली आहे. 'कॅग'ने स्पीड पोस्टला उत्तम सेवेचा दाखला दिला आहे,'' असे त्यांनी सांगितले.

## 'ई-एज्युकेशन'चे धडे

परीक्षेचा 'प्रश्न' माहीत असूनही 'उत्तर' शोधण्याचे आव्हान असलेला एक अनोखा अभ्यासक्रम यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, आय कन्सेंट आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एकमेसीएल) या तीन संस्थांनी एकत्र येऊन तयार केला आहे.

पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ई-एज्युकेशन इन डिजिटल सोसायटी (पीजी-डीड्स) असे या नव्या अभ्यासक्रमाचे नाव असून, तो शिक्षण क्षेत्रात काम करणारे शिक्षक किंवा स्वयंसेवी संस्थांतील प्रतिनिधींसाठी आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, 'वायसीएमओयू'चे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, आय कन्सेंटचे प्रा.डॉ. राम ताकवले, 'एमकेसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. विवेक सावंत आदींनी या अभ्यासक्रमाची माहिती दिली. 'एकविसाव्या शतकातील डिजिटल समाज घडविण्यासाठी आवश्यक शिक्षक तयार करण्यासाठी हा नावीन्यपूर्ण शिक्षणक्रम उपयुक्त ठरणार आहे. या तिन्ही संस्थांनी एकत्रितपणे 'शून्य सीमांत किंमत शिक्षण' (झीरो मार्जिन कॉस्ट एज्युकेशन) या तत्त्वावर या नवीन शिक्षणप्रणालींचे प्रतिमान विकसित केले आहे. त्याचप्रमाणे दोन बृहत शैक्षणिक संस्थांचे म्हणजेच 'परम इंटरव्हर्सिटी आणि परम विद्यालय' यांचेदेखील प्रतिमान विकसित केले आहे. या अंतर्गत पीजीडीड्स आणि शालेय शिक्षण

यांच्याबरोबर विद्यापीठ शिक्षण संलग्न केले आहे.

शाळेतील शिक्षक, स्वयंसेवी संस्थेतील प्रतिनिधी किंवा कौशल्याधारित उद्योगातील कर्मचारी यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळेल. शाळा, कॉलेज, उद्योग किंवा स्वयंसेवी संस्था, जेथे कोठे काम करत असतील तेथील एक समस्या निवडून हे उमेदवार ती सोडवण्याचा प्रयत्न करतात. अभ्यासक्रमात सहभागी उमेदवार इतर उमेदवारांबरोबर ऑनलाइन साधनांद्वारा संवाद, प्रत्येक प्रकल्पाची देखरेख आणि मूल्यमापन करण्याचीही सोय आहे.

या अभ्यासक्रमाची शैक्षणिक बाजू 'वायसीएमओयू' तर तांत्रिक आणि प्रशासकीय बाजू 'एमकेसीएल' सांभाळणार आहे. आय-कन्सेंट या संस्थेद्वारे शैक्षणिक, अध्ययन व सबलीकरण प्रक्रियेसाठी आधार पुरविला जाईल.

या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन कामगिरीवर आधारित पोर्टफोलिओ पद्धतीनुसार करण्यात येईल. त्यामध्ये विद्यार्थ्यांची स्वत:ची कामगिरी, समूहाचे योगदान, विकसन व निर्मिती इत्यादी संकल्पनांचा समावेश असेल. प्रत्येक शिक्षणक्रमाच्या अखेरीस मौखिक परीक्षा असेल. या मौखिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची कामगिरी व योगदानाची गुणवत्ता विचारात घेतली जाईल. या शिक्षणक्रमासाठी कोणत्याही प्रकारची अंतिम लेखी परीक्षा नसेल.

## साडेआठ लाखांची तरतूद असूनही तीन वर्षांत पुस्तकांची खरेदीच नाही.

महापालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शहरामध्ये ३०० शाळा चालविल्या जातात. यामध्ये ८० हजारपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षकांचा पगार, पायाभूत सुविधा व इतर उपक्रमांसाठी दर वर्षी महापालिका कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देते. शिक्षण मंडळाच्या २०१६-१७ या वर्षीच्या ३४१ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास महापालिकेच्या मुख्य सभेने मान्यता दिली. आयुक्तांनी ३० लाख रुपयांची तरतूद सुचविली होती, मात्र स्थायी समितीने तिच्यामध्ये कपात करून ती १० लाखांवर आणली आहे.

शिक्षण मंडळाने २०१२-१३-१४-१५ या वर्षात पुस्तकांवर एका रुपयाचाही खर्च केला नाही. २०१५-१६ मध्ये अंदाजपत्रकामध्ये पुस्तक खरेदीसाठी साडेआठ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यामधून किती पुस्तकांची खरेदी झाली, याची आकडेवारी उपलब्ध होऊ शकलेली

नाही.

औपचारिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व समृद्ध करण्यासाठी त्यांना अवांतर वाचनाची गोडी लागणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापकांची बदली झाली किंवा ते निवृत्त झाल्यानंतर त्यांना सर्व पुस्तकांचा हिशेब द्यावा लागतो. त्यामुळे अनेक मुख्याध्यापक विद्यार्थ्यांना पुस्तके वाचायला देतच नाहीत. सर्व पुस्तके कपाटात कुलूप लावून बंद स्थितीमध्ये ठेवली जातात, असा आरोप काँग्रेसचे सभासद रवींद्र माळवदकर यांनी केला. मुख्याध्यापकांनी पुस्तकांचा हिशेब देण्याची आवश्यकता नाही, त्याऐवजी त्यांचा वापर होऊन ती फाटतील तितके योग्य राहील, असा खुलासा शिक्षण मंडळामध्ये करण्यात आला.

## पहिल्या वेबसाइटची पंचविशी

'वर्ल्ड वाइड वेब'चा (www) शोध लावणारे ब्रिटिश शास्त्रज्ञ सर टिम बर्नर्स ली यांनी २० डिसेंबर १९९० रोजी नेक्स्ट (Next) कॉम्प्यूटरवर जगातली पहिली वेबसाइट सुरू केली. या नेक्स्ट कॉम्प्यूटरचेही (NeXT, Inc.) एक खास वैशिष्ट्य आहे. ही कंपनी होती ॲपलचे सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांची. या नेक्स्ट कॉम्प्युटरवर ही पहिली वेबसाइट सुरू झाली आणि ६ ऑगस्ट १९९१ रोजी जगभरातील लोकांनी ही वेबसाइट पाहिली.

Info.cern.ch ही ती पहिली वेबसाईट. युरोपियन ऑर्गनायझेशन फॉर न्युक्लिअर रिसर्चसाठी (CERN) ही वेबसाइट तयार करण्यात आली होती. फ्रान्स आणि स्वित्झर्लंड सीमेवर असलेल्या 'सर्न'च्या कॅम्पसमध्ये ती तयार करण्यात आली होती. ही वेबसाइट ज्या सर्व्हरवर बनवली तो सर्व्हर आजही सर्नकडे आहे. सर ली यांनी जे काही संशोधन केले होते, ती सर्व माहिती त्यांनी या वेबसाइटवर दिली होती. यात 'वर्ल्ड वाइड वेब'द्वारा (www) जगभरातील सर्व्हर आणि वेबसाइट जोडण्याची माहितीही त्यांनी दिली होती. अर्थात गेल्या पंचवीस वर्षांत यात अनेक बदल झाले असले, तरी सर ली यांच्या www ला टाळून कोणालाही पुढे जाता आलेले नाही.

ली यांच्या कामगिरीचा गौरव

इंटरनेटच्या क्षेत्रात अद्वितीय कामगिरी केल्याबद्दल सर ली यांचा अनेक पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. त्यातही सन २००४ मध्ये त्यांना प्रदान करण्यात आलेली नाइटहूडची उपाधी आणि २०१३ मध्ये मिळालेला

पहिला क्वीन एलिझाबेथ पुरस्कार हे उल्लेखनीय म्हणता येतील. त्यांना दहाहून अधिक मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आल्या आहेत.

## ग्रामीण भागांतूनही पुस्तकांना ऑनलाइन मागणी

शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातूनही ऑनलाइन खरेदीचे प्रमाण वाढत असून, ऑनलाइन सेवा साहित्य व्यवहारासाठी फायदेशीर ठरत असल्याचे चित्र आहे.

मराठी साहित्य व्यवहारात बुकगंगा डॉट कॉमने ऑनलाइन पुस्तके उपलब्ध करून दिली. त्यानंतर ॲमेझॉनसारख्या बहुराष्ट्रीय कंपनीनेही वेबसाइटवर मराठी पुस्तकांना स्थान दिले. त्यामुळे मराठी पुस्तकांची ऑनलाइन खरेदी वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. ॲमेझॉनने नुकत्याच केलेल्या पाहणीतही मराठी पुस्तकांना ऑनलाइन मागणी वाढत असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, मराठी साहित्य व्यवहारात ऑनलाइन खरेदी महत्त्वाची ठरू लागली आहे. ‘शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातही मोठा वाचक वर्ग आहे. आजतागायत त्यांच्यापर्यंत पुस्तके पोहोचलीच नव्हती. मात्र, पुस्तके ऑनलाइन मिळू लागल्याने ती उणीव दूर झाली आहे. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातूनही पुस्तकांची मागणी ऑनलाइन केली जाते. तसेच फोनबुकिंगही करण्यात येते. ऑनलाइन व्यवहार करताना ग्राहकसेवा महत्त्वाची असते. कॅश ऑन डिलिव्हरीसारखे पर्याय असल्याने शहरांतही पुस्तके ऑनलाइन मागवली जातात,’ असे मंदार जोगळेकर यांनी सांगितले.

ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण दर तीन महिन्यांनी दुप्पट होत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले. पुढील पाच वर्षांत प्रत्यक्ष दुकानांत जाऊन पुस्तक खरेदीचे प्रमाण कमी होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मोबाइल ॲप्लिकेशन करताना ‘ई-बुक’ची पायरसी होण्याचा धोका असतो. त्यामुळे प्रकाशकांनी ॲप्लिकेशन करताना त्याचा विचार करायला हवा, असेही जोगळेकर यांनी नमूद केले. ई-बुक तयार करताना ती स्वत:चा फॉरमॅट वापरून केलेली असावीत, कॉपी प्रोटेक्टेड पुस्तके केली पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. बुकगंगाने आतापर्यंत पंधरा हजार ईबुक केली असून, येत्या काळात ही संख्या अजून वाढणार आहे.

## नायगावमधील ग्रंथालयाचे लोकार्पण

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे यांच्या नायगाव या जन्मगावी उभारण्यात आलेल्या ग्रंथालयाचे औपचारिक उद्घाटन झाले. सावित्रीबाई फुले यांच्या १८५ व्या जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठाने या ग्रंथालयाचे लोकार्पण केले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, विद्यापीठाच्या महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. नरेंद्र कडू, डॉ. संजीव सोनवणे, ग्रंथपाल डॉ. बी. एम. पानगे यांच्यासह विद्यापीठाचे इतर पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

## जपानी-मराठी क्रियापद कोश

जपानी भाषा शिकणारे विद्यार्थी आणि भाषाशास्त्राचा अभ्यास करू इच्छिणारे संशोधक अशा दोघांसाठीही उपयुक्त ठरेल, असा जपानी-मराठी मूलभूत क्रियापद कोश तयार करण्यात आला आहे. भारतीय भाषांतील अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर जॅपनीज लँग्वेज अँड लिंग्विस्टिक्स या संस्थेत प्राध्यापक संचालक म्हणून कार्यरत असलेले डॉ. प्रशांत परदेशी यांच्या पुढाकाराने हा शब्दकोश तयार झाला आहे.

जपानी भाषेतील निवडक ३७६ क्रियापदे, त्यांचा जपानी आणि मराठीत अर्थ, त्यांचा उपयोग केलेली उदाहरणे, जपानी-मराठीतील साम्यस्थळे, फरक आणि महत्त्वाचे व्याकरणीय मुद्दे आदींचा या कोशात समावेश आहे. पुण्यात जपानी भाषेच्या अध्यापनाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त १९ डिसेंबरला विशेष चर्चासत्रात त्याचे औपचारिक प्रकाशन झाले. जपानी-मराठी मूलभूत क्रियापद व्यवहार शब्दकोश या स्वरूपात हा कोश एप्रिल २००७ मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्याची नवी सुधारित आवृत्ती तयार करण्यात आली आहे. कॉम्प्यूटरवर देवनागरी लिपीत लिहिण्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाच्या अभावामुळे पहिल्या आवृत्तीत त्रुटी राहिल्या होत्या. चुकांची दुरुस्ती आणि आवश्यक असेल तेथे पुनर्लेखन करण्यात आले आहे. प्रा. काझुयुकि किऱ्यू, डॉ. हरी दामले आणि मीना आशिझावा यांनी हा कोश संपादित केला आहे.

प्रा. परदेशी म्हणाले, ''या आवृत्तीमध्ये जपानी आणि मराठी या दोन्ही भाषांतील अर्थांचे स्पष्टीकरण दिले आहे; तसेच जपानी भाषेतील

स्पष्टीकरणामध्ये कांजीचे (चित्रलिपी) वाचन हिरागाना लिपीत दिले आहे. यामुळे मराठीभाषक अभ्यासकाला क्रियापदांचे जपानी आणि मराठी असे दोन्ही अर्थ समजायला मदत होईल. क्रियापदांच्या वापराबद्दलच्या टीपासुद्धा जपानी व मराठीत दिल्या आहेत; तसेच जपानी क्रियापदापासून संबंधित मराठी क्रियापाद व मराठी क्रियापदापासून संबंधित जपानी क्रियापद शोधण्याची सूची दिलेली आहे. त्यामुळे हा खऱ्या अर्थाने दुभाषिक कोश आहे.''

'या कोशाच्या प्रकाशनाच्या खर्चाचा भार कल्याणी उद्योग समूहाचे डॉ. बाबा कल्याणी यांनी उचलला. त्याचप्रमाणे या कोशासाठी अनेक जपानी अभ्यासक आणि संशोधकांचीही मदत झाली आहे. डॉ. कोऽहेइ सुझुकी, डॉ. किमी आकिता, डॉ. आकिको तारकेमुरा, आझुसा ओऽसाकि, प्रा. हिदेआकि इशिदा, डॉ. चिकिरो कोइसो, श्री. हिराशी तोवातारी; तसेच नाओकी किऱ्यू नॅशनल इन्स्टिटट्यूट फॉर जॅपनीज लँग्वेज अँड लिंग्विस्टिक्सचे महासंचालक प्रा. डॉ. तारोऽ कागेयामा, डॉ. यासुनारी इमामुरा, युकीए सातोऽ, आयाको उएकी यांच्याबरोबरच श्री. दत्तात्रय वारुणकर, 'टिमवि'चे दिवंगत विनय साठे यांनीही सहकार्य केले,' असे प्रा. डॉ. परदेशी यांनी नमूद केले.

## भाषाशास्त्राचे गाढे अभ्यासक

जपानी भाषा आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी जपानला जाणारे प्रा. डॉ. प्रशांत परदेशी हे पुण्यातील पहिले 'मोम्बुश्यो स्कॉलर' आहेत. भाषाशास्त्राचा त्यांचा गाढा अभ्यास असून, त्यांची त्यावरील काही पुस्तके आणि शोधनिबंधही प्रकाशित झाले आहेत. ते सध्या नॅशनल इन्स्टिटट्यूट फॉर जॅपनीज लँग्वेज अँड लिंग्विस्टिक्स या संस्थेत क्रॉसलिंग्विस्टिक स्टडीज विभागाचे संचालक आहेत. या संस्थेत कायमस्वरूपी संशोधक म्हणून निवड झालेले ते पहिले परदेशी संशोधक आहेत. अधिक माहिती : http://www.ninjal.ac.jp/english/organization/researcher/prashant/

## याहूच्या अकाउंटवरून वापरा जी-मेल!

सोशल मीडिया किंवा इतर सर्व कंपन्यांतील स्पर्धा शिगेला पोचली आहे. मात्र, याहूने आपल्या मेलच्या अकाउंटवरून जी-मेल आणि गुगल

ॲप्स हाताळण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. याहू मेल ॲप आणि डेस्कटॉपवरही ही मल्टिपल बॉक्स सुविधा दिली आहे. याहू मेलच्या अकाउंट सेटिंगमध्ये जाऊन ही सुविधा घेता येईल. याहूने आउटलुक. कॉम, हॉटमेल आणि एओएल मेलसाठी ही मल्टिपल इनबॉक्सची सुविधा दिली आहे. त्यामुळे सर्वच मेलबॉक्समधील मेल डिलीट करणे, त्यांना वाचल्याची खूण करणे यांसारख्या कृती एकमेकांशी जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे युजरने याहूवरून ई-मेल कंपोज केल्यावरही त्याला तो जी-मेलवरून पाठविता येऊ शकेल. त्याचप्रमाणे सर्व जोडल्या गेलेल्या मेलबॉक्समधील छायाचित्रे आणि फाईल्सही पाहता येतील; तसेच याहूच्या अकांउंटवरून जी-मेलला साईन-इन करता येईल. याहू मेल ॲप वापरून छायाचित्रे, व्हिडिओही सहजपणे पोस्ट करता येतील. याहू मेलमधील सर्चिंगसह, कॉन्टॅक्ट, कंपोज फिचर आणि पासवर्डशिवाय साइन-इन करण्यासाठीची ‘याहू अकाउंट की’ आता जी-मेलवरही उपलब्ध असेल. त्याचप्रमाणे याहू मेल आयओएस आणि अँड्रॉईड ॲप्ससाठीही नव्या फीचर्सची घोषणाही करण्यात आली आहे.

## ऑस्ट्रेलियात मराठी संमेलन

शिक्षण, व्यापार, कला, मनोरंजन, संस्कृती व साहित्य अशा क्षेत्रांत ऑस्ट्रेलिया आणि भारताचे संबंध दृढकरण्यासाठी मेलबर्न येथे २५ ते २७ मार्चदरम्यान अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन होणार आहे.

ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरिया प्रांतातील महाराष्ट्र मंडळ व्हिक्टोरियाने या संमेलनाचे आयोजन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन होईल, असे संमेलनाचे संयोजक अभिजित भिडे यांनी सांगितले.

संमेलनात सांस्कृतिक आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमांबरोबरच विविध विषयांवर तज्ज्ञांची चर्चासत्रे होतील. तसेच संमेलनात भारतीय वंशज असणाऱ्या मात्र ऑस्ट्रेलियात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मराठी बांधवांचा सन्मान करण्यात येईल. अभिनेते राहुल सोलापूरकर यांच्या ‘गोष्ट एका काळाची, काळ्या पांढऱ्या पडद्याची’ या कार्यक्रमासह ‘गोष्ट तशी गमतीची’ हे नाटक होणार आहे.

सुमारे बाराशे मराठी बांधव संमेलनात सहभागी होतील. सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रकाश आमटे, शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, डॉ. विजय

५वी आवृत्ती

# अर्थाच्या शोधात

मूळ लेखक
व्हिक्टर फ्रॅन्कल

अनुवाद
डॉ. विजया बापट

किंमत - १५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




दररोज, दर तासाला, दर मिनिटाला स्वत:च्या वागण्यासंबंधी निर्णय घेण्याची संधी समोर येत असते. तुमच्या अस्मितेचा नाश करणाऱ्या, तुमचे मनोबल हिरावून घेऊ पाहणाऱ्या शक्तींना शरण जायचे की नाही हे पदोपदी ठरवावे लागते.

तुम्ही केवळ नियतीच्या हातातील खेळणे बनता की नाही हे तुमच्या निर्णयांवर अवलंबून असते.

आपले मानसिक स्वातंत्र्य घालवून, आत्मसन्मान गमावून, मेंढरांसारखे मनानेही कैदी होता की नाही हे ठरविण्याचे तुमचे स्वातंत्र्य अबाधित असते...

भटकर, अभिनेते शरद पोंक्षे हे तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात उपस्थित राहून मराठी भाषा आणि संस्कृती यावर चर्चा करतील.

## जे मुलांना आवडते ते बालसाहित्य

''लेखक म्हणून आपले वय कितीही वाढले तरी मन कायम निर्मळ, निरागस ठेवू या. सतत नावीन्याचा ध्यास घेऊ या. स्वत:मधले लहान मूल जिवंत ठेवूया. तरच आपल्या हातून कसदार बालसाहित्य निर्माण होईल,'' असे सांगून 'जे मुलांना आवडते ते बालसाहित्य', अशी साधीसरळ व्याख्या डॉ. अनिल अवचट यांनी सांगितली.

'ओरिगामी'मध्ये कागदाची एक-एक घडी घालून 'चित्र' उभे केले जाते. तसे बालसाहित्य हा विषय घेऊन साध्या-सोप्या शब्दांची एक-एक घडी डॉ. अवचट घालत होते. या मुक्तचिंतनातून निर्माण झालेल्या कलाकृतीत रसिक-वाचक रंगून गेले होते. 'बालसाहित्य–आकलन आणि समीक्षा' या ग्रंथाच्या विद्या सुर्वे-बोरसे लिखित पुस्तकाचे प्रकाशन अवचट यांनी केले. या वेळी 'बालभवन'च्या संचालक शोभा भागवत, लेखक मदन हजेरी, प्रा. मनोहर जाधव, पृथ्वीराज तौर उपस्थित होते.

अवचट म्हणाले,''आपण सोयीसाठी साहित्यात वेगवेगळे कप्पे केले आहेत; पण खरे साहित्य तेच जे हृदयातून येते- हृदयात मावत नाही म्हणून जे बाहेर येते ते. लहानांचे विषय लेखनांसाठी फार जिव्हाळ्याचे असतात. मात्र आपल्याला नुसतेच लाडिक लिहून चालणार नाही. मुलांना समजून घेऊनच लिहायला हवे. मानवी मूल्यांची जपणूक करणारे, जगणे काय असते हे सांगणारे लेखन करायला हवे. त्यासाठी जगणे काय असते हे आधी आपल्यालाही शिकावे लागेल. अशा लेखनातून मूळ 'व्हिडिओ गेम'सुद्धा मोडीत निघू शकतील.''

## सम्यक साहित्य संमेलन

''पुरोगामी लोक फुटलेले, आपापसांत लढणारे, एकमेकांना समजून न घेणारे असतील, तर विषमतेच्या विरोधातील लढाई अवघड आहे.'' असे मत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्रातर्फे पाचवे सम्यक साहित्य संमेलन २०

डिसेंबर रोजी घेण्यात आले. या वेळी डॉ. रावसाहेब कसबे यांनी डॉ. साळुंखे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला. या प्रसंगी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, गुजराती लेखक हरीश मंगलम, प्रा. विलास वाघ, संमेलनाचे मुख्य निमंत्रक डॉ. अनिल सपकाळ आदी उपस्थित होते.

सर्व परिवर्तनवादी संघटनांनी एकत्र येऊन ही लढाई लढल्यास विषमतेचा पराभव शक्य आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तीन मूल्ये घेऊन समाज उभा करण्यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न केले पाहिजेत, अशी अपेक्षा साळुंखे यांनी व्यक्त केली.

हार्दिक पटेलने गुजरातमध्ये आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन केले. त्याचदरम्यान न्यायालयात सुनावणी सुरू असताना न्यायाधीशांनी 'आरक्षण' व 'करप्शन' या दोन गोष्टी घातक असल्याचे सांगितले. संविधान, कायद्याची अंमलबजावणी करणारी माणसेच, त्याविरोधात बोलत आहेत, असे मंगलम यांनी सांगितले.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या पुस्तकाला पुणे विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्रातर्फे १४ एप्रिलपासून पुरस्कार दिला जाणार आहे.

## अरुंधती रॉय यांना 'चले जाव'चा इशारा

संशयित माओवादी समर्थक प्रा. साईबाबाला पाठिंबा दिल्याच्या विरोधात लेखिका अरुंधती रॉय यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून 'चले जाव'चे नारे नागपूरात भूमकाल संघटनेतर्फे देण्यात आले.

प्रा. साईबाबाला संशयित माओवादी असल्याच्या कारणावरून अटक करण्यात आली आहे. प्रा. साईबाबाला झालेली अटक अयोग्य असल्याचा दावा अरुंधती रॉय यांनी केला आहे. या लिखाणाबाबत मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने अलीकडेच अवमान नोटीस रॉय यांना बजावली आहे. मात्र रॉय हायकोर्टाच्या निर्णयालाही जुमानत नाहीत, न्यायव्यवस्थेवर त्यांचा विश्वास नाही, तर फुटीरतावादी माओवाद्यांना पाठिंबा देतात, असा आरोप संघटनेने केला आहे.

## पत्रकारांसाठी भारत सर्वांत घातक

सरत्या वर्षात जगभरात एकूण ११० पत्रकार मारले गेले. त्यापैकी

संघटित गुन्हे किंवा बेकायदा खाणकामाचे वार्तांकन करणाऱ्या आणि अशा कृत्यांच्या राजकीय व्यक्तींसोबत असलेल्या संबंधांचे वार्तांकन करणाऱ्या नऊ पत्रकारांची भारतात हत्या झाली असून, भारत हा पत्रकारांसाठी आशियातील सर्वांत घातक देश ठरल्याचे 'रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स'ने (आरएसएफ) आपल्या अहवालात म्हटले आहे.

भारतात पाच पत्रकार मारले गेले. जगभर हे प्रमाण अनुक्रमे ६७ आणि ४३ असे आहे. तसेच, २७ 'सिटिझन- जर्नालिस्ट' आणि सात माध्यमातील अन्य कर्मचारी यांचाही वर्षभरात मृत्यू झाला. इतक्या संख्येने पत्रकारांना जाणूनबजून मारण्यात आल्याचा, तसेच त्यांना संरक्षण देण्यात अपयश आल्याचा दावा या अहवालात करण्यात आला आहे.

## स्पर्धक विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमुळे कोटा शहरात खळबळ

राजस्थानातील शैक्षणिक केंद्र मानल्या जाणाऱ्या कोटा शहरात सध्या कोचिंग क्लासमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमुळे खळबळ माजली आहे. आत्महत्या रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'मस्ती की पाठशाला' ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेस प्रारंभ झाला असला, तरी पुन्हा एका विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचे आढळले. चालू वर्षांत आत्महत्या करणाऱ्यांची संख्या ३० वर पोहोचली आहे.

भानू कुमार या विद्यार्थ्याने होस्टेलच्या छताला गळफास लावून आत्महत्या केली. भानू भाड्याने घेतलेल्या एका घरात एकटाच राहत होता. लहान वयात कुटुंबीयांपासून लांब राहिल्यामुळे मुले सेपरेशन एन्झायटीशी सामना करतात. शाळेत आणि क्लासमध्ये चांगले गुण मिळविण्याचा ताणही त्याला असावा असे मनोविकारतज्ज्ञ एम. एल. अगरवाल म्हणाले.

## प्रेक्षकांना आवडतात प्रयोगशील मराठी चित्रपट

मराठी चित्रपटांतून वेगवेगळे विषय हाताळण्यात येत आहेत. चित्रपटात वैविध्याबरोबरच नवनवीन प्रयोग होत आहेत. असे मत दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी व्यक्त केले. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातर्फे 'बदलता मराठी सिनेमा : आशय, तंत्र आणि अभिव्यक्ती' विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात मंजुळे, दिग्दर्शक सुजय डहाके सहभागी झाले होते. युवा कलाकार अंशुमन जोशी याने या दोघांशी

संवाद साधला.

मंजुळे म्हणाले, ''मराठी चित्रपटात आशय ही जमेची बाजू असते. त्यामुळे चित्रपटातील प्रयोगशीलता मोठ्या मनाने स्वीकारली जाते. माझ्यासाठी चित्रपट म्हणजे अभिव्यक्त होण्याचे माध्यम आहे.'' डहाके म्हणाले, ''मराठी चित्रपट गेल्या काही वर्षांपासून बोलायला लागला आहे. चित्रपटाद्वारे निरनिराळे विषय हाताळले जात आहेत.

## मोजक्या विचारवंतांच्या कृतीचा निषेध करावासा वाटतो

'सर्वकार्येषु सर्वदा' या उपक्रमातील ५१ संस्थांचा परिचय करून देणाऱ्या लोकसत्ता ग्रंथमालेतील पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. विक्रम गोखले यांनी आमिर खान यांच्या वक्तव्याच्या निमित्ताने पुन्हा सुरू झालेल्या सहिष्णुता-असहिष्णुता वादावर भाष्य केले. ते म्हणाले की, एकीकडे 'ने मजसी ने परत मातृभूमीला ...' अशी आर्त साद घालणाऱ्या सावरकरांचा वारसा आपल्याला लाभलेला आहे; तर दुसरीकडे या देशात जन्म घेतलेला आमिर खान देश सोडून जाण्याची भाषा करत आहे. देशात असहिष्णुता पसरल्याचे त्याने प्रसारमाध्यमांसमोर सांगितले हे अत्यंत चुकीचे आहे.

## इंटरनेटच्या माध्यमातून मक्तेदारी संपविणे शक्य

''ज्ञान आणि माहिती यावर काही वर्षांपूर्वी विशिष्ट गटाची मक्तेदारी होती, या मक्तेदारीशी लढूनच विज्ञान विकसित झाले आहे. ही मक्तेदारी आजच्या काळातही अस्तित्वात असून, इंटरनेटच्या माध्यमातून ही मक्तेदारी संपवणे शक्य आहे.'' असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी व्यक्त केले.

आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्राच्या (आयुका) वर्धापन दिनानिमित्त 'ज्ञानाचा इतिहास' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. याप्रसंगी आयुकाचे संचालक डॉ. सोमक रायचौधरी, माजी संचालक डॉ. अजित केंभवी उपस्थित होते.

## मुलांच्या वाचनाबाबत आपुलकी

''शालेय मुला-मुलींमध्ये वाचन संस्कृती रुजावी व ती वाढावी, यासाठी

पाश्चात्त्य देशांमध्ये नवनवीन प्रयोग सुरू आहेत; मात्र, ते तळागाळातील मुलांपर्यंत पोहोचत नाहीत,'' अशी भावना शिक्षणतज्ज्ञ मीना चंदावरकर यांनी व्यक्त केली.

डोअर स्टेप स्कूल, स्वाधार, वनस्थळी ग्रामीण विकास केंद्र, स्नेहदीप जनकल्याण फाउंडेशन व क्षितिज या पाच संस्थांनी एकत्र येऊन सामाजिक संस्थांचे वाचन संस्कार नेटवर्क सुरू केले आहे. डोअर स्टेपच्या संस्थापक रजनी परांजपे, भावना कुलकर्णी, शिक्षण मंडळाच्या उपशिक्षणप्रमुख शुभांगी चव्हाण, स्वाधारच्या अंजली बापट, वनस्थळी ग्रामीण विकास केंद्राच्या सुषमा साठे, स्नेहदीप जनकल्याण फाउंडेशनचे डॉ. प्रकाश भंडारी, क्षितिज संस्थेच्या उमा माने व संजय राऊत या प्रसंगी उपस्थित होते.

चंदावरकर म्हणाल्या, ''वाचन मुलांना समृद्ध बनवते आणि विचार करण्यास प्रवृत्त करते. मराठी भाषेत आज अनेक प्रयोग राबविले जात असून, त्यातून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजत आहे. पूर्वी मुलांना चांगली शाळा व चांगले शिक्षक मिळायचे; पण काळ बदलल्याने चांगले शिक्षक हरपले, भाषेची व व्याकरणाची जाण आपल्यात उपतजच असते. फक्त त्याला जाणून घेण्याची गरज आहे. दूरचित्रवाणी पाहून ज्ञान मिळत नाही.''

'लहानपणीच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हायला हवी. अध्यापन आनंददायी करायचे असेल, तर मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्याची आवश्यकता आहे,' असे मत चव्हाण यांनी व्यक्त केले. गप्पा, गोष्टी, गाणी, खेळ, चित्रवाचन, भिंतिपत्रके आणि पुस्तक वाचनातून मुलांमध्ये वाचन संस्कार कसे रुजवावेत, याची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली.

## कला, विद्वता असल्यास दाद मिळतेच

जगात सगळीकडे चांगली माणसे आहेत. तुमच्याकडे कला, विद्वत्ता असेल, तर त्याला दाद मिळतेच. त्या वेळी तुम्ही कोणत्या देशाचे आहात, हा विचार होत नाही, असे मत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे रचनाकार सुधीर जांभेकर यांनी व्यक्त केले.

कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने आयोजित कार्यक्रमात जांभेकर यांच्या दहा ई -बुक्सचे प्रकाशन झाले. प्रसिद्ध वास्तुरचनाकार सेन कापडिया, संस्थेच्या माजी

३१वी आवृत्ती

# मृत्युंजय

लेखक
शिवाजी सावंत

किंमत - ३९५/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




असा हा कर्ण,
भीष्माचं पतन होईपर्यंत समरांगणात पायच टाकणार नव्हता!
इंद्रानं पूर्वीच त्याची कवच-कुंडलं आपल्या पुत्रासाठी -
अर्जुनासाठी म्हणून दानाच्या मिषानं त्याच्यापासून हस्तगत केलीच होती.
परशुरामांनी, 'तुला ऐन युद्धाप्रसंगी ब्रह्मास्त्र स्फुरणार नाही.'
असा मर्मभेदी शाप त्याला दिला होता.
महेंद्र पर्वतावरच्या ब्राह्मणाचे
'तुझ्या रथाचं चक्र,
भूमीही युद्धात अशीच रूतवून ठेवील!'
हे उद्गार कोणीही विसरू शकत नव्हतं.
जगात अनेकांनी दान केलं असेल पण -
पण मरणाच्या दारातील एवढं चित्तथरारक,
उत्तुंग एकनिष्ठ, अजोड दान
तो एकटाच करू जाणत होता -
पहिला पांडव!
ज्येष्ठ कौंतेय!
अजोड दानवीर,
सूर्यपुत्र!

अध्यक्ष स्नेहलता सहस्रबुद्धे, सचिव पी.व्ही. श्रीनिवास शास्त्री, बुकगंगाचे मंदार जोगळेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य अनुराग कश्यप आदी उपस्थित होते. जांभेकर हे मराठी वृत्तपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांचे चौथ्या पिढीतील सुधीर हे वंशज आहेत. मुंबईत नोकरी करीत असताना अमेरिकेत जाऊन वास्तुरचनांचा अभ्यास केला.

न्यूयॉर्कमध्ये व्यवसाय, या मोठ्या शहरात तीनमजली कार्यालय हे कसे शक्य झाले, या प्रश्नावर ते म्हणाले, ''अमेरिकेत बुद्धीचे चीज होते. तुमच्याकडे टॅलेंट असेल, तर तुम्ही कोणत्या देशाचे याचा विचार अमेरिकेत होत नाही. हा त्या लोकांचा स्वभाव आहे. जगात सगळीकडे चांगले लोक आहेत. तुमच्याकडे फक्त कौशल्य हवे.''

जोगळेकर यांनी, सॉफ्टवेअर ते प्रकाशक ही वाटचाल विशद करून, मराठीतील सर्व दर्जेदार साहित्य ई-बुक स्वरूपात आणण्याची गरज व्यक्त केली. मराठी माणसाची वाचनाची आवड कमी झालेली नाही, तर बदललेली परिस्थिती आणि तंत्रज्ञानानुसार नव्या पिढीला हव्या असलेल्या माध्यमातून पुस्तके उपलब्ध करून दिली पाहिजेत, असे मत व्यक्त केले.

## स्टार वॉर्स

'स्टार वॉर्स : द फोर्स अवेकन्स' या सिनेमाने आगाऊ बुकिंगपासूनच कमाईचा विक्रम सुरू केला आहे. 'स्टार वॉर्स'च्या मालिकेतला हा सातवा सिनेमा.

'स्टार वॉर्स : द फोर्स अवेकन्स'च्या कमाईने आजवरचे अनेक विक्रम मोडले आहेत. पहिल्याच दिवशी सर्वाधिक आगाऊ बुकिंग झालेला आणि आठवड्याभरात सगळ्यात जास्त गल्ला जमवणारा असा हा सिनेमा ठरला.

'स्टार्स वॉर्स'सारखे अनेक हॉलिवूडपट अशा प्रकारची विक्रमी कमाई करतात. 'लॉर्ड ऑफ द रिंग्ज', 'हॅरी पॉटर', 'ज्युरासिक पार्क' अशा सिनेमांची मालिका किंवा 'टायटॅनिक', 'ज्युरासिक पार्क' किंवा 'बाँडपट' तरी असतात.

गेल्या दशकभरात सिनेमाच्या कमाईचे आकडे हे प्रचंड प्रमाणात वाढण्याचे कारण ठरलेय ते म्हणजे हॉलिवूडपटांना मिळालेले आशियाई मार्केट. एकाच वेळी हजारो थिएटरमध्ये हे सिनेमे प्रदर्शित होतात. आजवरचा सर्वाधिक कमाई केलेला सिनेमा म्हणून 'गॉन विथ द वुइंड'चे नाव घेतले

जाते. सलग २५ वर्षे हा सिनेमा थिएटरमध्ये पाहिला गेला. सर्वाधिक कमाई करणारा सिनेमा म्हणून अर्धशतक हाच सिनेमा टॉपवर राहिला. पण आकड्यांमध्ये बाजी मारली ती 'अवतार' या सिनेमाने.

२००९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अवतार' सिनेमाने १७८ अब्ज रुपयांहून अधिक कमाई केली. या सिनेमाचे बजेट २३ कोटी डॉलर्स होतं. आजही हॉलिवूडपटांत सर्वाधिक कमाई करणारा हाच सिनेमा आहे. विशेष म्हणजे त्या आधी १२ वर्षे कॅमेरून यांच्याच 'टायटॅनिक'ने एक अब्ज ८४ कोटी डॉलर्सची कमाई केली. यंदा प्रदर्शित झालेल्या 'ज्युरासिक वर्ल्ड'ने ९९ अब्ज रुपयांची कमाई केली. 'फास्ट सेव्हन' या सिनेमाने ९८ अब्जाहून अधिक कमाई केली. सिनेमाच्या कमाईची कोटीच्या कोटी उड्डाणे गेल्या काही वर्षांत वाढली असून आता नजर आहे ती 'स्टार वॉर्स'च्या रेकॉर्डब्रेक कलेक्शनवर.

## दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन

असहिष्णू तत्त्वे जगात सर्वत्र आढळतात. आपल्याकडेही कधी कधी डोके वर काढतात. या तत्त्वांना भारतीय संस्कृतीत स्थान नाही. सहिष्णुता हे सुसंस्कृतपणाचे आद्य लक्षण आहे, असे मत भारताचे अमेरिकन दूतावासातील महावाणिज्य दूत आणि साहित्यिक ज्ञानेश्वर मुळे यांनी व्यक्त केले.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने संपन्न झालेल्या संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ हिंदी साहित्यिक अशोक वाजपेयी यांच्या हस्ते राजाराम कॉलेज येथे झाले. या वेळी संमेलनाध्यक्षपदावरून मुळे म्हणाले, ''लेखनस्वातंत्र्य अमर्याद असले तरी ते अनिर्बंध असू नये. त्याला सामाजिक, सांस्कृतिक आणि संविधानिक चौकट असते, याचे भान असावे. वाचकाला ही संविधानिक मार्गांनी टीका करण्याचा किंवा निषेध करण्याचा अधिकार आहे.''

अशोक वाजपेयी म्हणाले, ''राजकारणाने धर्म, साहित्य, शिक्षण अशा सर्व क्षेत्रांत घुसखोरी केली आहे. मग साहित्याने राजकारणात घुसखोरी केल्याने काय बिघडले? साहित्य, साहित्यिकांनी चुप्पी न साधता आवाज नसणाऱ्यांचा आवाज होण्यास शिकले पाहिजे.'' सभेचे अध्यक्ष विजय चोरमारे यांनी साहित्य सभेच्या वाटचालीचा आढावा घेतला. खासदार

धनंजय महाडिक, डॉ. रमेश जाधव, डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. शाहूंच्या विचारप्रसारासाठी योगदान देणारे प्रा. एन. डी. पाटील, बाबुराव धारवाडे, डॉ. जाधव, डॉ. जगन्नाथ पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

## मुंबईतील 'ऱ्हिदम हाऊस' बंद होणार

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत, हिंदी चित्रपट, भक्तिगीते, गझल, भावगीत संगीत... अगदी पाश्चिमात्यांच्या जॅझ, रॉक, पॉप अशा विविध प्रकारच्या संगीताच्या शोधात असणाऱ्या रसिकांना प्रिय असणारे दक्षिण मुंबईतील प्रसिद्ध 'ऱ्हिदम हाऊस' आता रिते-रिते झाले आहे. तंत्रज्ञानात झालेला बदल, बदलती माध्यमे, पायरसी यामुळे एलपी, सीडी, डीव्हीडीवरून संगीत आता मोबाइल, आयपॉडवर आले आहे. जगभरातल्या संगीताचा ऐवज असणारे ऱ्हिदम हाऊस २८ फेब्रुवारीपासून बंद होणार आहे. त्यामुळे ऱ्हिदम हाऊसकडे असलेला सीडी– डीव्हीडींचा खजिना सवलतीच्या दरात विकला जात आहे.

## पिंपरीत ई-लर्निंगचा श्रीगणेशा

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाच शाळांमध्ये शिक्षण मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ पिंपरी टाऊन यांच्या वतीने प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या ई-लर्निंग उपक्रमाचा सात जानेवारीला प्रारंभ झाला.

महापालिकेच्या सांगवी, वाल्हेकरवाडी, मोशी, पिंपळेगुरव आणि बोपखेल या शाळांमध्ये ई-लर्निंगचा उपक्रम 'रोटरी डिस्टन्स एज्युकेशन प्रोग्रॅम' (आरडीईपी) अंतर्गत उपक्रम राबविला जाणार आहे. त्यात सर्वच इयत्तांच्या अभ्यासक्रमांचा समावेश असणार आहे. पिंपळेगुरव आणि सांगवी येथील शाळांमध्ये ई-लर्निंगसाठी आवश्यक सेट देण्यात आले. त्यामध्ये एक टीव्ही स्क्रीन, एक मोठा स्क्रीन, प्रोजेक्टर, की-बोर्ड, सीपीयू आणि इतर आवश्यक साहित्याचा समावेश आहे.

## अनुवादित पुस्तकांची वाढती मागणी

गेल्या काही वर्षांत अनुवादाच्या माध्यमातून अनेक महत्त्वाच्या देशीविदेशी लेखकांचे साहित्य मराठीत दाखल झाले. अनुवादामुळे साहित्य आणि अर्थकारण या दोन्ही बाजूंनी मराठी साहित्य व्यवहाराला चालना मिळाली आहे. अनुवादित पुस्तकांचे प्रमाण वीस टक्क्यांपर्यंत पोहोचले

आहे. त्यातही उपयुक्ततावादी पुस्तकांना वाचकांकडून जास्त मागणी आहे.

‘अनुवादित साहित्याला चांगली बाजारपेठ आहे. मराठीत जे साहित्य निर्माण होणार नाही, ते अनुवादाच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते. मात्र, अनुवादाचा दर्जा राखणे महत्त्वाचे आहे.’ असे प्रदीप चंपानेरकर यांनी सांगितले.

‘अनुवादित साहित्याची बाजारपेठ मर्यादित आहे. त्या तुलनेत अनुवादित पुस्तकांचे प्रमाण अधिकच आहे. चांगले साहित्य मराठी वाचकांना मिळण्यासाठी अनुवाद आवश्यक आहे. मात्र, मराठीतील लेखकही कसदार लेखन करत आहेत,’ असे अरविंद पाटकर यांनी स्पष्ट केले.

## उचगाव साहित्य संमेलन

बेळगाव तालुक्यामध्ये गावोगावी होणाऱ्या साहित्य संमेलनांमुळे साहित्याची चळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली आहे. विद्यार्थी वर्गाला लेखक, कवी जवळून न्याहाळता येऊ लागले आहेत. यामुळे मराठीच्या संवर्धनाला मदत होत असून वाचन संस्कृतीही वाढत आहे, असे मत राणी चन्नम्मा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत वाघमारे यांनी व्यक्त केले.

## उच्च न्यायालयात मराठीसाठी आग्रह

राज्यघटनेच्या कलम ३४८ (२) नुसार मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्यासाठी सरकार म्हणून अग्रक्रमाने प्रयत्न करू, अशी घोषणा मराठी भाषामंत्री विनोद तावडे यांनी केली आहे. उच्च न्यायालयात मराठीला दर्जा देण्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव आणू, अशी ग्वाही त्यांनी दिली आहे.

मराठी भाषेच्या समग्र विकासासाठी कार्यरत असणारे ज्येष्ठ अधिवक्ता शांताराम दातार यांच्या ‘दावा दाखल ते दावा चौकशी’ व ‘विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम’ (Specific Relief Act) या कायद्याच्या पुस्तकांचे प्रकाशन तावडे यांच्या हस्ते झाले. न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारीदेखील या वेळी उपस्थित होते.


२री आवृत्ती

# द गेस्ट ऑफ ऑनर

मूळ लेखक
आयर्विंग वॅलेस

अनुवाद
लीना सोहोनी

किंमत - २५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




“प्रेसिडेंट प्रेमच्या मृत्यूला कोण कारणीभूत असावं याची मला साधारण कल्पना आली आहे,” ब्लेक म्हणाला.

“कोण?”

“तुझा नवरा. ॲलिस, एका अर्थी तोच या घटनेला जबाबदार आहे.”

ॲलिसला बसलेला धक्का जबरदस्तच होता. “ते अशक्य आहे.”

“आधी माझं बोलणं तर ऐकून घे; मग काय ते ठरव.”

“मॅट?” ती म्हणाली, “हे असं कुणाचा खून वगैरे करवण्याचं काम मॅटचं शक्यच नाही. तू प्लीज मला काय ते सगळं सांग.”

“मग ऐक तर,” ब्लेक म्हणाला. “प्रेम सँगची अमेरिकेला लाम्पांगमध्ये लष्करी विमानतळ द्यायला अजिबात तयारी नव्हती. त्याला कम्युनिस्ट चळवळीच्या नेत्यांशी समझोता घडवून आणून कम्युनिस्ट चळवळीला राजकीय पक्षाचा दर्जा देण्याची इच्छा होती आणि हे धोरण अमेरिकेच्या विरुद्ध होतं हे तुझ्या लक्षात आलंच असेल.”

“हो. मला कल्पना आहे त्याची.”

“त्यामुळेच सी. आय. ए.तल्याच कुणाच्यातरी डोक्यात असा विचार आला की, या प्रेमची खुर्ची जर काही कारणाने खाली करता आली, तर त्याची जागा त्याची पत्नी नॉय घेईल आणि ती एक अबला असल्याने जनरलनाकॉर्नला याचा फायदा उठवता येईल. पर्यायाने अमेरिकेचा फायदा होईल.”



# पुरस्कार

## ‘महाराष्ट्र फाउंडेशन’च्या पुरस्कारांचे वितरण

‘आदमी मरने के बाद कुछ नही बोलता, आदमी मरने के बाद कुछ नहीं सोचता, कुछ नही सोचने पर और कुछ नही बोलने पर आदमी मरता है...’ अशी काव्यपंक्ती सादर करून आजूबाजूच्या गोष्टींबद्दल आपण सतत विचार करू. आजूबाजूच्या नकारात्मक वातावरणाविरोधात आपण बोलत राहू. विरोध झाला तर मनात भयसुद्धा बाळगू. भयच आपल्याला ताकद देते. अधिकाधिक लोकांना जोडण्याची शक्ती देते. या बळावर ‘हम अपनी बात आखिर तक कहते रहेंगे’, अशा शब्दांत हिंदी साहित्यिक उदय प्रकाश यांनी नवी उमेद जागवली.

‘फाउंडेशन’चा ‘डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार’ ‘सकाळ’चे संचालक संपादक उत्तम कांबळे यांना, ‘साहित्य जीवनगौरव पुरस्कार’ ज्येष्ठ पत्रकार सुरेश द्वादशीवार यांना, ‘समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार’ विद्या बाळ यांना प्रदान करण्यात आला. बाळ यांचा पुरस्कार साधना दधिच यांनी स्वीकारला.

शरद बेडेकर, नितीन दादरावाला, रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ, अजित देशमुख यांना साहित्यविषयक; तर पल्लवी रेणके, भीम रासकर, कृष्णा चांदगुडे यांना समाजकार्य पुरस्कार देण्यात आले.

प्रकाश म्हणाले, ‘‘मी छत्तीसगड, मध्य प्रदेशच्या सीमेवर लहानशा खेड्यात राहतो. तेथे वीज नाही, पाणी नाही. प्रचंड दुष्काळ आहे. असे असताना दुसरीकडे ‘स्मार्ट सिटी’ची चर्चा जोरदार सुरू आहे. असा विरोधाभास वेगवेगळ्या बाबतीत भारतात जाणवत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू आहेत. विचार मारले जात आहेत. आवाज बंद केले जात आहेत. लेखक- विचारवंतांना आजचे वातावरण सुरक्षित वाटत नाही, हे

लक्षात आणून द्यावे म्हणून पुरस्कार परत केला. विरोध दर्शविण्यासाठीची ही छोटीशी कृती होती. कारण माझ्या हातात तेवढेच होते. अशा वेगवेगळ्या पद्धतीने आपण बोलत राहिले पाहिजे. वास्तवता समोर आणण्यासाठी प्रश्न मांडत राहिले पाहिजे.''

द्वादशीवार म्हणाले, ''राजकारणामुळेच असहिष्णुतेचे वातावरण २५ वर्षांपासून आपल्याकडे आहे. याबाबत कलावंत विचारवंत पुरस्कार परत करून आपल्या भावना व्यक्त करतात, तेव्हा ते त्यांचे एकट्याचेच नव्हे, समाजाचे म्हणणे असते.'' विद्युल्लेखा अकलुजकर, रजनी शिंदोरे या वेळी उपस्थित होत्या. विनोद शिरसाठ यांनी सूत्रसंचालन केले. हमीद दाभोलकर यांनी आभार मानले.

''समाजातल्या फटक्यातुटक्या माणसांमुळेच परिवर्तनाची पहाट होणार आहे, तेच उद्याचे जग बदलणार आहेत; पण आता सत्ता, शिक्षण, जात, धर्मातून समाजात अंधार पसरत आहे. त्यामुळे आपल्या सर्वांच्याच मनात नवनवे प्रश्न निर्माण होत आहेत. या प्रश्नांचा मुकाबला करणे हे एका 'अंनिस'चे काम नाही. सेवाभावी संस्थांनी त्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे,'' असे उत्तम कांबळे यांनी सांगितले.

## एकल फाउंडेशनला 'शाहू छत्रपती' पुरस्कार

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने राजर्षी छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या स्मरणार्थ या वर्षीपासून पुरस्कार देण्यात येणार आहे. दुर्गम भागात शिक्षणाचे कार्य करणाऱ्या 'एकल विद्यालय फाउंडेशन'ला यंदाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

एकशिक्षकी शाळेच्या संकल्पनेतून एकल विद्यालय फाउंडेशन देशातील ग्रामीण आणि आदिवासी भागात शिक्षण प्रसाराचे काम करीत आहे. फाउंडेशनच्या ५३ हजार शाळांमधून पंधरा लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## मौलाना अब्दुल कलाम आझाद पुरस्कार

''देशात एकात्मता व बंधुत्वाची कमतरता आहे. लोकशाहीचा स्वीकार करूनही आपण एकमेकांना विषमतेची वागणूक देतो, त्यामुळे आपल्या

देशाची किंबहुना समाजाची प्रगती होत नाही. हे चित्र बदलण्यासाठी व लोकशाही मजबूत करण्यासाठी राज्यघटनेच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे'' असे मत न्यायमूर्ती पी. बी. सावंत (निवृत्त) यांनी व्यक्त केले. पुणे महापालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या 'भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद' पुरस्कारांचे वितरण सावंत त्यांच्या हस्ते करण्यात आले. कॉम्रेड गोविंद पानसरे यांना मरणोत्तर भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार दिला. उमा पानसरे यांनी हा पुरस्कार सावंत यांच्याकडून स्वीकारला. या कार्यक्रमात साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, लेखक राजन खान, सलीम शेख व सहकारी यांच्यासह साज आणि अक्षरनंदन या संस्थांना हा पुरस्कार दिला. महापौर दत्तात्रेय धनकवडे, नगरसेवक रवींद्र माळवदकर, ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित या वेळी उपस्थित होते.

सावंत म्हणाले, ''समाजाचा विकास हा शांती, स्थैर्य व स्वास्थ्यावर अवलंबून असतो, त्यामुळे या तिन्ही गोष्टी आपल्या समाजात कशा रुजवता येतील, याचा विचार करावा.''

खान म्हणाले, ''एकमेकांना धर्माच्या नावाखाली मारण्यापेक्षा व द्वेष बाळगण्यापेक्षा माणूस म्हणून वागणूक दिली पाहिजे.''

''राष्ट्रीय एकात्मता व बंधुत्व वाढविण्यासाठी गोविंद पानसरे नेहमी झटले. त्यांनी संपूर्ण आयुष्य गोरगरीब व सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी व्यतीत केले. सर्वसामान्यांमध्ये मानवता व बंधुत्व निर्माण करण्यासाठी ते लढले. समान नागरिकत्वाच्या प्रबोधनासाठी लढणाऱ्या माणसाचा हिंसेने असा अंत होणे, ही खूपच खेदजनक बाब आहे. याचे दुःख आम्हा कुटुंबीयांना आहे,'' असे उमा पानसरे यांनी सांगितले.

## संतोष संखद यांना आंबेडकर ॲवॉर्ड

अखिल भारतीय दलित साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणारा 'डॉ. बाबासाहेब नॅशनल फेलोशिप ॲवॉर्ड' यंदा नृत्य व कलादिग्दर्शक संतोष संखद यांना दिल्ली येथे झालेल्या संमेलनामध्ये अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सोहनलान सुमनाक्षर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

## टागोरांच्या कवितेचा वादग्रस्त चिनी अनुवाद

चिनी लेखक फेंग तांग यांनी रवींद्रनाथ टागोर यांच्या कवितेचा वादग्रस्त अनुवाद केल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे टागोर यांच्या चाहत्यांनी तांग यांच्यावर कडक शब्दांत टीकेची झोड उठवली आहे. तांग यांनी टागोर यांच्या 'स्ट्रे बर्ड्स' मधील कवितेचा अनुवाद 'चायना डेली' या सरकारी वृत्तपत्रात प्रसिद्ध केला होता. दरम्यान, टीकेनंतर संबंधित कविता परत घेण्यात आली आहे. तसेच 'झेजियांग वेन्यी' या प्रकाशनाने विक्री झालेली पुस्तके परत मागवली आहेत.

## स्वामी स्वरूपानंद यांना समर्थ पुरस्कार

फुलगाव येथील वेदान्त साहित्याचे अभ्यासक स्वामी स्वरूपानंद यांना सज्जनगड येथील श्री समर्थ सेवा मंडळातर्फे २७ डिसेंबर रोजी डॉ. यशवंत पाठक यांच्या हस्ते  पुरस्कार देण्यात आला.

यंदा पुरस्काराचे दहावे वर्षे आहे. २१ हजार रुपये रोख, मानचिन्ह, मानपत्र आणि महावस्त्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सज्जनगड मासिक पत्रिकेचे कार्यकारी संपादक मधू नेने यांच्यासह मंडळाचे इतर पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

## चारुशीला बेलसरे यांना डॉ. आगाशे पुरस्कार

विजया फाउंडेशनतर्फे प्रसिद्ध गायिका चारुशीला बेलसरे यांना डॉ. सुभाष आगाशे स्मृती संगीतरत्न पुरस्कार ज्येष्ठ सतारवादक उस्ताद उस्मान खाँ यांच्या हस्ते १६ जानेवारी प्रदान करण्यात आला. प्रा. विलास पाटील व डॉ. अभिजित आगाशे या वेळी उपस्थित होते. यानिमित्त 'सप्तसूर रंगले' या कार्यक्रमातून बेलसरे यांनी आपला संगीत प्रवास उलगडून दाखवला.

## गुजरातीला चौथा ज्ञानपीठ पुरस्कार

देशातील साहित्य क्षेत्रात मानाचा समजला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार यंदा ज्येष्ठ गुजराती लेखक रघुवीर चौधरी यांना जाहीर झाला आहे. चौधरी यांची 'रुद्र महालया' ही कादंबरी ऐतिहासिक गुजराती लेखनातील मैलाचा दगड म्हणून ओळखली जाते. त्यांचे निबंधलेखनही प्रसिद्ध आहे. सर्जनशील

लेखन आणि विचारांच्या स्पष्ट सादरीकरणासाठी सूक्ष्म निरीक्षण ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. यंदा पुरस्काराचे ५१ वे वर्ष असून, ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे चौधरी हे देशातील ५६ वे, तर गुजरातीतले चौथे लेखक ठरले आहेत.

रघुवीर चौधरी ७७ वर्षांचे असून, गांधीनगरमधील बापूपुरा येथे त्यांचा जन्म झाला. सुरुवातीचे शिक्षण आपल्या गावातच घेतल्यानंतर त्यांनी गुजराती विद्यापीठात प्रवेश घेतला आणि हिंदी साहित्याचा अभ्यास केला. नामवंत विद्वान भोलाभाई पटेल यांच्याकडून त्यांनी साहित्याचे धडे घेतले. नवनिर्माण चळवळीत सक्रिय सहभाग घेतलेल्या चौधरी यांनी १९७० च्या आणीबाणीच्या काळात त्यांनी आपला निषेध जाहीरपणे व्यक्त केला होता. गुजरात विद्यापीठातील 'स्कूल ऑफ लँग्वेजेस' मधील हिंदी विभागाचे प्रमुख म्हणून ते १९९८ मध्ये निवृत्त झाले. गुजराती भाषेतील विपुल लेखनासोबतच चौधरी यांनी हिंदी भाषेतही लेखन केले आहे. आतापर्यंत ८०हून अधिक पुस्तके त्यांच्या नावावर असून, अनेक मोठे पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत. १९६५ ते १९७० या कालावधीत त्यांना गुजरात सरकारकडून दिले जाणारे अनेक वार्षिक पुरस्कार मिळाले. १९७५ मध्ये त्यांना रणजितराम सुवर्णचंद्रक पुरस्कार मिळाला, तर १९९७ मध्ये मुन्शी पुरस्कार मिळाला. त्याशिवाय कलात्मक लेखनासाठी १९७५ मध्ये रणजितराम सुवर्णपदक, उमा-स्नेहरश्मी पारितोषिक आणि २०१० मध्ये नर्मद पुरस्कारही त्यांना मिळाला. साहित्याव्यतिरिक्त त्यांना शेतीतही रस आहे. या वयातही ते त्यांच्या गावाला आणि शेताला आवर्जून भेट देतात.

अनेक साहित्यविषयक संस्थांचे पदाधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. ते गुजराती साहित्य परिषदेचे ट्रस्टी होते. २००१ मध्ये त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९९८ ते २००२ या कालावधीत ते साहित्य अकादमीच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य होते. तसेच २००२ ते २००४ या कालावधीत प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे ते सदस्य होते. २५ व्या भारतीय चित्रपट महोत्सवाचे ज्युरी मेम्बर म्हणूनही त्यांनी काम केले.

३री आवृत्ती

# परिशोध

मूळ लेखक
डॉ. एस्. एल्. भैरप्पा

अनुवाद
उमा कुलकर्णी

किंमत - २२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.





मरणाचा अर्थ समजेपर्यंत जीवन समजत नाही. केवळ जन्मणं त्यासाठी पुरेसं नाही. मरून जन्माला आलं पाहिजे. त्यानंतरच जीवनाचा खरा अर्थ समजतो. तीन वेळा मरायचा प्रयत्न केला, तरी विशिष्ट प्रकारचाच अनुभव आला. शुद्ध गेल्यासारखं - डोक्यात पाणी भरल्यासारखं - श्वास कोंडून जीव गुदमरत असतानाही पाण्याबाहेर यायला जमू नये, तसं. चढायला धडपडत असताना कुणीतरी पुन्हा गर्तेत लोटून द्यावं, तसं. भोवताली काळपट हिरवेपणा भरून राहावा...
खोल बुडत जावं...
खरंय् हे. मरण समजल्याशिवाय जीवनाची किंमत समजत नाही. मला असा अनुभव कधीच आला नाही. आत्महत्या करावी इतकं उत्कट दु:खही आयुष्यात कधी जाणवलं नाही. मग मला जीवनाची किंमत ठाऊक आहे काय? ठाऊक आहे, असं म्हणता येईल काय? माझं चिंतन कशा प्रकारे चालतं? साहित्य वाचणं - ते 'क्लासिक' आहे, याची काळजी घेत! पुस्तकं विकत घेणं, संध्याकाळच्या थंड सुखद हवेत फिरून येणं... उत्तम कॉफीचे घुटके घेत साहित्यातील पात्रांवर आणि प्रसंगांवर चिंतन करणं, प्रत्यक्ष आयुष्यात शक्यतो कुणालाही न दुखवता जगत राहणं!
जीवन म्हणजे एवढंच? अंहं...
एक जीवघेणा संघर्ष... चिरंतन परिशोध...




‘मॅकडोनल्ड्स – बिहाइंड द आर्चेस’
या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद

# कहाणी मॅकडोनल्डस्ची

## एका अमेरिकन उद्योगाची आंतरराष्ट्रीय भरारी




मूळ लेखक
जॉन एफ.लव्ह

अनुवाद
डॉ. सुधीर राशिंगकर

# जगाची खाद्यसंस्कृती बदलून टाकणारी किमया

## मेहनत, निष्ठा, मूल्ये आणि कल्पकता हे उद्योगांचे आधारस्तंभ असतील तर यश नक्की!

ही कंपनी अमेरिकन जीवनाचा एवढा अविभाज्य भाग बनली आहे की, तिच्या जगभरच्या १४००० रेस्टॉरंट्सच्या स्पर्धात्मक व आर्थिक महत्त्वाचे फारच क्वचित वेळा योग्य ते मोजमाप केले जाते. प्रत्येक जण म्हणतो की, मॅकडोनल्ड्स मोठी आहे; पण तिचा अमेरिकन उद्योगावर किती प्रभाव आहे, हे फारच थोड्यांना माहीत असते. काही जण एखाद्या रेस्टॉरंटच्या कमानीखालची निऑन साइन वाचतात की, मॅकडोनल्ड्सने नुकताच आपला १०० कोटीवा हॅम्बर्गर विकला. पण एकट्या अमेरिकेत विविध प्रकारच्या एकूण दोन लाख रेस्टॉरंट कंपन्या वा दुकाने आहेत. त्यांपैकी १४ टक्के रेस्टॉरंट मॅकडोनल्ड्सची असतात. म्हणजेच दर सहापैकी एक दुकान मॅकडोनल्ड्सचे असते. अमेरिकेतील फास्ट फूड उद्योगाच्या बाजारपेठेत मॅकडोनल्ड्सचा वाटा ७२०० कोटी डॉलर्स म्हणजे १८.३ टक्के आहे. हे प्रमाण या कंपनीनंतरच्या तीन उद्योगांच्या एकत्रित विक्रीच्या तिप्पट आहे. देशात विकल्या जाणाऱ्या एकूण हॅम्बर्गरपैकी ३४ टक्के हॅम्बर्गर ही कंपनी विकते, तर फ्रेंच फ्राइजबाबत हेच प्रमाण २६ टक्के आहे. जॉर्ज राइसची 'जीडीआर क्रेस्ट एंटरप्राइजेस' ही कंपनी अशी आकडेवारी गोळा करण्यात आघाडीवर आहे. तो म्हणतो की, या कंपनीची आकडेवारी एवढी प्रचंड आहे की, ती संगणकावर मावत नाही.

बाजारपेठेचा एवढा हिस्सा नियंत्रित करण्यात यश मिळाल्याने खाद्यपदार्थ प्रक्रिया क्षेत्रात मॅकडोनल्ड्सचा प्रभाव मोठा आहे. कित्येक वेळा अशी प्रक्रिया करणाऱ्या कंपन्यांनाही त्याची व्याप्ती लक्षात येत नाही. त्यांच्या हॅम्बर्गरच्या विक्रीची बाब पाहिली, तर मॅकडोनल्ड्स ही अमेरिकेतील बीफ विकत घेणारी सर्वांत मोठी कंपनी ठरते. फ्रेंच फ्राइजकरता ही कंपनी देशात पिकवल्या जाणाऱ्या बटाट्यांपैकी पाच टक्के बटाटे विकत घेते, तर चिकनबाबत हेच प्रमाण दोन टक्के आहे. या प्रचंड आकडेवारीमुळे आणि तिचा दर्जा व सातत्य याबाबतच्या आग्रहामुळे मॅकडोनल्ड्सने मांस व बटाटा यांच्या प्रक्रिया क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे.

कंपनीची खरेदीची ताकद एवढी प्रचंड आहे की, एखादा नवा

खाद्यपदार्थ कंपनीने बाजारपेठेत आणला, तर अमेरिकन ग्राहकांची खाण्या-पिण्याची आवड पार बदलून जाते आणि कित्येक उत्पादक व प्रक्रिया करणाऱ्यांचे भाग्य उजळते. कंपनीने १९७०मध्ये 'एग मॅकमफिन' हा पदार्थ ब्रेकफास्टच्या पदार्थयादीत घेतला, तेव्हा असे इंग्लिश मफिन्स हे देशाच्या काही भागातच मोठ्या प्रमाणावर विकले जाते होते. पण 'एग मॅकमफिन' देशभर लोकप्रिय झाले आणि तेव्हापासून बेकरीच्या धंद्याची वाढदुपटीने झाली. 'चिकन मॅकनगेट्स' १९८२मध्ये बाजारात आले व त्याचाही असाच प्रभाव पडला. आता 'केंटुकी फ्राइड चिकन' (केएफसी) नंतर चिकनचा मोठ्या प्रमाणावर वापर करणारी मॅकडोनल्ड्स ही दुसऱ्या क्रमांकाची साखळी दुकाने आहेत. ती 'हॅम्बर्गर किंग' म्हणूनही ओळखली जातात.

खाद्यपदार्थांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगात मॅकडोनल्ड्सचा प्रभाव तिच्या स्पर्धकांवरही पडतो. शीतपेयांचेच (सॉफ्ट ड्रिंक्स) उदाहरण पाहा. अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या कोका-कोलापैकी मॅकडोनल्ड्सच्या स्टोअर्समधून पाच टक्के विकला जातो – मग तो बाटल्या, कॅम्प वा फाउंटन्समधून असेल. जर मॅकडोनल्ड्सने कोका-कोलाऐवजी पेप्सी-कोलावर आपला शीत पेयांचा शिक्का मारला असता, तर कोका-कोला या पेप्सी-कोलाच्या ८ पॉइंट वर असलेल्या ब्रँडचा प्रभाव निम्म्याने खाली आला असता आणि या शीतपेयांच्या शर्यतीत कोका-कोलाची पेप्सीवर असलेली २:१ अशी आघाडी जवळजवळ संपुष्टात आली असती.

मॅकडोनल्ड्सची ताकद खाद्यपदार्थांव्यतिरिक्तच्या उद्योगातही दिसून येते. मॅकडोनल्ड्सने १९८२मध्ये 'सिअर्स'ला मागे टाकले, ते जगातील सर्वांत मोठी स्थावर मालमत्ता असलेली कंपनी म्हणून. खरंतर कंपनीचा स्थावर मिळकतीतला प्रभाव व उत्पन्न एवढे प्रचंड आहे की, त्यामुळे ती खाद्यपदार्थांच्या क्षेत्रातही प्रभाव पाडण्यात आणखी पुढे गेली आहे. जर ती स्थावर मालमत्तेच्या क्षेत्रातही नसती, तर ती कदाचित खाद्यपदार्थांच्या क्षेत्रातील पॉवर हाउस (ऊर्जाकेंद्र) बनली नसती. तिच्या समभागावरचा परतावा सरासरीने २५.२ टक्के आहे व १९८५मध्ये पब्लिक लि. झाल्यापासून उत्पन्नातील वाढ२४.१ टक्के आहे. असे असल्यामुळे आता तिची आर्थिक कामगिरी गृहीत धरली जाते. ज्यांनी सुरुवातीच्या काळात शंभर समभागांकरता २२५० डॉलर्सची गुंतवणूक केली, त्यांना पुढे ११ वेळा समभाग विभाजनाच्या प्रक्रियेतून ३७१८० एवढी समभागांत वाढ मिळाली आणि ३० जून १९९४ रोजी त्याचे बाजारमूल्य १० लाख डॉलर्स झाले. केवळ

१८-२० वर्षांतील ही वाढआहे, यावरूनच काय ते लक्षात येते.

मनुष्यबळ क्षेत्रातील कंपनीचा अमेरिकेतील अर्थव्यवस्थेवर असलेला प्रभाव बऱ्याच वेळा दुर्लक्षित केला जातो. कंपनीच्या कार्यपद्धतीत पगाराच्या यादीवर पाच लाख अधिकारी व कर्मचारी आहेत, त्यामुळे ती देशातील सर्वांत मोठी नोकऱ्या पुरवणारी यंत्रणा झाली आहे. ती शालेय विद्यार्थ्यांना फावल्या वेळात काम करायची व प्रशिक्षण घेण्याची संधी देते. त्यामुळे ते शिक्षण घेऊन बाहेर पडले की, कंपनीच्या यंत्रणेत मोठ्या पगारावर व पदावर लवकर पोहोचू शकतात. त्यामुळे कंपनीच्या रेस्टॉरंटमध्ये दर वर्षी मनुष्यबळात १०० टक्के बदल झाला तरी कामावर परिणाम होत नाही. कंपनीने आपल्या पहिल्या ३७ वर्षांत ८० लाख जणांना पहिल्या नोकरीची संधी दिली. त्यांतील कित्येक जण नंतर दुसऱ्या प्रकारच्या नोकरीत गेले. अशा रितीने अमेरिकेतील कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी १८.५ टक्के जणांनी कधी ना कधीतरी मॅकडोनल्ड्सच्या यंत्रणेत काम केले आहे व त्यापैकी कित्येकांनी पहिली नोकरी या कंपनीतच केलेली होती. दुसरीकडे काम करत असले, तरी कामाचे दैनंदिन वेळापत्रक पाळणे, कामातील शिस्त पाळणे आणि संघवृत्तीने काम करणे याचे पहिले धडे त्यांनी मॅकडोनल्ड्समध्ये गिरवले. मॅकडोनल्ड्सने आता अमेरिकेतील सर्वांत मोठी प्रशिक्षण देणारी यंत्रणा म्हणून अमेरिकन संरक्षणसेवेलाही मागे टाकले आहे.

या अज्ञात मॅकडोनल्ड्सची ओळख केवळ आर्थिक प्रभावामुळेच पटायला सुरुवात होते असे नाही; तर जे लोक ही कंपनी चालवतात आणि ज्या पद्धतीने चालवतात, त्यांच्यावरून पाहता या कंपनीचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व एक प्रचंड गूढआहे. तिथेच कंपनीची जनमानसातील प्रतिमा आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यांत बरीच तफावत दिसते. त्यामुळेच सेवाक्षेत्रातील ती अत्यंत यशस्वी कंपनी असली व सेवाक्षेत्रात काम करणाऱ्यांवर ती मोठ्या प्रमाणावर अवलंबून असली, तरी तिच्या यशाची सर्व रहस्ये कधीच प्रकाशात येत नाहीत.

कारण ती रहस्ये अनेक चुकीच्या प्रतिमांच्या थरांत दडून बसलेली आहेत. काहींच्या मते, ती रे क्रॉक या संस्थापकाच्या उद्योजकीय कौशल्यात आहेत. पण या क्षेत्रात क्रॉकने हिमालयाएवढे काम केले असले, तरी रे क्रॉक ही आख्यायिका बनलेली व्यक्ती रे क्रॉक या प्रतिभाशाली व्यक्तीला न्याय देऊ शकत नाही. रे क्रॉक हा खाद्यपदार्थ सेवेच्या व्यवसायामधला स्वप्ने पाहणारा द्रष्टा समजला जातो. काही जण त्याला विपणन (मार्केटिंग)

क्षेत्रातला नेता समजतात. फास्ट फूड कसे विकावे याचे आदर्श त्याने घालून दिले. तो काही वेळा शिस्तीचा एवढा भोक्ता समजला जातो की, त्याने आपल्या फ्रँचायझींना लहान मुलांसारखे वागवले व आपले नियम सैनिकी शिस्तीप्रमाणे पाळायला लावले. शिवाय त्याला या उद्योगातला सर्वशक्तिमान संस्थापक समजले जाते. हे सर्व असे की, हे समजण्यासारखे आहे. आजही मॅकडोनल्ड्समधील त्याच्या शिष्यांची फौज मोठी आहे आणि त्याच्या तत्त्वांवरची त्यांची भक्ती अजोड आहे.

तरीही मॅकडोनल्ड्सच्या यशाची कारणमीमांसा वेगळ्या प्रकारे करावी लागेल. क्रॉक स्वप्ने पाहणारा होता, पण त्याने फास्ट फूड या उद्योगाचा शोध लावला नाही किंवा ज्या मॅकडोनल्ड बंधूंनी या उद्योगाला सुरुवात करून दिली, त्यांनाही भेटणारा तो पहिला नव्हता. तसाच तो प्रथमदर्शनी पाहता विपणन तज्ज्ञ नव्हता. ज्या-ज्या खाद्यपदार्थांना त्याने बाजारात आणले, त्यांचा त्याने तिथे माराच केला – बॉम्बचा करावा तसा. आणि रेस्टॉरंटच्या आवारात कचरा दिसला वा त्यांच्या सेवेच्या ट्रेमधले हॅम्बर्गर बराच काळ पडून राहिले, म्हणून जरी त्याने फ्रँचायझींना फैलावर घेतले असले, तरी त्यांना सैनिकी शिस्त लावण्यातही तो फारसा यशस्वी झाला नाही.

मॅकडोनल्ड्सबाहेरच्या फार थोड्या लोकांना रे क्रॉकची हुशारी व कर्तृत्व माहीत आहे; त्यायोगे त्याने त्याचे व्यवस्थापक शिकवून तयार केले व त्यांना कामासाठी प्रोत्साहित केले आणि त्याच्या फ्रँचायझी, पुरवठादार यांच्या बाबतीतही तीच प्रक्रिया अवलंबिली. आपल्याबरोबर काम करणाऱ्या लोकांमधील सर्वोत्कृष्ट कौशल्यांचा समर्पक उपयोग कंपनीसाठी कसा करून घ्यायचा, याची खुबी त्याच्याकडे होती. क्रॉकची मॅकडोनल्ड्समधील यशाची कहाणी ही त्याच्यातल्या उत्तम उद्योजकाची कहाणी म्हणता येईल. पण नाही; ते त्याहूनही अधिक काही आहे. त्याने उत्तुंग यश मिळवले याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे, इतर शेकडो उद्योजकांवर विश्वास टाकून त्यांच्याकडून काम करून घेण्याची हुशारी व धैर्य त्याच्यात होते.

या उद्योगातील त्याच्याबरोबरच्या इतर फ्रँचायझींच्या मानाने तो कोटी-कोटी योजने पुढे गेला; पण ते फ्रँचायझींना शिस्तीचा बडगा दाखवून नव्हे. उलट, ज्या फ्रँचायझींचे या उद्योगात मालकीहक्क होते, त्यांची ताकद त्याने कामाला लावली. त्याने कार्यपद्धतीचे कडक पालन करण्याबाबत त्यांच्याकडे आग्रह धरला; पण त्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांना योग्य वाटेल त्या पद्धतीने विपणन करण्याचे स्वातंत्र्यही त्यांना दिले आणि आपण श्रीमंत व्हायच्या आधी

ते श्रीमंत कसे होतील, हे पाहण्याचे काम त्याने केले. त्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले. त्याने या उद्योगातील अत्यंत कार्यक्षम पुरवठापद्धत विकसित करून स्पर्धेत फ्रँचायझी यशस्वी कसे होतील, हे पाहिले. त्याद्वारे त्याने कार्यपद्धती बसवून देण्याची स्वत:मधील कौशल्याची जणू चुणूक दाखवून दिली. खाद्यपदार्थ, सयंत्रे व उपकरणे यांचे उत्पादन करणाऱ्या उद्योजकांची पुरवठा यंत्रणा त्याने त्यांच्यावरच विश्वास टाकून विकसित केली. त्यामुळे तेही उद्योजक झाले व त्याच्याशी एकनिष्ठ राहिले. तसेच त्याचे फ्रँचायझीही त्याच्याशी एकनिष्ठ राहिले. फ्रँचायझी, पुरवठादार व कंपनीचे अधिकारी हे त्याचे प्रमुख आधारस्तंभ एकत्रितरीत्या पाहिले; तर ३७०० विविध उद्योगांचे प्रतिनिधित्व करतात व क्रॉकने त्या सर्वांना समान ध्येयधोरणाद्वारे एका सूत्रात बांधले आहे.

त्याने या सर्वांना एकत्र आणून एका व्यवस्थापकीय कार्यपद्धतीत ज्या पद्धतीने बांधले आहे, त्यावरून त्याची व्यवस्थापकीय कार्यक्षमता स्पष्ट होते. आपल्या हाताखालच्या लोकांवर स्वामित्व गाजवणारा, अशी क्रॉकची बऱ्याच वेळा ओळख करून दिली जाते. प्रत्यक्षात बुद्धिमान, आक्रमक व वैविध्य असलेल्या व्यक्तिमत्त्वांना कौशल्याने एकत्र आणून त्याने एक मोठा उद्योग उभा केला, हे विसरले जाते. एकसमान अशा १४,०७७ रेस्टॉरंटची साखळी त्याने निर्माण केली. सैन्याची असते तशी ही एका केंद्रीय व्यवस्थापन असलेल्या लालफितीच्या कारभाराची जणू निर्मिती असावी. सकृद्दर्शनी असे वाटते की, मॅकडोनल्ड्स हे क्रॉकची जणू प्रतिकृती असलेल्या अनेक क्रॉकचा उद्योग आहे.

पण उद्योगातील लोकांना हे माहीत आहे की, तसे वास्तव नाही. त्याने आपल्या अधिकाऱ्यांवर स्वामित्व न गाजवता त्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देऊन त्यांना घडवले. प्रथमपासून त्याच्या व्यवस्थापकीय संघात विविध व्यक्तिमत्त्व असलेले लोक होते. त्यांतले काही कॉर्पोरेट कारभारात टिकलेही नसते. ते खरेतर अधिकारी नव्हते, तर रे क्रॉकच्या दृष्टीने ते उद्योजक होते.

मॅकडोनल्ड्समधले निर्णय हे व्यक्तिगत स्वयंस्फूर्तीने हाती घेतलेल्या कृतीमधून घेतले जायचे. समित्यांनी कल्पनांना एकच रूप दिले नाही, तर त्यांत विविधता ठेवली. नवी दिशा दाखवताना त्यात 'प्रयत्न करा, चुका करा' पद्धतीची प्रक्रिया राबवली आणि अशा नव्या कल्पना या कार्यपद्धतीत सर्व बाजूंनी, सर्व स्तरांतून येत राहतील, हेही पाहिले. रे क्रॉकच्या व्यवस्थापकीय सिद्धान्तात अपयशाचा धोका पत्करण्याची आणि झालेल्या चुका मान्य करण्याचीही तयारी ठेवणे, याला फार महत्त्व होते. जेम्स कुन्ह या पूर्वीच्या

उपाध्यक्ष व मॅकडोनल्ड्स यंत्रणेत २० वर्षे काम केलेल्या अधिकाऱ्याने क्रॉकच्या शैलीचे वर्णन केले आहे, ते प्रतिमा आणि सत्य परिस्थिती यांविषयी बरेचकाही सांगून जाते. ''आमची सामाजिक प्रतिमा आहे ती मुलायम, व्यावसायिक व सज्ञान विपणन तज्ज्ञांची. ते लवचीक व प्रसंगी उथळही आहेत. प्रत्यक्षात आम्ही जणू तोफांसारखे प्रोत्साहित लोक आहोत. त्यांतून गोळे सुटतात; पण दर वेळी ते लक्ष्यापर्यंत पोहोचतातच असे नाही. आम्ही भरपूर चुकाही केल्या आहेत; पण अशा चुकांतूनच आम्ही यशाकडे झेप घेतली आहे. कारण आम्ही चुकांतूनच शिकत गेलो आहोत. आम्ही भावनावशही होतो, आम्ही क्षमतेपेक्षा अधिक जलद पुढे जायचा प्रयत्न करतो; पण आम्ही केलेल्या घोटाळ्यांतून बाहेर पडण्यातही त्यामुळे आम्ही तरबेज होतो.''

मॅकडोनल्ड्सच्या यशाचे मुख्य रहस्य आहे ते समानता आणण्यात व कार्यपद्धतीशी एकनिष्ठ राहण्यात. पण हे करताना आपल्या क्षमतेचा बळी न देण्याची काळजी घेण्यात आणि अमेरिकेतील व्यक्तिस्वातंत्र्य व वैविध्यतेचा बळी न देण्यातही त्यांचे यश आहे. त्यामुळे सारखेपणा आणि सर्जनशीलता यांचा मिलाफ घडवण्यात मॅकडोनल्ड्स उद्योग यशस्वी होतो.

ज्या पद्धतीने मॅकडोनल्ड्सच्या उद्योगाचे तीन आधारस्तंभ असलेले फ्रँचायझी, अधिकारी व पुरवठादार परस्परांशी सहकार्य करतात, त्यावरून हे दिसून येते. आपापल्यापरीने ते स्वतंत्र उद्योजक आहेत. कोणीही कोणाचे मालक नाहीत. क्रॉकचे यश यात आहे की, असे असूनही त्याने या तिन्ही घटकांना उत्पादक कार्याविषयी एका जाळ्यात बांधले आहे. बऱ्याच वेळा उत्साहाच्या भरात रे क्रॉकलाच सर्व यशाचा शिल्पकार असल्याचे श्रेय दिले जाते. पण अज्ञात मॅकडोनल्ड्स ही कोणा एकाची निर्मिती नाही, ती एकच कंपनीही नाही; स्वतंत्रपणे काम करणाऱ्या शेकडो व्यक्तिगत उद्योगांना एका भागीदारीच्या जाळ्यात गुंतवून ठेवणारी ती संघीय यंत्रणा आहे.

या कार्यपद्धतीत गुंतलेल्यांसाठी आर्थिक उत्पन्न व दर्जा आणि सेवा व स्वच्छतेचे प्रमाण समान आहे; त्याव्यतिरिक्त त्यांच्यात कोणतेच साम्य नाही. त्यांच्या परस्परसंबंधांत काही विशिष्ट घडत नाही. ''मॅकडोनल्ड्समध्ये कोण कशाचा प्रमुख आहे, हे कित्येक वेळा कळत नाही; कारण तिथे 'ऑर्गनायझेशन चार्ट' नावाची गोष्टच नसते,'' असे दीर्घकाळचा पुरवठादार टेड पर्लमन म्हणतो. हा अशा रचनेचा अभाव रे क्रॉकच्या स्वभावधर्मानुसार आहे. मिळतील तिथून कल्पना उचलायची सवय त्याला होती. ती कुठून आली यापेक्षा ती कामाची आहे ना, हे त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते आणि

आजही कंपनी व्यक्तिगत कामगिरीला भरपूर महत्त्व देते. त्यामुळेच उद्योजकतेचा विकास सर्व पातळ्यांवर करण्यात कंपनी आघाडीवर आहे.

त्यामुळे या कार्यपद्धतीतील व्यक्ती उद्योजकीय स्वार्थामुळे प्रेरित होतात, तरी त्यात स्वार्थाचा अंश नसतो. मॅकडोनल्ड्समधल्या यंत्रणा इतक्या भिन्न आहेत व अधिकार इतके विकेंद्रित आहेत की, इथे कोणी एक व्यक्ती मालक नाही. या यंत्रणेतील ३५०० फ्रँचायझी, ५०० पुरवठादार व कंपनीचे अधिकारी यांच्यातील संबंध हे अनेक तपासण्या व कार्यातील समतोल यांवर आधारित आहेत. स्टोअर्सची काळजीपूर्वक तपासणी व निरीक्षण यांमुळे त्यांच्या कार्यावर वचक राहतो. पण कॉर्पोरेट अधिकाऱ्यांनी केलेली जबरदस्ती वा दडपशाहीविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार फ्रँचायझीनाही असतो. पुरवठादारांबरोबरचे संबंधही असेच परस्परांत गुंतलेले असतात.

पुरवठादार बाहेरचे नसतात, तर ते उद्योगातले कुटुंबीय असतात व कंपनीचा दर्जा कायम ठेवण्यासाठी तेही तेवढेच तत्पर असतात.


मॅकडोनल्ड्सच्या या कार्यपद्धतीचा इतिहास ही अशा एका संघटनेची कहाणी आहे की, जिने शेकडो उद्योजकांची ताकद समान उपभोगाच्या व फायद्याच्या कामासाठी कशी जुंपायची हे पाहिले. धोरणे व निर्णय याआधारे तिचा कारभार चालतो. पण हे फायदे वा उपयोग कोणते, हे कोणी एक व्यक्ती ठरवत नाही; तर ती या तिन्ही घटकांची परस्परांतील विचारविनिमय व निर्णयक्षमता यांतून ठरते. या व्यक्तिगत सर्जनशीलतेला कॉर्पोरेट यंत्रणेत एकसमान बांधण्यात क्रॉकचे यश आहे आणि मॅकडोनल्ड्सचा इतिहास हा या एकसूत्रातील बांधणीबाबतचा अभ्यास आहे.

काही अमेरिकन कंपन्या आता इतर देशांकडे व्यवस्थापकीय सूत्रांसाठी पाहत आहेत. त्यांचे अनुकरण करायचा प्रयत्न करताहेत. पण मॅकडोनल्ड्सची कहाणी सांगते की, उद्योग आपली स्वत:ची योग्य ती प्रणाली विकसित करून यशस्वी होऊ शकतो. हा एका उद्योगाचा इतिहास नाही, कारण मॅकडोनल्ड्स ही फक्त एका उद्योगाची यशोगाथा नाही. पण ही कहाणी आहे अशा उद्योगाची – ज्याने जनतेची खाद्यसंस्कृती व पद्धती बदलल्या, अमेरिकेतील व नंतर जगातील खाद्य सेवा व खाद्यप्रक्रिया उद्योग बदलला आणि फ्रँचायझिंगच्या कार्यपद्धतीला कायदेशीर स्वरूप दिले. ही माहीत नसलेल्या मॅकडोनल्ड्सची कहाणी आहे. उद्योजक व कॉर्पोरेशन्स यांना एकसूत्रात बांधणारी ही अमेरिकेची पहिली उद्योजकीय यशोगाथा आहे.




# अंतरंग कोका-कोलाचे

## जगप्रसिद्ध ब्रॅन्डच्या जडणघडणीची कहाणी




**मूळ लेखक**
**नेव्हिल इझडेल**
**व डेव्हिड बीसले**
**अनुवाद**
**प्रदिप सिंदेकर**



इझडेल हे ‘कोका-कोला’ कंपनीचे माजी अध्यक्ष व प्रमुख कार्यकारी संचालक (सीईओ) आहेत. मूळचे आयर्लंडचे इझडेल झांबियात लहानाचे मोठे झाले. दक्षिण आफ्रिकेत त्यांचं कॉलेजचं शिक्षण झालं. आता पत्नी पामेलासह ते बार्बाडोस इथे राहतात.

डेव्हिड बीसले हे या पुस्तकाचे लेखक असून, ते अटलांटा-निवासी आहेत.

# कोका कोलाचा विश्वव्यापी संचार

कोका-कोला कंपनीचा सीईओ म्हणून मी मोठ्या आनंदाने निवृत्त झालो. बार्बाडोस या बेटावर नियमितपणे गोल्फ खेळत, कॅरेबियन उन्हामध्ये भटकत मी आनंदात जगत होतो. २००४ सालच्या फेब्रुवारी महिन्यात, डोनाल्ड कियो या आमच्या कंपनीच्या इतिहासात प्रसिद्ध असलेल्या माजी अध्यक्षांचा मला फोन आला. कंपनीचे विद्यमान अध्यक्ष व प्रमुख कार्यकारी अधिकारी डग्लस डॅफ्ट यांनी फक्त चारच वर्षांच्या कालावधीत कंपनी सोडण्याचं ठरवलं.

डॅफ्ट यांच्या जागेवर माणूस शोधण्याच्या समितीत अध्यक्ष म्हणून डॉन यांची नेमणूक झाली होती. त्यांना हे जाणून घ्यायचं होतं की, मी या पदासाठीच्या खुर्चीवर बसण्यासाठी रिंगमध्ये हॅट टाकणार होतो का? म्हणजे नशीब आजमावणार होतो का? कशाचीही शाश्वती अशी नव्हती, पण त्यांची अशी इच्छा होती की, मी एक लायक उमेदवार आहे हे बोर्डाला कळावं.

कोका-कोला कंपनीचे अंधकारमय दिवस चालू होते. डॅफ्ट यांचे पूर्वसुरी डग्लस इव्हेस्टर हे फक्त दोन वर्षं टिकले. वॉरेन बफेंचा समावेश असलेल्या कोका-कोलाच्या संचालक मंडळाने त्यांना शिकागो विमानतळावरच सांगितलं की, त्यांना यापुढे संचालक मंडळाचा पाठिंबा राहणार नाही.

ऑक्टोबर, १९९७ पासून कंपनीची दुरावस्था झाली होती. कंपनीचे अध्यक्ष आणि सीईओ रॉबर्टो गोइझुएटा यांचा त्या वर्षी मृत्यू झाला. त्यांच्या सोळा वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी कंपनीचं बाजारमूल्य चार अब्ज डॉलर्सवरून दीडशे अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवलं. तरीही गोइझुएटांच्या पश्चात कोकचा बाजारातील हिस्सा घटायला लागला. कंपनीची गाडी पुन्हा रुळावर आणण्यासाठी हजारोंच्या संख्येनं केलेली कामगार कपातही उपयोगी पडत नव्हती.

‘आनंदाचं पेय’ म्हणून कोका-कोलाचं विपणन (मार्केटिंग) केलं जात होतं. कोका-कोलाच्या कित्येक जाहिरातींमध्ये या शब्दांचा उपयोगही होतो; पण २००४ साली अटलांटामधील नॉर्थ ॲव्हेन्यू येथील कोका-कोलाच्या मुख्यालयात मात्र साधं स्मित करण्याजोगीही परिस्थिती नव्हती.

‘यूएस सिक्युरिटीज ॲन्ड एक्स्चेंज कमिशन’तर्फे कोका-कोलाची जपानमधील ‘चॅनल स्टफिंग’साठी चौकशी केली जात होती. चॅनल स्टफिंग म्हणजे स्टॉक मार्केटमधील कंपनीच्या शेअरची किंमत कृत्रिमरीत्या

वाढवण्यासाठी कॉन्सन्ट्रेटची वाढीव विक्री दाखवणे. तसा आरोप कंपनीवर करण्यात आला होता. कोलंबियामधील युनियनच्या संचालकांना दहशत घालण्यासाठी अतिरेकी गटांना सुपारी दिल्याचा कंपनीवर आरोप होता. कंपनीचा प्रमुख सल्लागार व नंतर मॅसेच्युसेट्सचा गव्हर्नर डेवल पॅट्रिक याने डॅफ्टकडे राजीनामा दाखल केला होता. कोलंबियामधील या वादाबाबत बोलताना तो म्हणाला की, कोकचे इतर उच्च अधिकारी व माझ्यात, म्हणजे पॅट्रिकमध्ये, काही बाबतीत वाद झाला. दोन्ही बाजू आग्रह धरत होत्या की, समोरच्याने कंपनीचा राजीनामा द्यावा. कोकच्या नोकरीवर ठेवण्याविषयीच्या पद्धती कोर्टाने नेमलेल्या एका समितीने तपासल्या. मोठ्या वंशभेदाच्या त्या सुनावणीवर तोडगा काढण्यासाठीचा आदेश कोर्टाने दिला होता. कोकने 'ॲंटिट्रस्ट' कायद्याचे उल्लंघन केले आहे का, याची तपासणी परदेशात 'युरोपियन युनियन'द्वारा होत होती. ही अशी लंबीचौडी यादी होती.

जेव्हा नव्या अध्यक्ष व प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्याचा शोध घ्यायला समिती गठित केली, तेव्हा कंपनीमधला एकच उमेदवार समोर होता. तो म्हणजे कंपनीचा प्रेसिडेंट स्टीवन हेयर. तोच सर्वांत लाडका ठरेल, असं वाटत होतं. कारण, कोकची एक नीती ठरलेली आहे; कंपनीच्या चेअरमन व सीईओ पदासाठीची व्यक्ती कंपनी क्वचितच बाहेर शोधते.

मी डॉनला आश्वासन दिलं की, मी माझ्या पत्नी पामेलाबरोबर चर्चा करून दहा दिवसांत निर्णय कळवेन.

माझ्या कोकमधल्या तीस वर्षांच्या सेवा-कालावधीत चेअरमन व सीईओच्या पदासाठी माझा गांभीर्यानं कधीच विचार यापूर्वी झाला नव्हता. त्या पदाची आसही मी कधी धरली नव्हती. आपल्याला हे शक्य आहे, असंही कधी वाटलं नव्हतं. अगदी २००३ सालच्या उन्हाळ्यात कंपनीतल्या निवृत्त्यांमध्ये डॅफ्टला लवकरच बदललं जाण्याची शक्यता वर्तवली जात असतानाही तसं वाटलं नाही. निवृत्त माणसं असं काही ना काही बोलतच असतात. त्यातल्या काहींनी तर असंही सांगितलं की, माझ्या नावाला त्यांनी समर्थन दिलं आहे. तेव्हा मी त्यांना छातीठोकपणे सांगितलं की, मी हे काम घेणार नाही. मी म्हणलो होतो मला नेमकं तेच म्हणायचं होतं आणि पामेलाचाही माझ्या या भूमिकेला पाठिंबा होता. आता मी चौसष्ठ वर्षांचा आणि आर्थिकदृष्ट्या सुस्थिर होतो. निवृत्तीनंतर माझं वजन दहा पाउंडांनी घटवलं होतं आणि शारीरिकदृष्ट्या मी ठणठणीत होतो. रोज कामाचे पंधरा तास, असे कित्येक दिवस आणि जगभर भटकण्याची कित्येक दशकं संपवून

माझ्या कुटुंबासोबत घालवायला मला नुकताच कुठे वेळ मिळत होता. डॉनच्या कॉलनंतर पामेलानं तिची भूमिका पुनरुच्चार करत मांडली. मी चेअरमनचं पद स्वीकारावं असं काही तिला वाटत नव्हतं. या सगळ्या प्रकारानं माझं आरोग्य ढासळणं आणि आनंदी सुखी निवृत्तीचं स्वप्न उद्ध्वस्त होणं हे तिला पटत नव्हतं. ''जर अपयशी ठरलास तर काय होईल?'' तिनं विचारलं.

गोइझुएटानंतर एकही चेअरमन यशस्वी झाला नव्हता आणि पामेलाला भीती होती की, त्या दोन अपयशी चेअरमनच्या पंक्तीत मी तिसरा जाऊन बसेन. त्यांनी प्रयत्न केले होते; पण ते अपयशी ठरले होते. चर्चेचा मार्ग खुला करताना ती हेही म्हणाली की, माझ्या कोणत्याही निर्णयात ती माझ्या बाजूने असेल.

''जर मी हे हाती घेतलं तर अपयशी नक्कीच होणार नाही.'' मी हे पामेलाला अगदी जोरात, ठामपणे सांगितलं, पण येणाऱ्या तणावाबाबत मात्र सहमती व्यक्त केली. एक अतिशय आश्चर्यकारक कारकिर्द मी अनुभवलेली होती आणि निवृत्तीमध्ये आम्ही आनंदीसुद्धा होतो; पण खरा प्रश्न असा होता की, एवढं बिनीचं आव्हान टाळून मी सुखाने जगू शकलो असतो का?

माझ्यासारख्या माजी रग्बी खेळाडूसाठी या प्रश्नाचं उत्तर होतं – ''नाही, मला हे शक्य नव्हतं.''

डॉनच्या फोननंतर, एका आठवड्याने मी पामेलाला 'सांगितलं', असं म्हणण्यापेक्षा, धक्का दिला की, पाच वर्षांसाठी ही जबाबदारी मी घेणार आहे. आणि मग खेळाला सुरुवात झाली.

जगभरात कोकसाठी मी बऱ्याच लढाया लढलो आहे. ज्या बाजारपेठांमध्ये कंपनीचा मार्ग हरवला होता किंवा जिथं कंपनीचा बाजारातील हिस्सा घटत होता; विशेष करून तेथे या लढाया होत्या. 'अल्टिमेट टर्न अराउंड', म्हणजे संपूर्ण कायापालटाची ही वेळ होती. थोडक्यात संपूर्ण कंपनीलाच नव्यानं जीवदान देण्याची ही संधी होती. संचालक मंडळाच्या सदस्यांबरोबर मुलाखती आणि चर्चा चालू होत्या. वृत्तपत्र व माध्यमांनी 'हेयर' हा प्रमुख दावेदार म्हणून रंगवला होता. आपल्या उमेदवारीचा प्रचार करण्यासाठी खासगी संस्थांना त्यानं नेमल्याच्या अफवाही पसरल्या होत्या. माझ्या नावाचा क्वचितच उल्लेख होत होता. पण मला खातरी होती की, मीच पुढे होतो.

**जॅक वेल्शचा प्रवेश –**

वेल्श हा बिझनेस आयकॉन आहे. 'जनरल इलेक्ट्रिक कंपनी'चा तारणहार म्हणून प्रसिद्ध आहे. १९८१मध्ये जेव्हा तो सीईओ झाला तेव्हाच्या

जीई कंपनीच्या १४ अब्ज डॉलर बाजारमूल्यावरून त्यानं २००१ सालापर्यंत कंपनीचं बाजारमूल्य ४१० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवलं. १९९५ सालच्या 'फॉर्च्यून' मासिकाने वेल्श आणि रॉबर्टो गोइझुएटा यांना 'वेल्थ बिल्डर्स' या बिरुदाने गौरवलं होतं.

२००४ सालच्या एप्रिलमध्ये जॅकचं लग्न झालं. आत्तापर्यंत मला फक्त विचारणा झालेल्या कोका-कोलाच्या चेअरमन व सीईओ पदासाठी जॅकशी त्याच्या लग्नातच थेट संपर्क साधला गेला. 'विचार करू' एवढं आश्वासन देऊन जॅक हनिमूनसाठी निघून गेला. जगातल्या अनेक ठिकाणी त्याला हनिमून साजरा करायचा होता. संचालक मंडळाशी इकडे माझ्या चर्चा व भेटीगाठी चालू असताना तो मात्र बार्बाडोसमध्ये होता. माझ्यापासून काही किलोमीटर अंतरावर. विचार असा होता की, वेल्शला नेमल्यास कंपनीत चैतन्य संचारेल व बाजारात कंपनीच्या शेअर्सची किंमतही वाढेल. मलाही खातरी आहे की, असंच झालं असतं.

२४ एप्रिल रोजी एडिंबरोच्या माझ्या व्यावसायिक ट्रिपवरून मी नुकताच बार्बाडोसला परतलो होतो. तेवढ्यात कोकच्या संचालक मंडळातील एक सदस्य हर्बर्ट ॲलनचा मला फोन आला. त्याला हे जाणून घ्यायचं होतं की, वेल्शच्या अधिपत्याखाली एक-दोन वर्षं काम करायची माझी तयारी आहे का? त्यानंतर मी चेअरमन व सीईओ म्हणून कार्यभार सांभाळावा, असा त्याचा प्रस्ताव होता.

मी नकार व्यक्त केला. कोकमध्ये खूप समस्या होत्या. 'टर्न अराउंड' खूप धोकादायक होता. मला त्यासाठी प्रयत्न जरूर करायचे होते, पण माझ्या पद्धतीने. दुसऱ्याच्या हाताखालीवर नव्हे. वेल्शने जीईमध्ये कमाल करून दाखवली होती हे खरं, पण सॉफ्ट ड्रिंक व्यवसायातलं त्याला फार कमी कळत होतं. कोका-कोलात मी माझं आयुष्य वेचलं होतं. झांबियातल्या बॉटलिंग प्लॅन्टवर सुरुवात करून वर चढत चढत उच्च पदापर्यंत मी पोहोचलो होतो. मला असंही वाटलं की, माझ्या व जॅकच्या व्यवस्थापनांच्या पद्धतीत अंतर्विरोध व कलह होण्याची दाट शक्यता होती. तरीही एक टीम म्हणून संचालक मंडळाला आम्ही आकर्षक जोडी वाटत होतो हे मला माहीत होतं. एका मोठ्या उद्योगाचा प्रमुख म्हणून जॅकचा अनुभव उल्लेखनीय होता. याउलट सीईओ आणि चेअरमन म्हणून माझा अनुभव युरोपमध्ये बॉटलर दर्जाचा होता.

हर्बर्टवर आमचा विश्वास होता आणि आम्हाला त्याचं कौतुकही होतं. त्याच्याशी बोलल्यानंतर मी फोन ठेवला. पामेलाला वळून सांगितलं, ''हे

प्रकरण आता बंद झालेलं आहे.''

तिकडे अजूनही हनिमूनवर असलेल्या वेल्शचे पाय मात्र थरथरायला लागले. वेल्शनी या पुस्तकासाठी दिलेल्या मुलाखतीत म्हटलंय, ''जगभर प्रवास करण्याचा विचार मी करायला लागलो तसं मी मनाशी म्हटलं की, आपण एकदा हे केलेलंच आहे... मग अठ्ठेचाळीस किंवा बहात्तर तास; जे काही असतील तेवढा वेळ मी विचार केला आणि मग मी खऱ्या अर्थाने जागा झालो.''

स्कॉटलंडमधून बार्बाडोसला परतल्यावर थोड्याच वेळात चेअरमन व सीईओ पद देऊ करणारा फोन मला आला. चेअरमनचं पद सांभाळण्यासाठीचा मी कंपनीच्या इतिहासातला बारावा माणूस होतो.

४ मे रोजी व्यवहाराच्या दिवसाच्या शेवटी कंपनीने माझी नेमणूक जाहीर केली. दुसऱ्या दिवशी मुख्यालयातील कर्मचाऱ्यांशी माझी भेट निश्चित करण्यात आली.

रॉबर्टो गोइझुएटचा ड्रायव्हर जोएल रौसेयू होता. अटलांटाच्या एअरपोर्टवर तो मला, पामेला व कॅराला भेटला. अचानक मला असं वाटलं की, जोएलजवळ रॉबर्टोच्या विधवा पत्नीचा – ओलगुइटाचा फोन नंबर असला तर पाहावा. त्याला तो तोंडपाठ होता. ताबडतोब मी ओलगुइटाला फोन केला आणि सांगितलं की, मी नुकताच अटलांटाला परत आलो आहे. बोलता बोलता मी तिला आश्वासन दिलं की, थोर रॉबर्टोच्या काळात कंपनी ज्या स्थानावर होती तिथं मी परत कंपनीला घेऊन जाईन.

कंपनीच्या प्रांगणात मी, डॅफ्ट व हेयर यांना भेटण्यासाठी आलो. आमचं स्वागत करण्यासाठी कंपनीचे कर्मचारी जमा झाले होते. भाषण देण्यासाठी तिथं पोडियम ठेवलं होतं; पण डॅफ्टचा आग्रह होता की भाषणबाजी नको. काही महत्त्वाचे मुद्दे या ठिकाणी व्यक्त करणं आवश्यक आहे. माझ्या या मताशी हेयरने सहमती दर्शवली. ज्या लोकांचं नेतृत्व करायचं त्यांना मी प्रथमच तर भेटत होतो. मी मोजकंच बोललो. कोका-कोला ब्रॅन्डवर माझ्या असलेल्या विश्वासाबाबत मी बोललो. त्यानंतर मी पुस्ती जोडली की, ''हा विषय तुम्हा लोकांबाबत आहे आणि माझा तुमच्यावर विश्वास आहे.''

कर्मचाऱ्यांना हेच हवं होतं. मी अगदी योग्य सूर पकडला होता.

माझा कार्यकाल १ जूनला सुरू व्हायचा होता. पण त्यासाठी सर्वप्रथम मला बार्बाडोसच्या अमेरिकन दूतावासातून 'वर्क परमिट' मिळवावं लागणार होतं. बूथपर्यंत पोहोचण्यासाठी मी रांगेत उभा होतो. तिथं पोहोचल्यावर दूतावासातल्या अधिकाऱ्याने माझ्याशी अरेरावी केली. तो अधिकारी

बुलेटप्रूफ काच बसवलेल्या खिडकीच्या आतमध्ये बसून बोलत होता. माझी उंची सहा फूट पाच इंच आहे. साधारणपणे माझ्या छातीच्या उंचीपर्यंत येईल, एवढ्या उंचीवर मायक्रोफोन बसवलेला होता. त्यामुळे बोलताना मला वाकून उभं राहावं लागत होतं.

अधिकाऱ्यानं मला विचारलं, ''तुम्ही जे काम करायला निघाला आहात त्यासाठी अमेरिकन माणसं मिळत नाहीयेत काय? त्यासाठी परदेशी माणूस कशाला हवा?''

प्रश्न चांगलाच मुद्द्याचा होता. पण याचं उत्तर मी द्यायचं कारण नव्हतं. ''कोका-कोला कंपनीच्या संचालक मंडळाचा तो निर्णय आहे,'' मी उत्तरलो. ''ते लोकही अमेरिकन आहेत आणि मला खातरी आहे की, ते जे काही करताहेत ते त्यांना चांगलं कळतं.''

माझं वर्क परमिट मिळायला काही आठवडे लागणार होते. म्हणून मग कोका-कोला कंपनीने त्यांच्या एक्झिक्युटिव्हची टीम बार्बाडोसला पाठवून दिली. त्यांनी कंपनीच्या स्थितीबाबत मला सगळं काही सांगितलं. कॅरेबियन समुद्राकडे तोंड असलेल्या व्हरांड्यात आम्ही बसलो होतो. विविध कागदपत्रांमध्ये आम्ही बुडून गेलो होतो. मी म्हटलं, ''चला, आपण बिअर घेऊ.'' कंपनीचा प्रमुख फायनान्स ऑफिसर गॅरी फेयार्ड त्या वेळी निळ्या कॅरेबियन समुद्रातल्या सूर्याचा अस्त पाहत होता. तो मोठ्याने म्हणाला, ''एवढी छान शांत जागा सोडून तू पुन्हा एकदा उद्योगजगताच्या धकाधकीत कशाला उडी मारतोएस? तू वेडाबिडा आहेस का?'' हासुद्धा तसा छान प्रश्न होता. मात्र तोपर्यंत माझा निर्णय पक्का झाला होता.

वर्क परमिट अपेक्षेपेक्षा लवकर आलं. माझ्या कामावर रुजू होण्याच्या तारखेच्या एक आठवडा अगोदर मी अटलांटाला पोहोचलो. डग डॅफ्ट सोडून गेला होताच. मग मी माझ्या नव्या टेबलावर जाऊन बसलो. अजून मी कंपनीच्या कर्मचारी यादीतही नव्हतो. तिथूनच मी वॉरन बफेंना फोन लावला आणि म्हटले, ''कोका-कोला कंपनीसाठी मी धर्मार्थ – स्वयंसेवक म्हणून काम करतोय.''

''अरे वा, सुंदर! हे असंच का नाही चालू ठेवत तू?'' वॉरन बफेनं फिरकी घेतली.

हे पुस्तक मी लिहितोय; कारण मला बऱ्याच मित्रांनी आग्रह केला होता की, यामुळे कोका-कोला कंपनी व तेथील माझ्या भूमिकेतून कित्येकांना नवीन काही शिकायला मिळेल. जगातील सर्वांत लोकप्रिय ब्रॅन्डला पुनर्स्थापित करण्याची कहाणी अभ्यासासाठी वस्तुपाठ ठरेल. त्रयस्थपणे कथा

सांगू नये, अशा ठाम मताचा मी आहे. मला स्वत:ला व कंपनीला पूर्णत्वाने जाणून घेण्यासाठी माझ्या कारकिर्दीचा आलेख अगदी सुरुवातीपासून मांडायला हवा. अगदी झांबियापासून. यानंतर दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, फिलिपाइन्स आणि मग जर्मनी. तो एक आश्चर्यजनक कालावधी होता. बर्लिनची भिंत त्या वेळी पडली. पोलादी पडद्याआडचं रशियन साम्राज्य खुलं झालं. भारत आणि मध्यपूर्वेत कोकचा पुन्हा शिरकाव झाला आणि त्याच वेळी चेअरमन व सीईओ म्हणून पाच वर्षं मी व्यतीत केली.

'हँगओव्हर' (खूप मद्यप्राशन केल्यानंतर डोके जड होणे-दुखणे) व डोकेदुखीवरचं औषध म्हणून कोका-कोलाची निर्मिती झाली होती. अटलांटामधील एक औषधतज्ज्ञ जॉन पेंबरटनने मे, १८८६मध्ये या कंपनीची पायाभरणी केली. आज जगातल्या तीन देशांव्यतिरिक्त सगळीकडे कोका-कोलाची विक्री होते. ते तीन देश म्हणजे उत्तर कोरिया, क्यूबा आणि म्यानमार. कोक हे गुणवत्तापूर्ण; पण स्वस्त असं उत्पादन आहे. अँडी वॉरहोल या कलाकाराच्या शब्दात सांगायचं झालं तर 'राजापासून रंकापर्यंत सर्वांना याचा स्वाद समान आहे.' कोका-कोला ही सर्वठायी असणारी कंपनी आहे. सॅन्टाक्लॉजच्या आधुनिक प्रतिमेला उभं करण्यात कंपनीच्या जाहिरातींचा मोठा हात आहे. कोका-कोला हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वपरिचित शब्द आहे. पहिल्या क्रमांकाचा शब्द आहे 'ध्ख' – ओके. कोका-कोलाची ओढ मोठी गूढ आहे. त्याच्यात नेमकं काय-काय आहे हे गुपित फारच थोड्या लोकांना माहीत आहे. मलासुद्धा तो फॉर्म्युला माहीत नाही.

जगातील मोजक्या प्लॅन्ट्समध्ये कोका-कोला आपलं गुप्त रसायन तयार करतं. त्याच्या इतर घटकांबरोबर त्याचं ब्लेंड करून, गाळून कोका-कोलाचें कॉन्सन्ट्रेट तयार होते. या कॉन्सन्ट्रेटवरच प्रक्रिया होऊन सिरप फॉर्ममध्ये आणून निरनिराळ्या रेस्तराँमध्ये आणि बॉटलिंग प्लॅन्ट्समध्ये स्वतंत्र बॉटलर्सना ते वितरित केलं जातं. इतिहासात हे कॉन्सन्ट्रेट विकूनच कोका-कोलाने फायदा मिळवला होता. काळाच्या ओघात मूळ कंपनीने कित्येक बॉटलिंग कंपन्या विकत घेतल्या. २०१० साली कंपनीने नॉर्थ अमेरिकन ऑपरेशन करणाऱ्या सर्वांत मोठ्या बॉटलर कंपनीला ताब्यात घेतलं. 'कोका-कोला एंटरप्रायझेस' म्हणजेच 'कोक'कडे युनायटेड स्टेट्स आणि कॅनडातील नव्वद टक्के बॉटलिंग ऑपरेशन्स आहेत.

काही अंगांनी पाहिल्यास कोका-कोला कंपनी आदर्श आहे, असं म्हणायला हरकत नाही. इथे नफा चांगला आहे. जगात कुठेही मिळणारं

आणि खपणारं हे उत्पादन आहे. अगदी परवडणाऱ्या किमतीत ग्राहकाला काही क्षणांचा आनंद हे उत्पादन मिळवून देतं. पण आजच्या जगात खरंतर हे पुरेसं नाही. मघाशी उल्लेखलेल्या विवादांवरून हे स्पष्ट आहे की, कोका-कोला जागतिक स्तरावर आदर्श मानला गेला नाही. विशेष करून काही उच्चभ्रूंमध्ये याला स्थान नाही. कोका-कोला स्थूलता व मधुमेहकारक आहे, असा आरोप त्याच्यावर होतो. भारतातील भूजल पुरवठा नामशेष केल्याचा आरोपही केला जातो. या आणि अशाच काही अनेक वाईट आरोपांचा यांमध्ये समावेश होतो.

मार्च, १९७०मध्ये कोका-कोलाचे अध्यक्ष पॉल ऑस्टिनने एक वाक्य म्हटलं होतं – ''जेवढा आपण जास्त पैसा कमवू तेवढं आपलं कमी स्वागत होईल.'' कोका-कोलाचे १९२३ ते १९५४ सालातील नेते रॉबर्ट डब्ल्यू. वूडरफना लिहिलेल्या पत्रात त्यांनी हे वाक्य ते उद्धृत केलं आहे.

सॉफ्ट ड्रिंक बनवणं आणि नफा कमावणं याव्यतिरिक्तही काहीतरी करायला हवं याची जाण ऑस्टिन यांना होती. आजही जगातील अनेक मल्टिनॅशनल कंपन्यांना समस्यांचं मूळ म्हणून लक्ष्य बनवलं जातं.

उद्योगजगताच्या सामाजिक बांधिलकीबाबत बरंच काही आजकाल लिहिलं जातं. पण जागतिक स्तरावर कार्यरत कंपन्यांना तोंड द्यावं लागणाऱ्या आव्हानांची अगदी अपूर्ण व्याख्या त्यामध्ये आढळते. दक्षिण आफ्रिकेत महाविद्यालयीन शिक्षण घेताना आम्हाला समाजसेवेचं प्रशिक्षण मिळालं होतं. पण कारकिर्दीसाठी मात्र मी व्यवसायाचा मार्ग निवडला होता. मला असं खातरीने वाटतं की, नव्या जगात या दोन शाखांना एकत्रित करायला हवं. यासाठी तीन क्षेत्रांतून भरीव प्रयत्न व्हायला हवे. ती क्षेत्रं म्हणजे सरकार, ना-नफा तत्त्वावर काम करणाऱ्या संस्था आणि उद्योगविश्व यांनी सोबत काम करायला हवं. यामुळे सुंदर जगाची निर्मिती होईल. आपला ग्रह अधिक स्वच्छ होईल. गरिबी आणि अनारोग्य यांच्याशी लढा अधिक तीव्र होईल. यालाच मी 'कनेक्टेड कॅपिटालिझम' म्हणतो.

या दिशेने कंपनीची वाटचाल करण्याचा प्रयत्न मी कोका-कोलाचा अध्यक्ष असताना केला. बऱ्याचशा जागतिक कंपन्या व कोका-कोला कंपनीत हे काम चालू आहे. हे एक महत्त्वपूर्ण आंदोलन आहे. माझ्यानंतर आलेले मुहतार केंट यांनीही तेच पुढे चालवायचं ठरवून हे तत्त्व आपलंसं केलं आहे. मला विश्वास वाटतो की, शेवटी याच्यातूनच भांडवलवादाची खरी व्याख्या होईल.

हे पुस्तक म्हणजे सर्वसाधारण व्यवसायविषयक पुस्तकही नव्हे आणि आत्मचरित्रही नव्हे. खरंतर हे एक खासगी भाष्य आहे. तर या 'इनसाइड कोका-कोला'च्या प्रवासात माझ्यासोबत सामील व्हा. माझ्या जीवनकथेत घाबरवणारे, तसेच भविष्याची आशा असलेले जागतिक व्यवसायाचे किस्से-घटना तुम्हाला वाचता येतील.


३०वी आवृत्ती

शिवचरित्राचे भव्योदात्त
उत्कट चित्रण करणारी महाकादंबरी

**श्रीमानयोगी**

लेखक
रणजित देसाई

किंमत - ५४०/- रु.
पोस्टेज - ५०/- रु.




**निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू**
**अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।**
**यशवन्त, कीर्तिवन्त। सामर्थ्यवन्त, वरदवन्त**
**पुण्यवन्त, नीतिवन्त। जाणता राजा।।**



# मंगेश पाडगावकर...

मराठी भावगीते आणि भक्तिगीतांवर आपल्या अवकाशव्यापी प्रतिभेचे शांत-शीतल चांदणे अखंडपणे पाझरवत ठेवणारे श्रेष्ठ कवी म्हणजे कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकर. गेली सत्तर वर्षं आपल्या समग्र काव्यविश्वातून, लयदार ओळीओळीतून समर्थपणे प्रकट होणारे मंगेश पाडगावकर म्हणजे केवळ मराठी कवितेतलेच नव्हे, तर एकूणच मराठी वाङ्मयातले अद्‌भुत असे कैलासलेणे होते. ३० डिसेंबर २०१५ रोजी, वयाच्या शहाऐंशिव्या वर्षी त्यांचे दु:खद निधन झाले. भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी या दु:खद प्रसंगी आपली तीव्र भावना व्यक्त करताना म्हटले की, ''...'श्रावणात घननीळा बरसला' या गाण्यात एक ओळ आहे. 'मातीच्या गंधाने भरला, गगनाचा गाभारा...' मला वाटतं, मराठी कवितेचा गाभारा मंगेश पाडगावकरांच्या प्रतिभेनं जो समृद्ध झाला होता, तो आज त्यांच्या निधनानं रिता झालेला आहे.''

मंगेश पाडगावकर आणि त्यांच्या एकूणच कवितेवर आणि भावविभोर गाण्यांवर मराठी रसिक वाचकांनी आणि सर्वभाषक श्रोत्यांनी नितांत प्रेम केले, आणि म्हणूनच पाडगावकरांची काव्यप्रतिभा, कधीही न कोमेजणाऱ्या, अक्षयपणे सुगंध परावर्तित करणाऱ्या आकाशातल्या नंदनवनातल्या बहरून आलेल्या फुलांसारखी बहरून आली. जणू त्यांच्या समग्र काव्यविश्वाने सर्वांनाच एक आश्वासन दिले होते की,

तू कुठेही जा, सुखी हो, चंद्र माझा साथ आहे
गीत माझे घेऊनी जा, प्राण माझा त्यात आहे...

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे, १० मार्च १९२९ या दिवशी वरल्या निळ्याभोर आकाशात 'मंगेश' नावाचा स्वयंप्रकाशी, अत्यंत तेजस्वी तारा अचानकपणे प्रगट झाला. पाडगावकरांच्याच बोलगाण्यातून सांगायचे झाले तर,

आजोबांच्या खोलीत आता धुकं... धुकं... धुकं...
आजोबांचं जग सगळं मुकं... मुकं... मुकं...

सत्य सांगायचं तर, मंगेश पाडगावकर आपल्यातून कायमचे निघून गेले आणि विंदा करंदीकर, वसंत बापट आणि मंगेश पाडगावकर यांनी अवघा महाराष्ट्रच नव्हे, तर या संपूर्ण मराठी भाषेने भारलेल्या काव्यविश्वातला, एका मंतरलेल्या युगाचा अस्त झाला. एका आनंदव्रताची सांगता झाली. पाडगावकरांची 'वेंगुर्ल्याचा पाऊस' नावाची, आपल्या बालपणातल्या आठवणींनी चिंब भिजलेली कविता वाचताना लक्षात येते ती त्यांची निसर्गओढ. त्या पावसाच्या गर्द आठवणीत हरवलेल्या पाडगावकरांनी आपले बालविश्व प्रकट करताना म्हटले होते की,

वेंगुर्ल्याचा पाऊस कसा माया करीत यायचा,
सरींनी लाड करीत मला कुशीत घ्यायचा!
बाळपण माझं सगळं, भिजवलं त्याने;
आईसारखं मला थोपटून, निजवलं त्याने!
मला जाग येईल म्हणून, हळूच निघून जायचा,
वेंगुर्ल्याचा पाऊस कसा, माया करीत यायचा...

मनात विचार आला की, या वेंगुर्ल्याच्या पावसाने पुन्हा असे कोसळावे की, सर्वांच्या या लाडक्या कविश्रेष्ठाला पुन्हा जाग यावी आणि त्यांच्या शाश्वत कवितांनी आणि अप्रतिम गाण्यांनी पुन्हा ताल धरावा.

मंगेश पाडगावकरांच्या 'धारानृत्या'ने १९५० मध्ये आपल्या काव्यपैजणांच्या सुमधुर आवाजाने झंकारलेल्या पावलांनी, मराठी अभिजात काव्यविश्वात प्रवेश केला आणि 'अखेरची वही' या कवितासंग्रहाने आपल्या समग्र काव्यविश्वाचा शेवट केला. पाडगावकरांचे जवळ जवळ चाळीस कवितासंग्रह प्रकाशित झाले. एप्रिल १९४८ च्या 'सत्यकथे'च्या अंकात 'वायूस' ही पहिली कविता 'मौज प्रकाशना'च्या प्रा. श्री. पु. भागवत यांनी

प्रसिद्ध केली. त्यानंतर पाडगावकर अथकपणे अप्रतिम अशा कविता लिहीतच राहिले. ज्येष्ठ कथाकार आणि नवकथेचे शिल्पकार असणाऱ्या अरविंद गोखले यांनी केवळ सर्वोत्तम कथालेखनालाच प्राधान्य दिले. कथेचीच उपासना केली, त्याचप्रमाणे पाडगावकरांनी आयुष्यभर प्रामुख्याने कवितेचीच उपासना केली. विविध प्रकारांनी कविता लिहिली. मुलांसाठी कविता लिहिली तशीच किशोर गटासाठीसुद्धा कविता लिहिली. गझल्स लिहिल्या. वात्रटिका लिहिल्या. मीरा, कबीर आणि सूरदास या श्रेष्ठ कवींच्या कवितेचे मराठीत रूपांतर करून प्रदीर्घ अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्या. शेक्सपिअरची तीन नाटके मराठीत भाषांतरित केली. बायबलचा अनुवाद केला. ललित लेख लिहिले. २०१३मध्ये त्यांना भारत सरकारने 'पद्मभूषण' देऊन जणू त्यांच्या कवितेचाच सत्कार केला. २००८ मध्ये महाराष्ट्र सरकारने पाडगावकरांना 'महाराष्ट्र भूषण' देऊन गौरव केला. १९८०मध्ये 'सलाम' या त्यांच्या कवितासंग्रहाला 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार मिळाला. कोकण मराठी साहित्य परिषदेने भरविलेल्या पहिल्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड केली. पाडगावकरांच्या साहित्याची दखल सर्वांनीच घेतली; परंतु अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान देऊन त्यांचा गौरव होणे अत्यावश्यक होते. खूप वेळेला मनात विचार येतो की, मंगेश पाडगावकरांच्या समग्र साहित्याचा विचार केला असता, त्यांना अत्यंत मानाचा 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळायला हवा होता...

मंगेश पाडगावकर यांच्या कितीतरी गाण्यांना स्वरांचे कोंदण लाभले. विशेषत: त्यांची,

शुक्रतारा, मंद वारा, चांदणे पाण्यातुनी
चंद्र आहे, स्वप्न आहे, धुंद या गाण्यातुनी
आज तू डोळ्यांत माझ्या मिसळुनी, डोळे पहा
तू अशी जवळी रहा... तू अशी जवळी रहा...

या द्वंद्वगीताला स्वरवैभव प्राप्त झाल्यामुळे अमरत्व प्राप्त झाले. श्रीनिवास खळे यांचे अप्रतिम संगीत लाभलेल्या या गाण्याची कहाणीसुद्धा अलौकिक आहे. दहा वेगवेगळ्या चालित ते प्रथम स्वरबद्ध झाले होते; परंतु खळेसाहेबांचे स्वत:चे समाधान होत नव्हते. अकराव्यांदा चाल लावल्यावर खळेसाहेबांचे समाधान झाले. या अप्रतिम गाण्याला अवकाश उंची लाभली

ती संगीत दिग्दर्शक श्रीनिवास खळे यांच्यामुळे, हे जितके सत्य आहे तितकेच अरुण दाते आणि सुधा मल्होत्रा या दोघांचे अमृतमयी अप्रतिम आवाज लाभले हेही सत्य आहे...

श्री. पु. भागवतांचे एक अप्रतिम शब्दचित्र मंगेश पाडगावकरांनी 'गरकी' या संग्रहात अंतर्भूत केले आहे. त्याचा शेवट करताना ते म्हणतात की, ''माझ्या आईने माझा सांभाळ करून मला वाढविले. अगदी तसेच श्री. पु. भागवतांनी माझ्या कवितेचा सांभाळ करून तिला वाढविली. माझ्या आईच्या निधनाने झाले, तसेच पोरके करून सोडणारे दु:ख, माझ्या कवितेची आई असलेल्या भागवतांच्या निधनाने झाले.'' माझ्याही मनात तसाच विचार आला की पाडगावकरांच्या निधनाने एकूणच शाश्वत मराठी कवितेला पोरके केले आहे.

– वामन देशपांडे


७वी आवृत्ती

**निमित्त**

लेखक
वपु काळे

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.






# श्रद्धांजली

## अरुण टिकेकर यांचे निधन



ज्येष्ठ विचारवंत अरुण टिकेकर यांचे १९ जानेवारी २०१६ रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. अरुण टिकेकर यांच्या निधनामुळे व्यासंगी विचारवंत हरपल्याची भावना सर्वच क्षेत्रांतून व्यक्त झाली. अरुण टिकेकर यांच्यावर त्यांच्या घरातूनच लेखन आणि पत्रकारितेचे संस्कार झाले. त्यांनी मराठी आणि इंग्रजीमध्ये वीसहून अधिक पुस्तके लिहिली. मुंबई विद्यापीठाचा इतिहासही त्यांनी 'बखर मुंबई विद्यापीठाची' या ग्रंथाच्या माध्यमातून जगासमोर आणला.

अक्षरनिष्ठांची मांदियाळी, ग्रंथशोध, आणि वाचन-बोध, जन-मन, अस्वस्थ महाराष्ट्र, सारांश, काल मीमांसा, स्थलकाल आणि फास्ट फॉरवर्ड, शरद पवारांच्या मुलाखतींचे व भाषणांचे संपादन असलेले पुस्तक, हे त्यांचे विशेष गाजलेले साहित्य. त्यांनी तारतम्य, जन-मन, स्थलकाल, काल-मीमांसा, कालांतर, इति-आदि, विवेचन अशी विविध सदरे लिहिली.

'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये ते सहसंपादक असताना रविवारच्या पुरवणीचे 'मैफल' असे पुनर्नामकरण करण्यात आले. शनिवारसाठी 'मनोरंजन' ही नवी पुरवणीही त्यांच्याच काळात सुरू झाली. 'कालांतर' हे अवघ्या काही दिवसांपूर्वीही प्रकाशित झालेले पुस्तक त्यांचे अखेरचे पुस्तक मानावे लागेल. या पुस्तकांसोबत त्यांचे रोहन प्रकाशनाबरोबर 'कालचक्र' आणि 'इति-आदि'

या पुस्तकांवरही काम सुरू होते. टिकेकर यांच्या संग्रही सुमारे तीन हजार दुर्मीळ पुस्तके होती. दुर्मीळ पुस्तकांच्या जतनासाठी आणि अनेक अभ्यासकांना उपयुक्त ठरणाऱ्या एशियाटिक सोसायटीच्या अध्यक्षपदी ते २००७ ते २०१३ या कालावधीमध्ये ते कार्यरत होते. त्यांच्या कार्याबद्दल नोव्हेंबर २०१५ मध्ये त्यांचा 'एशियाटिक'च्या वतीने मानद गौरववृत्ती देऊन सत्कार करण्यात आला होता. अरुण टिकेकर यांना अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवनगौरव पुरस्कारही मिळाला होता. त्यांनी 'लोकमत'चे समूह संपादकपद, तसेच 'सकाळ'चे संपादक संचालकपदही सांभाळले.

## डॉ. द. भि. कुलकर्णी यांचे निधन



साहित्यकृतींचा नव्याने वेध घेत, अभिजात रसिकतेची साक्ष पटविणारे ज्येष्ठ समीक्षक दत्तात्रेय भिकाजी ऊर्फ डॉ. द. भि. कुलकर्णी (वय८२) यांची प्राणज्योत २७ जानेवारी रोजी मालवली. मराठी साहित्यातील समीक्षेचा मानदंड असणारे 'दभि' हे सौंदर्यवादी, सैद्धांतिक समीक्षेसाठी ओळखले जात. पुण्यात झालेल्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

पिंपरीत नुकत्याच झालेल्या ८९ व्या मराठी साहित्य संमेलनात माजी संमेलनाध्यक्षांच्या सत्कार सोहळ्यात डॉ. द. भि. कुलकर्णी उपस्थित होते. गेल्या आठवड्यात अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, हृदयविकाराचा सौम्य झटका आल्याने त्यांना अतिदक्षता विभागात हलविले. त्यात त्यांचे देहावसान झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून आणि नात असा परिवार आहे.

'दभि' यांचा जन्म २५ जुलै १९३४ रोजी नागपूरमध्ये झाला. तिथेच त्यांनी शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण घेतले. नागपूर विद्यापीठातूनच

त्यांनी मराठी विषयात पीएच.डी. मिळवली. रशियन भाषेतील अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला होता. विदर्भ साहित्य संघातर्फे 'डी.लिट.'शी समकक्ष असलेली 'साहित्य वाचस्पती' ही पदवी त्यांना दिली आहे. 'दभि' यांनी अध्यापन क्षेत्रातही भरीव कामगिरी केली असून, नागपूरचे विकास विद्यालय, बनारस हिंदू विद्यापीठ, कोल्हापूरचे गोखले विद्यालय अशा अनेक ठिकाणी त्यांनी अध्यापन केले आहे.

प्राचीन आणि अर्वाचीन या दोन्ही साहित्यपरंपरांचा त्यांचा व्यासंग वाखाणण्याजोगा होता. 'महाकाव्य', 'स्वरूप आणि समीक्षा' (१९७५), 'ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद' (१९७६), 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र' (१९८२), 'तिसऱ्यांदा रणांगण' (१९७६), 'युगास्त्र' (१९९३), 'अपार्थिवाचे चांदणे' (१९९९) या समीक्षा ग्रंथांमधून 'दभिं'च्या वाङ्मयीन विचारांची व्यापकता लक्षात येते. त्यांच्या समग्र समीक्षा लेखनाची सूची 'हिमवंतीचे सरोवरे' (१९९६) या त्यांच्या निवडक समीक्षा लेखसंग्रहात आहे. 'साहित्यशास्त्र' हा त्यांचा आवडीचा आणि अभ्यासाचा विषय होता. यामध्ये अनेक संशोधनात्मक आणि समीक्षात्मक ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. 'अंतरिक्ष फिरलो, पण..', 'अपार्थिवाचा यात्री', 'चौदावे रत्न','जीएंची महाकथा', 'जुने दिवे, नवे दिवे' (ललित लेख), 'दुसरी परंपरा', 'देवदास आणि कोसला', 'द्विदल', 'पहिली परंपरा', 'पहिल्यांदा रणांगण', 'पार्थिवतेचे उदयास्त', 'बालकांचा बगीचा' (बालवाङ्मय), 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', 'मेरसोलचा सूर्य', 'समीक्षेची चित्रलिपी, 'समीक्षेची वल्कले', 'समीक्षेची सरहद्द', 'सुरेश भट- नवे आकलन' आदी त्यांची साहित्य संपदा आहे.

न्यूयॉर्कच्या 'हेरॉल्ड ट्रिब्यून'तर्फे घेण्यात आलेल्या प्रौढांच्या खुल्या कथा स्पर्धेत वयाच्या १९ व्या वर्षी त्यांना पुरस्कार मिळाला होता. नागपूर विद्यापीठाच्या ना. के. बेहेरे सुवर्णपदकावरही त्यांचे नाव कोरले आहे.

महापौर दत्तात्रेय धनकवडे, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, महामंडळाच्या अध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, ८९व्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, डॉ. वि. भा. देशपांडे, डॉ. न. म. जोशी, ह. मो. मराठे, ह. ल. निपुणगे, अरुण जाखडे यांनी 'दभि' यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली.




# हितोपदेश प्रेरक कथा

## टिटवी आणि समुद्र



एका समुद्रकिनाऱ्यावर टिटवा-टिटवी राहत होते.

एकदा टिटवी म्हणाली, ''एखादी सुरक्षित जागा शोधायला हवी. मला अंडी घालायची आहेत.''

टिटवा म्हणाला, ''ही जागा काय वाईट आहे?''

''ही जागा सुरक्षित नाही. इथे चारही बाजूंनी समुद्रच आहे. भरतीच्या वेळी अंडी कुठल्या कुठं वाहून जातील.''

''काहीतरीच काय! कुठं समुद्र, कुठं तू! तो आपली खोडी काढू दे. मी त्याला चांगलाच धडा शिकवीन!''



अंडी घालता यावी, अशी दुसरी जागा शोधण्यास टिटवा उत्सुक नव्हता.

अखेर टिटवीने समुद्राजवळच अंडी घातली.

दोघांचा संवाद समुद्राने ऐकला होता. टिटव्याचे बोलणे त्याने लक्षात ठेवले.

पाण्याच्या जोरदार लाटेसरशी टिटवीची अंडी वाहून गेली. टिटवीला वाईट वाटले. रडत रडत ती म्हणाली, ''माझी भीती खरी ठरली. समुद्रानं माझी अंडी अखेर नेलीच.''

टिटवा म्हणाला, ''तू मुळीच चिंता करू नकोस! मी आपली अंडी नक्की परत आणीन!''

टिटवा आपल्या मित्रांकडे गेला. झालेले सर्व त्याने मित्रांना सांगितले.

मग टिटव्याचे मित्र त्याला घेऊन आपल्या राजाकडे गेले.




टिटव्याने आपले म्हणणे गरुडाला सांगितले. तो म्हणाला, ''महाराज, मी माझ्या घरट्यात माझ्या पत्नीबरोबर सुखात राहत होतो. मी समुद्राला कधीच त्रास दिलेला नाही. मग त्यानं माझ्याशी असं का वागावं?''

गरुड त्याला समजावत म्हणाला, ''तू मुळीच काळजी करू नकोस. मी काहीतरी करतो!''

त्यांच्याशी बोलून गरुड भगवान विष्णूंकडे आला.

भगवान विष्णूंनी गरुडाला पाहून विचारलं, ''बोल, काय काम काढलंस?''

''भगवान! पक्ष्यांचा राजा म्हणून तुम्ही माझी नेमणूक केलीत. हा समुद्र खूप त्रासदायक झाला आहे. किनाऱ्यावर राहणाऱ्या एका छोट्या टिटवीची अंडी त्याने ओढून नेली.''



"चल पाहू. मी तुझ्याबरोबर येतो. आपण समुद्रालाच विचारू!"

प्रत्यक्ष भगवान विष्णू आपल्या दिशेने येत असल्याचे पाहून समुद्र सावध झाला. त्याने लगबगीने नमस्कार केला. भगवान विष्णूंनी त्याला विचारले, "टिटवा-टिटवीच्या जोडप्यानं तुझी काय आगळीक केली आहे?"

"काहीही नाही, महाराज..."

"मग तू त्यांची अंडी का वाहवून टाकलीस?"

समुद्र काय उत्तर देणार? तो गप्प उभा राहिला.

टिटव्याची धाव कुठवर जाते याचा अंदाज घ्यावा, म्हणून त्याने ही खोडी काढली होती. प्रत्यक्ष भगवान विष्णूंपर्यंत हे प्रकरण पोहोचेल, असे त्याला स्वप्नातही वाटले नव्हते. तो अपराध्यासारखा खाली मान घालून उभा राहिला.

भगवान विष्णूंनी त्याला आज्ञा केली, "त्या टिटवीची अंडी तिला तात्काळ परत करून टाक!"


"जशी आज्ञा, महाराज!" असे म्हणून समुद्राने टिटवीची अंडी तिला परत केली.

भगवान विष्णु गरुडावर आरूढ होऊन निघून गेले.




# Approach Series


₹ 320





₹ 210




₹ 180




₹ 320



RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 February, 2016. Posting Date : 11 February, 2016.


# आमची वाचनीय पुस्तके...



















BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.